# सुवर्णकण

दुसरी आवृत्ति

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा०.वा०
दा. क्र. ८०९e

लेखक
**खलिल जिब्रान**

अनुवादक
**वि. स. खांडेकर**

IRBK-0108019
IRBK-0108019

किंमत तीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

16 APR 1975

7 JUN 1976

27 JUN 1976

[क्र. मा. प.]

# सुवर्ण कण

लेखक

खलील जिब्रान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३१,२०१
वाचनालय

अनुवादक व विवेचक

वि. स. खांडेकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों दि ..........
वि. ........ क्र. ..........
IRBK-0108019

किंमत तीन

IRBK-0108019

प्रकाशक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१, शनवार, पुणें २.

पहिली आवृत्ति १९४४
दुसरी आवृत्ति १९४८

१ सर्व हक्क सौ. उषा ग्वाडेकर यांच्याकडे आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक
वि. ग. माटे,
'विश्वकर्मा' प्रेस,
१९६।६९, टिळक रोड, पुणें.

खलील जिब्रान

व

कॅरेल कॅपेक्

यांच्या

स्मृतीस

## चार शब्द

पुस्तकें हीं मित्रांसारखीं असतात, या उक्तींत सत्य अधिक आहे कीं सौंदर्य अधिक आहे हें सांगणें कठिण आहे. प्रथमदर्शनीं दिसतो त्यापेक्षां कितीतरी खोल अर्थ या सुभाषितांत भरला आहे यांत मात्र मुळींच शंका नाहीं. मित्रांत नुसते घोंलघेवडे आणि वेळेवर उपयोगी पडणारे असे फरक पडतात ना ? तसे ते पुस्तकांतही असतात काहीं काहीं लोक परिचयाच्या दिवशींच आपले जीवश्चकंठश्च मित्र बनतात! पण जितक्या लगबगीनें ते गळ्यांत गळा घालतात, तितक्याच घाईनें पाठ फिरवून आपल्या आयुष्यांतून ते निघून जातात. पुस्तकांतही हे प्रकार अनुभवाला येतात. मित्र आणि पुस्तकें यांच्यांतलीं अशीं अनेक गंमतीदार साम्यें सांगतां येण्याजोगीं असलीं तरी एका विशिष्ट साधर्म्याचा अनुभव पुन:पुन्हां आला असल्यामुळें त्याचें मला नेहमींच कौतुक वाटतें. तें म्हणजे चांगल्या मित्रांप्रमाणें चांगलीं पुस्तकेंही आपल्या आयुष्यांत योगायोगानेंच येतात हें होय.

मित्रांचीच गोष्ट पहा ना !

प्रो. रामभाऊ जोशी व मी अगदीं बालमित्र आहों. पण लहानपणीं आमचीं घरें एकमेकांच्या जवळ होतीं म्हणून आम्ही स्नेही झालों असें मात्र मला मुळींच वाटत नाहीं. जिच्या राखीव खुर्चीचा दर दुध्या पेन्सिलीचा अर्धा किंवा पाव तुकडा होता अशी बालनाटकमंडळी स्थापण्याच्या महत्त्वाकांक्षेनेंच आम्हांला प्रथमतः एकत्र आणलें असावें ! माझे दुसरे मित्र जंबुअण्णा आरवाडे यांचें घर तर आमच्या घरासमोरच होतें. म्हणजे एकाचें तोंड पूर्वेला तर दुसऱ्याचें तोंड पश्चिमेला अशी आमची अक्षरशः स्थिति होती. कांहीं वर्षें ती तशीच राहिली. पण इंग्रजी चवथींत किंवा पांचवींत वर्गबंधु झाल्याबरोबर आमच्या दोघांच्या मनांत जें मैत्रीचें बीज रुजलें, तें पुढें स्थलाचें दूरत्व किंवा व्यवसायाचें भिन्नत्व यांची पर्वा न करतां अंकुरित आणि पल्लवित होत गेलें. १९१६ सालीं माझ्यापेक्षां वयानें लहान असा एक विद्यार्थी म्हणून दत्तक घरीं ज्यांची गांठ पडली त्या दत्ताराम घाट्यापासून १९३५ मध्यें 'ज्योत्स्ने' च्या निमित्तानें भेटलेल्या वामनराव ढवळ्यांपर्यंतचे अनेक जिव्हाळ्याचे स्नेही माझ्या आयुष्यांत कसे आले याची

आठवण ज्या ज्या वेळीं मला होते, त्या त्या वेळीं नकळत माझ्या तोंडून एकच उद्गार निघतो – दैवाइतका कुशल कादंबरीकार जगांत कुठेंही आढळणार नाहीं. विस्मयाचें तंत्र सुंदर रीतीनें वापरण्यांत त्याचा अगदीं हातखंडा आहे.

जी गोष्ट मित्रांची, तीच पुस्तकांची. श्रीपाद कृष्ण, हरिभाऊ आपटे, गडकरी, आगरकर, टर्जिनेव्ह, चेकॉव्ह, इब्सेन, झ्वाइग, टॉलर, कॅपेक, या माझ्या अतिशय आवडत्या ग्रंथकारांपैकीं कुणीही घ्या. त्यांच्याशीं झालेल्या माझ्या पहिल्या परिचयाची हकीगत मोठी मनोरंजक आहे. मग जिब्रानच या नियमाला कसा अपवाद होणार ?

१९३८ साल असावें तें ! मी पुण्यात होतों तेव्हां. माझ्या पत्नीच्या टॉन्सिल्सचें ऑपरेशन करायचें ठरलें होतें. चित्रपटात किंवा लघुकथात मोठ-मोठ्या शस्त्रक्रिया मी झपाट्यानें उरकल्या असल्या तरी, हें ऑपरेशन अगदीं साधें आहे हें कळत असूनही त्याच्या कल्पनेनें मी उगीच बेचैन झालों होतों. स्वत:च्या त्या अस्वस्थ मन:स्थितीला हंसत मी पुन: पुन्हां म्हणत होतों-- कलावन्त हा नाचरंगांत दंग होऊन वीरश्रीची बडबड करणाऱ्या महाभारतांतल्या उत्तरासारखा असतो ! जोंपर्यंत अंत:पुरांतच वल्गना करायच्या आहेत, तोंपर्यंत त्याच्या शौर्याच्या गप्पा ऐकून घेण्याजोग्या असतात. पण प्रत्यक्ष रणांगणावर जायची पाळी येतांच उत्तराला जसें कांपरें भरलें, तशी कठोर व्यवहाराशीं तोंड द्यायचा प्रसंग आला कीं कलाकाराची स्थिति होते !

पण स्वत:वर एवढी टीका करून घेऊन सुद्धा माझ्यात काडीइतकीही सुधारणा झाली नाही. आधल्या दिवशीं लिहायला घेतलेली ‘ पहिली लाट ’ ही गोष्ट त्या दिवशीं मी पुरी करणार होतों. पण मन स्वस्थ नसल्यामुळें काहीं केल्या लेखनाकडे माझें लक्षच लागेना. मी उठून ‘इंटरनॅशनल बुक सर्व्हिस’ मध्ये गेलों. फुलपाखरें जशीं फुलांनीं भरलेल्या बागेत रमतात, त्याप्रमाणें पुस्तकांत-ल्या किड्यांचाही पुस्तकातल्या दुकानात हा हा म्हणता वेळ जातो. हें पुस्तक उचल, त्या पुस्तकाची प्रस्तावना वाच, तें नवें पुस्तक चाळून पहा, असें करीत तिथें मी बराच वेळ घालविला. आता घरीं परतायचें असें मनात म्हणत मी सहज एका बाजूच्या उघड्या कपाटाकडे वळलों. एका छोट्या

पुस्तकाच्या काळ्या पुठ्ठ्यावर चकाकणाऱ्या सोनेरी अक्षरांनीं माझें लक्ष वेधून घेतलें. मी पुस्तक उचलून तीं सोनेरी अक्षरें वाचलीं—

The Madman
His Parables and Poems
Khalil Gibran.

जिब्रान हें लेखकाचें नांव कुठें ऐकल्याचें मला कांहीं आठवेना. पुस्तकाचें नांव पहावें तर 'पागल'! आंत अन्योक्तिपर छोट्या कथा आणि कविता आहेत हें वरच्या मजकुरावरूनच उघड होत होतें. पुस्तक चटकन् उघडावें असें कोणतेंच आकर्षण त्या पुस्तकाच्या बहिरंगात नव्हतें. मी तें परत शेल्फवर ठेवून पुढें झालों. इतक्यांत माझ्या मनांत एक कल्पना आली—आपण गेलीं कित्येक वर्षें रूपककथा म्हणून छोट्या छोट्या गोष्टी मोठ्या आवडीनें लिहित आहों. त्या गोष्टींचें वाङ्मयीन मूल्य कळायला कदाचित् या पुस्तकाचा उपयोग होईल.

दोन पावलें मागें येऊन मी तें पुस्तक पुन्हां उचललें. शितावरून भाताची परीक्षा करायची ठरवून मी तें उघडलें. योगायोगानें जें पान मी उघडलें होतें त्याच्यावर असलेल्या गोष्टीचें नांव 'The Great Sea' (महासागर) असें होतें. मी ती कथा वाचूं लागलों. तीनचार मिनिटांत माझें वाचन संपलें. पुस्तक मिटून मी जिब्रान या पुस्तकावरच्या नांवाकडे पाहिलें. माझ्या दृष्टींतली मघांची उदासीनता कुठल्या कुठें बेपत्ता झाली होती. तिची जागा आतां आदरानें घेतली होती. जिला मी धूळ मानीत होतों ती साधी माती नव्हती; सोन्याच्या खाणींतली माती होती ती!

● ● ●

त्या दिवशीं जिब्रानचें हें पुस्तक रात्रीं झोंपायच्या पूर्वी मी दोनदां वाचून काढलें. त्याच्या वाचनानें माझ्या मनाला एक प्रकारची गूढ पण रम्य अशी शांति लाभली. थंडीच्या दिवसांत पहांटे उठून बाहेर पसरलेलें धुकें पाहातांना माणसाला जो अपूर्व आनंद होतो, तो त्या दिवशीं मी अनुभवला. अंथरुणावर पडल्यावर नुकत्याच वाचलेल्या जिब्रानच्या छोट्या गोष्टींचें चिंतन करीत असतांना राहून राहून मला धुक्याचीच आठवण होत होती! त्याच्या

कथांत तरल सौंदर्य आहे याविषयीं माझी खात्री झाली होती. पण तें गूढ सौंदर्य कशांतून निर्माण झालें आहे, त्याचा आत्मा काव्य आहे कीं तत्त्वज्ञान आहे, याविषयीं निश्चित असा निर्णय मला त्या वेळीं करतां येईना.

त्या दिवसापासून जिब्रानचें ' मॅडमन ' हें पुस्तक माझ्या आवडत्या पुस्तकांपैकीं एक होऊन बसलें. माझ्या लिहायच्या खोलींतल्या कपाटांत त्याला लगेच जागा मिळाली. या कपाटांतलीं पुस्तकें मी वर्षावर्षांतसुद्धां वाचीत नाहीं. पण तीं तिथेंच असलीं पाहिजेत असा माझा कटाक्ष असतो. अगदीं ठेवणींतल्या जरीच्या लुगड्यांना बायका जशा जपतात, तशी मीही या पुस्तकांची काळजी घेतों.

केव्हां तरी लहर आली म्हणजे—विशेषत: काव्यात्मक वृत्तीच्या माझ्या साहित्यिक मित्रांचा किंवा रसिक स्नेह्यांचा माझ्या घरीं मुक्काम असतांना—मी जिब्रानच्या या छोट्या कथापैकीं एखाददुसरी सविस्तर विवेचन करून त्यांना सांगत असें. कांहीं कांहीं वेळां मूळ पुस्तक काढून त्यांतल्या निवडक गोष्टींचें वाचन करण्याचाही कार्यक्रम होई. विविध मनोवृत्तींच्या लोकांना या गोष्टी सारख्याच आवडतात असा मला वारंवार अनुभव येऊं लागला. मात्र प्रत्येकाच्या आवडीचें कारण निराळें असे. कुणाला जिब्रानची उत्तुंग कल्पकता मोहिनी घाली, कुणाला त्याच्या मार्मिक उपरोधानें गुदगुल्या होत, कुणाला त्याच्या सूचक तत्त्वज्ञानांत नव्या प्रकाशाचें दर्शन होई. या अनुभवामुळें या छोट्या गोष्टी लिहिणाऱ्या लेखकाची प्रतिभा फार मोठी आहे हें माझें मत अधिक दृढ झालें. जिब्रानच्या कांहीं कांहीं कथांत जीवनाच्या विविध क्षेत्रांवर विदारक प्रकाश टाकण्याची शक्ति किती आहे याचा अनुभव १९४१ सालीं सोलापूरच्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं मला अगदीं अचानक आला. शाळकरी पोराच्या सुरात संमेलनाच्या अध्यक्षानें छापील भाषण वाचून दाखविण्याच्या प्रथेचा कंटाळा आला असल्यामुळें मी तिथें वाचन न करतां भाषण करायचें ठरविलें होतें. बोलण्याच्या ओघांत मराठी वाङ्मयाच्या सद्य:स्थितीचें चित्र मी रेखाटूं लागलों. तें रंगवितां रंगवितां मला एकदम जिब्रानच्या ' महासागर ' या कथेची आठवण झाली. मी भराभर बोलूं लागलों—' मेलेले मासे हळुवारपणानें परत पाण्यांत घालणारा हा भूतदयावादी—खांडेकरांच्या वाङ्मयाचा प्रतिनिधीच आहे हा ! रत्नजडित पेटींतून चिमटीचिमटीनें समुद्रांत साखर टाकून

त्याला मधुरता आणूं पाहाणारा हा आशावादी. अत्रे आणि फडके यांच्या वाङ्मयाचें हें यथार्थ चित्र नाहीं असें कोण म्हणेल ? स्वतःच्या सावलीची वाळूंत रेखाटलेली आकृति प्रचंड लाटा पुनः पुन्हां पुसून टाकीत असतांना ती गिरवींत बसण्याच्या नादांत गर्क असणारा हा गूढवादी——वामनराव जोश्यांच्या वाङ्मयाशीं याचें थोडेंफार साम्य आहे. नाहीं का ? आणि अगदीं एकांतांत बसून आपल्या दगडी कमंडलूंत समुद्राचा फेंस सांठवूं पाहाणारा हा ध्येयवादी ! साने गुरुजींचें वाङ्मय वाचतांना याची म्हटकून आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. '

माझ्या भाषणांत आणि लेखनांत जिब्रानचा असा वारंवार उल्लेख होऊं लागला, तेव्हां अनेकांनीं मला त्याच्या छोट्या गोष्टी मराठींत आणण्याविषयीं आग्रह केला. एक आवडीचें काम म्हणूनच नव्हे, तर मराठींत रूढ होत चाललेल्या अनेक नवीन वाङ्मयप्रकारांप्रमाणें रूपककथेलाही उथळ वळण लागण्याचा जो धोका मला दिसत होता तो थोडा तरी टाळण्याचा प्रयत्न करावा म्हणून मी जिब्रानला मराठी पोषाख चढविण्याचें ठरविलें. पण जिब्रानच्या गोष्टींचा अनुवाद वाचकांना कोणत्या पद्धतीनें सुंदर करायचा याविषयीं मात्र माझें मन द्विधा झालें. भावगीतापासून महाकाव्यापर्यंत, रूपककथेपासून कादंबरीपर्यंत किंवा व्यंगचित्रापासून तैलचित्रापर्यंत कुठल्याही सुंदर कलाकृतीचा आस्वाद रसिक मनाला मध्यस्थाच्या मल्लिनाथीवांचून घेतां आला पाहिजे असेंच त्या वेळीं माझें मत होतें. ऊस दांतांनीं सोलून खाण्यांत जी गोडी आहे, ती कांहीं घटाघट त्याचा रस पिण्यांत नाहीं. पण ऊस सोलून खायला दांत बळकट असावे लागतात ! आणि जगांत तर अनेकांचे दांत फक्त दाखवायला किंवा फार तर पावलोणी खायला उपयोगी पडतील एवढ्याच लायकीचे असतात !

कलाकृतीच्या आस्वादाच्या बाबतींत हा वादग्रस्त प्रश्न नेहमींच उद्भवत आला आहे. पुढेंही तो निर्माण होत राहील. ज्यांच्या रसिकतेचें सहज पोषण होण्यासारखी सभोंवतालची सामाजिक परिस्थितीच नाहीं, अशा आजच्या सामान्य वाचकांची गोष्ट सोडून देऊं. पण लेखनवाचनांत तपेंच्या तपें चालविलेल्या आणि प्रथितयश म्हणून लोकांकडून गौरविल्या गेलेल्या अनेक बडया बडया माणसांचें रसिकतेचें इंद्रियसुद्धां अंशतः अधू असतें याचा

अनुभव मी वारंवार घेत आलों आहें. महाराष्ट्रांतल्या एका जाडया कादंबरीकारानें एका प्रतिभासंपन्न कवीच्या अतिशय नाजुक कवितेची रटाळ म्हणून खाजगी बैठकींत केलेली संभावना मी ऐकली आहे. उलट एका सुप्रसिद्ध कवीनें सूचक आणि संयमित पद्धतीनें लिहिलेल्या लघुकथांना सामान्य म्हणून कमें नाक मुरडलें तेंही मी पाहिलें आहे. स्वतःला विद्वान समजणाऱ्या आणि लोकांकडून पंडित म्हणून पूजिल्या जाणाऱ्या दोन टीकाकारांत वारंवार 'एकच प्याल्यां'तल्या डॉक्टर-वैद्यांप्रमाणें जी खडाजंगी होते ती मराठी वाङ्मयांत कुणाच्या परिचयाची नाहीं? अशा स्थितींत कल्पपूर्ण सूचकतेमुळें असो, तरल कल्पकतेमुळें असो अथवा अनुभूतीच्या बारकाव्यामुळें असो, सुजाण वाचकांना सुद्धां थोडयाफार गूढ वाटणाऱ्या जिब्रानच्या छोट्या कथा सर्व सामान्य वाचकांपुढें नुसत्या ठेवल्या तर त्यांच्या मनांत या गोष्टींविषयीं आवड कशी उत्पन्न होईल हा प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला. ती निर्माण करायची म्हणजे या गोष्टी त्याला पूर्णपणें समजतील अशाच पद्धतीनें सांगितल्या पाहिजेत. अशा रसग्रहणात्मक विवेचनानें रसभंग होतो म्हणून पढिक टीकाकार हाकाटी करीत सुटतात हें खरें! पण त्यांच्यापैकीं अनेकांना यांतल्या एखाद्या अवघड कथेचें मर्म विचारलें तर तें सांगण्याऐवजीं आजच्या वर्तमानपत्रांतल्या युद्धाच्या बातम्याविषयींच ते बोलूं लागतील! नुसत्या गोष्टी छापल्या तर त्या गूढ आहेत म्हणून टीका होणार, त्या विवेचनासह सादर केल्या तर रसभंग केल्याचा आरोप येणार. हे दोन मार्ग कुठेंही मिळणार नाहींत. तेव्हां—

यांतला कुठला मार्ग अधिक चांगला या विचारांत मी असतांनाच कुसुमाग्रजांचा 'विशाखा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेंत 'पाचोळा' या कवितेवर मी थोडेंसें लिहिलें होतें. 'विशाखा' प्रसिद्ध झाल्यावर सुप्रसिद्ध कवि मायदेव यांनीं आपल्या परीक्षणांत या कवितेचें मी केलेलें विवेचन चूक आहे असें सांगून आपण स्वतः लावलेला तिचा अर्थ विशद केला. तो अर्थ मला न पटल्यामुळें मी खुद्द कवींनाच या बाबतींत कौल लावायचें ठरविलें. कवींचा निकाल माझ्या बाजूनेंच होणार अशी माझी खात्री होती! पण—

कवींनीं मला ती कविता कशी स्फुरली हें सांगितलें तेव्हां या परीक्षेंत मी

30.11.69
ग्रा. वा.
24597
8-8-91

न मायदेव दोघेही नापास झालों आहोत हें मला कळून चुकलें. हा गमतीदार गोंधळ वाचकांच्या लक्षात यावा म्हणून आधीं ती कविता देऊन मग आमच्या मिथांचे तीन अर्थ सांगतों.

आडवाटेला दूर एक माळ । तरू त्यावरती एकला विशाळ
आणि त्याच्या बिलगुनीया पदास । जीर्ण पाचोळा पडे तो उदास
उषा येवो शिंपीत जीवनामी । निशा काळोखी दडवुं या जगासी
सूर्य गगनांतुनि ओतुं या निखारा । मूक सारें हें साहतो बिचारा !
तरूवरची हंसतात त्यास पानें । हंसे मुठभर तें गवतही मजेनें
वाटसरु वा तुडवीत त्यास जात । परी पाचोळा दिसे नित्य शांत
आणि अंतीं दिन एक त्या वनांत । येइ धांवत चौफेर क्षुब्धवात
दिसे पाचोळा, घेरुनी तयातें । नेइ उडवुनि त्या दूर दूर कोठें !
आणि जागा हो मोकळी तळाशीं । पुन्हां पडण्या वरतून पर्णराशीं !

कुसुमाग्रजांच्या अनेक कवितांत दलित-वर्गाविषयीं जी गाढ सहानुभूति प्रगट झाली आहे, तिचा मनावर परिणाम झाल्यामुळें असेल किंवा मी म्हणतों ती कल्पना या कवनांत कवीला नकळत आविष्कृत झाल्यामुळें असेल, ही कविता मी पहिल्यांदा वाचली त्या वेळीं तिच्यांतला ' पाचोळा ' हें दलितवर्गाच्या जीवनाचें प्रतीक आहे या जाणिवेनें मी तिचा बौद्धिक आनंद उपभोगला. अर्थात् या कवितेचें रसग्रहण करतांना 'दलिताच्या पोटीं जन्माला आलेल्या गुणी माणसालाही दलितच व्हावें लागतें. आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक गुलामगिरींतून मुक्त होण्याचा एकसुद्धां मार्ग आम्ही त्यांना मोकळा ठेवलेला नसतो. पहिला पाचोळा उडून गेला कीं पुन्हां तिथें जसा पाचोळा साठतो, तसें त्यांचें जीवन आहे' असें मी लिहून गेलों.

या कवितेंतली ' आडवाटेला दूर एक माळ ' ही पहिली ओळ वाचतांच जें चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें, तें समाजानें दूर लोटलेल्या दलितांच्या वसतीचें होतें ! कवीच्या प्रतिभेची प्रकृति या चित्राला पोषक अशीच असल्यामुळें रसग्रहण करतांना वाट चुकून आपण भलतीकडे जात आहों अशी मला त्या वेळीं पुसटसुद्धां शंका आली नाहीं. मायदेवांनीं जेव्हां माझ्या विवेचनावर आक्षेप घेतला तेव्हां कुठें मी जागा झालों !

त्यांच्या दृष्टीनें ही कविता मी पुन्हां वाचून पाहिली. पण त्यांनीं तिच्यावर

अभिप्रेलेला अर्थ कांहीं केल्या मला पटेना. 'पाचोळ्यांत' नेहमीं दिसणाऱ्या सृष्टिक्रमाचें सरळ वर्णन आहे असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता. हिंवाळ्यांत पिकलेलीं पानें झाडांवरून गळून पडायचीं, उन्हाळ्यांत झाडावर नवी पालवी यायची, हळुहळु तिचें पानांत रूपांतर व्हायचें. पावसाळ्याअखेर वादळी वाऱ्यानें खालीं पडलेला पाचोळा दूर उडून जायचा आणि पुन्हां पुढल्या हिंवाळ्यांत वरचीं पानें पिकून खालीं गळून पडायचीं, हें निसर्गाचें रहाटगाडगें कुणाला माहीत नाहीं ? पण केवळ त्याचें चित्र रेखाटण्याकरतां कवीनें ही कविता लिहिली असावी असें मला मुळींच वाटेना. सृष्टिसौंदर्यानें मोहित होऊन 'अरुण,' 'संध्यातारा,' 'श्रावणमास,' इत्यादि कविता बालकवींनीं लिहिल्या असल्या तरी सौंदर्याची विलक्षण मोहिनी हीच तिथें कवीची प्रेरकशक्ति आहे पाचोळा ही कविता वाचून जी उदासीनपणाची छाया मनावर पसरते, तिचा सौंदर्याच्या साक्षात्काराशीं मुळींच संबंध नाहीं. म्हणून कविमनाला शल्याप्रमाणें बोंचणाऱ्या जीवनांतल्या कुठल्यातरी दृश्याचें तें अलंकारिक चित्रण असलें पाहिजे असा माझ्या विचारसरणीचा रोख होता.

आचाऱ्यांच्या गर्दीत जसा स्वयंपाक बिघडतो, तसा टीकाकारांच्या कोलाहलांत काव्यरसाचें भजें होण्याचा संभव असतो. म्हणून मी माझी शंका खुद्द कवीपुढेंच मांडली. मी कवितेचा केलेला अर्थ अयोग्य वाटत नाहीं असें ते म्हणाले. पण कविता लिहिण्याच्या वेळीं त्यांच्या मनांत जी कल्पना घोळत होती ती मात्र सर्वस्वीं निराळी होती असें त्यांनीं सांगितलें. त्यांच्या मूळ कल्पनेंतला वृक्ष म्हणजे संसार ! जुनी पिढी हा या वृक्षाच्या खालीं पडलेला पाचोळा. पाचोळ्याला हंसणारीं झाडावरचीं पानें म्हणजे तरुण पिढी. आतां कवितेंतला चौफेर धांवत येणारा क्षुब्ध वारा कोण हें सांगायलाच हवें का ? त्याचें नांव मृत्यु. तो वारा झाडाखालचा पाचोळा भराभर उडवून नेतो. पण खालची रिकामी झालेली जागा वरून गळून पडणाऱ्या पानांनीं पुन्हां भरून निघते !

कुसुमाग्रजाच्या या स्पष्टीकरणाचा फायदा घेऊन ललितवाङ्मयाच्या निर्मितीविषयीं विद्वान टीकाकार पुष्कळ काथ्याकूट करूं शकतील. त्या क्षेत्रांत शिरण्याचा माझा अधिकार नसल्यामुळें या कवितेपासून मी फक्त एक धडा

शिकलों. तो म्हणजे उत्कृष्ट ललितवाङ्मयांतली सूचकता कलेच्या दृष्टीनें सौंदर्यपोषक असली तरी ती दुर्बोध होऊं शकते. अशा वाङ्मयाचें रसग्रहण करणाऱ्या विवेचनानें मूळ सौंदर्याच्या नाजुकपणाला थोडा धक्का पोंचण्याचा संभव असला तरी तें करणें आवश्यक आहे. अंधुक सौंदर्यदर्शनापेक्षां सुबोध रसग्रहणानेंच सामान्य वाचक त्या कलाकृतीचा उत्कृष्ट उपभोग घेऊं शकेल. पूर्वी विहंगम मासिकांत काकासाहेब कालेलकरांनीं जिब्रानच्या कांहीं छोटया गोष्टी अनुवादित केल्या होत्या.त्यांना काकासाहेबांच्या विवेचनाची जोड असती तर छोटे चुटके म्हणून त्यांच्याकडे सामान्य वाचकांचें दुर्लक्ष झालें नसतें.

● ● ●

'मौजे' मध्यें जिब्रानच्या कांहीं कथा मी क्रमशः देऊं लागल्यानंतर अशा प्रकारच्या गोष्टींना 'रूपककथा' हा शब्द योग्य आहे कीं नाहीं यांविषयीं चर्चा सुरू झाली. हा शब्द मी स्वतःच बनविला आहे कीं दुसऱ्या कुणाकडून तो उसना घेऊन मी तो रूढ केला आहे, हें माझें मलाच नक्की सांगतां येत नाहीं. पण गेलीं आठदहा वर्षें तरी मी तो वापरीत आलों आहें. अशा प्रकारच्या कथा लिहिणारे, त्या छापणारे व प्रसंगानुसार त्यांचें विवेचन करणारे सर्व लोक याच शब्दाचा सर्रास उपयोग करीत आल्यामुळें त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यांत कांहीं विशेष वैगुण्य आहे, याची मला कधीं कल्पनाच आली नाहीं. पण दीडदोन महिन्यांपूर्वी एके दिवशीं माझें या बाबतींतलें अज्ञान पाहून मी चकित झालों ! रूपक हा एक अलंकार आहे, त्याला इंग्रजींत मेटॅफर ( Metaphor ) म्हणतात, ज्यांत रूपक अलंकार असेल त्याच कथांना रूपककथा म्हणणें योग्य होईल, दृष्टांत-प्रतीक अन्योक्ति-अप्रस्तुतप्रशंसा यांपैकीं एखादा किंवा यांच्यापेक्षांही अवघड असा दुसरा एखादा शास्त्रोक्त शब्द सांपडला तर तो रूपककथेऐवजीं रूढ करणें आवश्यक आहे, या बाबतींत अमुक पंडित असें म्हणतात, फलाण्या विद्वानांचें मत तसें आहे, वगैरे अनेक गोष्टी चर्चेच्या रूपानें एकदम चव्हाट्यावर आल्या.

ही सर्व चर्चा वाचून गतवर्षी हैद्राबादला मोठया विजयी मुद्रेनें माझी एक चूक माझ्या पदरांत घालूं पाहाणाऱ्या एका मुलीची मला आठवण झाली. 'सायंकाल' मधला 'अशोकाचीं फुलें' हा लघुनिबंध तिनें वाचला होता.

त्यांत अशोकाच्या फुलांच्या तांबड्या रंगाचें वर्णन मी केलें आहे. त्या मुलीनें मला प्रश्न विचारला, ' अशोकाच्या फुलांचा रंग कसा असतो ? ' मी चटकन् उत्तर दिलें ' तांबडा. ' ती उद्गारली ' छे: ! ' मी हंसत म्हणालों, ' मी अशोकाचीं फुलें पाहिलीं आहेत ! ' ती उत्तरली ' मीही पाहिलीं आहेत ! ' या वादाचा निकाल लावण्याकरतां कुणीतरी अशोकाचें झाड मला दाखविलें. तिच्या आक्षेपाचें कारण लगेच माझ्या लक्षांत आलें. त्या झाडावर पिवळसर फुलें दिसत होतीं. तिची टीका यथार्थ होती यात शंकाच नाहीं पण या सर्व प्रकरणांत माझी तरी काय चूक होती ? हैद्राबादेंत ज्या झाडाला अशोक म्हणतात त्याच्याहून कोंकणांतला अशोक सर्वस्वीं भिन्न आहे !

रूपककथा या नांवाच्या बाबतींत असाच थोडासा घोटाळा होत आहे. इसापापासून जिब्रानपर्यंत भिन्नभिन्न काळांतल्या आणि निरनिराळ्या देशांतल्या प्रतिभावंतांनीं कथेचा हा चिमुकला पण चटकदार प्रकार लोकप्रिय केला आहे. त्या सर्वांच्या कथांना अनुरूप होऊं शकेल असें नांव मला हवें होतें. केवळ अलंकारावरूनच कथाप्रकारांचीं नांवें निश्चित करायचीं असतीं तर रूपककथा, उपमाकथा, उत्प्रेक्षाकथा, वगैरे पन्नास नांवें काव्याच्या जातीप्रमाणें कथांच्या शीर्षकांवर घालून उथळ पांडित्य मला प्रगट करतां आलें असतें. रूपककथा ही अनेकदां अन्योक्तीसारखी असते किंवा भासते हें कांहीं खोटें नाहीं. नऊ-दहा वर्षांपूर्वी ' दंवबिंदु ' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेंत मी तिच्याविषयीं तसा स्पष्ट उल्लेखही केला होता ! पण अन्योक्तिकथा, प्रतीककथा, वगैरे अनेक नांवें माझ्या डोळ्यांपुढें तरळत असूनही शेवटीं मी ' रूपककथा ' हें नांव निश्चित केलें, तें एका विशिष्ट कारणामुळें. बंगालीमधें परीकथांना ( fairy tales ) रूपकथा म्हणतात हें त्या वेळीं मला ठाऊक नव्हतें. पण कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध, वगैरे विविध वाङ्मयप्रकारांचीं नांवें विशेष अर्थवाहक नसूनसुद्धां रूढी-मुळेंच आपल्या अंगवळणीं पडलीं आहेत अशा कुठल्याही शब्दांत अव्याप्ति किंवा अतिव्याप्ति हा दोष उत्पन्न होणारच, इत्यादि गोष्टी त्या वेळींही मला जाणवत होत्या. ' चकोर व चातक ' ही माझी पहिली रूपककथा लिहितांना मी जरी इसापापासून स्फूर्ति घेतली नसली, तरी ती त्याच्याच वळणाची गोष्ट आहे हें ती लिहितांलिहितांच माझ्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. या प्रकारच्या कथेचे विषय काळाबरोबर बदलत गेले, तिचा टीकात्मक दृष्टिकोन अधिक

अधिक व्यापक, सामाजिक व सर्वस्पर्शी होत राहिला, रवींद्रासारख्या एखाद्या प्रतिभासंपन्न कवीला अशा कथेला प्रसंगीं काव्यमय स्वरूप देतां आलें, तरी अशा छोटया गोष्टींची आत्मशक्ति कधींही बदलणार नाहीं, हेंही त्याच वेळीं मला कळून चुकलें. त्या शक्तीचें स्वरूप जाणण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. काळ, विषय, मांडणी, इत्यादिकांच्या दृष्टींनीं अत्यंत भिन्न असलेल्या अशा अनेक कथांची तुलना करतां करतां एक गोष्ट तीव्रतेनें मला जाणवूं लागली. या प्रकारच्या कथांचें सामर्थ्य सूचकतेनें पण अचूक रीतीनें केलेल्या सत्यदर्शनांत आहे. जग अष्टौप्रहर तोंडावर मुखवटे घालून आपले व्यवहार पार पाडीत असतें. व्यक्ति आणि समाज यांचीं बाह्य रूपें स्वार्थलंपटतेमुळें बहुधा फसवीं ठरतात. या सर्वांचें सत्यस्वरूप कळावें म्हणून त्यांच्या तोंडावरचे मुखवटे दूर करण्याचा रूपककथा कसोशीनें आणि कौशल्यानें प्रयत्न करीत असते.

हें काम उघड उघड करण्यांत कला नाहीं. म्हणून राक्षसांना फसविण्याकरतां विष्णूनें जसें मोहिनीरूप घेतलें, तशी रूपककथाही आपलें मूळचें रूप बदलते. जगांतल्या दंभाचे आणि स्वार्थाचे अगणित मुखवटे हलक्या हातानें दूर करण्याकरतां तिलाही आपल्या तोंडावर एक सुंदर मुखवटा चढवावा लागतो. अर्थात् तिचें स्वरूप नेहमींच दुहेरी असतें.

या विचारानीं प्रेरित होऊन मी 'रूपकथा' या नांवाची निवड केली. पण तें कानाला फारसें गोड लागेना. इतक्यांत मला कोंकणांतल्या देवळांत वापरल्या जाणाऱ्या एका शब्दाची आठवण झाली. तो शब्द म्हणजे 'रूपडें.' तिथल्या देवळांत अंगांत येणाऱ्या वाऱ्यांचें स्तोम पुष्कळच असतें. हे वारे निरनिराळे असतात. प्रत्येक वाऱ्याचा एक देव असतो. त्या देवाची मूर्ति म्हणजे एक दांडा व त्या दांडयाच्या वर लावलेला पितळी मुखवटा. अशा मुखवट्याला तिकडे रूपडें म्हणण्याचा प्रघात आहे. 'रूपडें' मधला सर्व अर्थ—यांतून प्रगट होणारी छोटेपणाची छटासुद्धां—रूपक या शब्दांतून स्पष्ट होईल असें मला वाटलें आणि मी 'रूपककथा' हा शब्द वापरूं लागलों.

• • •

या कथांच्या अनुवादपद्धतीविषयींही थोडासा खुलासा करणें इष्ट होईल. जिब्राननें 'मॅडमन्' या पुस्तकाच्या नांवाखालीं Parables And

Poems असें स्पष्टीकरण केलें आहे. रूपककथा व गद्यकाव्य यांच्या सीमा एकमेकींना अगदीं बिलगलेल्या असल्यामुळें त्याच्या ज्या लिखाणाला कथा म्हणतां येणार नाहीं असें मला वाटलें, त्याचा मी या अनुवादांत अंतर्भाव केलेला नाहीं. ज्यांना मी कथा म्हणून संबोधीत आहें, त्यांतसुद्धां गद्यकाव्या-कडे ज्यांचा कल अधिक झुकला आहे, अशा एक दोन गोष्टी आहेतच. अनुवाद करतांना मी फारसें स्वातंत्र्य घेतलें नसलें तरी कथेचा अर्थ गूढ राहूं नये म्हणून कांहीं ठिकाणीं मी जाणूनबुजून फरक केले आहेत. Sparrow म्हणजे चिमणी हें मी इंग्रजी पहिलींतच पाठ केलें होतें. पण तो अर्थ धरून 'दोन पिंजरे' या कथेनें माझें समाधान होईना. म्हणून मी चिमणीचें रूपांतर मैनेंत केलें आहे. हा जादूचा प्रयोग कदाचित् मूर्खपणाचाही असूं शकेल! जिब्रान-सारख्या प्रतिभासंपन्न तत्त्वज्ञाच्या रूपककथेंत इंद्रधनुष्याप्रमाणें एकाच वेळीं अनेक रंगांचें संमेलन झालेलें असतें. त्यांतल्या एकाच रंगानें आकृष्ट होऊन मी केलेलें प्रत्येक कथेचें विवेचन प्रसंगीं एकांगी वाटलें, किंबहुना चुकीचें ठरलें तर त्यांत नवल नाहीं. या कथांविषयीं वाचकांच्या मनांत आवड उत्पन्न झाली कीं माझ्या विवेचनाचें कार्य संपलें.

जिब्रान व रवींद्र हे दोघेही महाकवि होते. दोघांनींही रूपककथा लिहिल्या आहेत. पण जिब्रानच्या मानानें रवींद्रांच्या कथा फार सुबोध आहेत. त्यांत वर्णन केलेल्या अनुभूतींशीं वाचकाच्या कल्पनेला सहज समरस होतां येतें. त्याची मांडणीही नेहमींच्या कथांप्रमाणें सरळ असते. त्यांत मानवी स्वभावाच्या ज्या वैगुण्यावर प्रकाश टाकलेला असतो, तेंही सामान्य माणसाच्या सदसद्-विवेकबुद्धीला केव्हांना केव्हां तरी चाटून गेलेलें असतें. उदाहरणार्थ 'सुप्रिया' ही रवींद्रांची गोष्ट पहावी. वैभव, शौर्य आणि धर्मनियमांचें पालन हीं सेवावृत्तीपुढें फिकीं आहेत, जगांतलें दुःख नाहींसें करण्याची शक्ति हिऱ्यामोत्यांत नाहीं, भालेतरवारींत नाहीं आणि जपतपांतही नाहीं; ती दुसऱ्याचें दुःख पाहून द्रवणाऱ्या आणि अहंकार सोडून त्याच्या सेवेसाठीं सज्ज होणाऱ्या मनुष्या-च्या चिमुकल्या हृदयांत आहे, हें खालील छोटी गोष्ट वाचतांच प्रत्येकाला सहज पटतें कीं नाहीं हें पाहण्याजोगें आहे. या गोष्टींतली रत्नाकर, जयसेन व धर्मपाल हीं नांवेंसुद्धां जितकीं सूचक तितकींच सुबोध आहेत.

'दुष्काळानें कहर मांडला होता. बुद्धदेवांनीं आपल्या सर्व मोठमोठ्या अनुयायांना बोलावून आणून प्रश्न केला, 'भुकेनें व्याकुळ झालेल्या माणसांना अन्न द्यायचं काम अंगावर घ्यायला तुमच्यापैकीं कोण सिद्ध आहे ?'

रत्नाकरानें—नवकोट नारायण होता तो—निमूटपणें मान खालीं घातली. क्षणभर थांबून तो म्हणाला, 'लाखों उपाशी जीवांना पोसायचं सामर्थ्य मला नाहीं महाराज ! माझी सारी संपत्ति छे ! या कार्याच्या मानानं कवडीमोल आहे ती !'

सेनापति जयसेन उद्गारला, 'मी मोठ्या आनंदानं माझं रक्त सांडायला तयार आहें. पण-पण आज माझ्याच घरांत पुरेसं अन्न नाहीं !'

धर्मपाल उठला. क्षितिजापर्यंत पसरलेल्या शेंकडों मोठमोठ्या शेत्रांचा धनी होता तो ! तो सुस्कारा सोडून म्हणाला, 'अवर्षणानं माझी सारीं शेतं वाळून गेलीं. सरकारसारा कसा भरायचा या काळजींत आहें मी भगवन् !'

हळुहळु सुप्रिया उभी राहिली. ती एका दरिद्री भिक्षुकाची मुलगी होती. सर्वांना अभिवादन करून नम्रपणानें ती म्हणाली, 'मी साऱ्या भुकेल्या माणसांना अन्न देईन !'

सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला !

ते एकदम ओरडले, 'तू ! छे: ! अशक्य ! अगदीं अशक्य !'

सुप्रिया म्हणाली, 'मी तुम्हां सर्वांपेक्षां गरीब आहें. पण दारिद्र्य ही माझी शक्ति आहे. तुमच्यापैकीं प्रत्येकाच्या घरात माझी तिजोरी आहे. तुमच्यापैकीं प्रत्येकाच्या घरांत माझी धान्याची कोठी आहे !'

जिब्रानच्या गोष्टी इतक्या सोप्या नाहींत. काव्य, टीका व तत्त्वज्ञान या तिन्हींचा संगम साधून तो कथेच्या रूपानें अतिशय सूचक रीतीनें व्यक्त करणें त्याच्या प्रतिभेला आवडतें. पहांटेच्या दाट धुक्यामुळें आपल्या भोंवतीं समुद्राला लाजविणारें सौंदर्य निर्माण होतें. पण त्याच धुक्यामुळें हाताच्या अंतरावर असलेल्या वस्तूसुद्धां अंधुक अंधुक दिसूं लागतात. जिब्रानच्या अनेक कथा अशाच आहेत. 'दानशूर,' 'दोन पंडित,' 'दोन संन्याशी,'

इत्यादि गोष्टींत मानवी स्वभावाचीं जीं वैगुण्यें जिब्राननें दिग्दर्शित केलीं आहेत, तीं दैनंदिन व्यवहारांत पुनःपुन्हां दिसत असल्यामुळें या कथांची वेधकता आपल्याला चटकन् जाणवते. पण 'दोन पिंजरे,' 'दोन विद्या,' 'कबरस्थानांतला नोकर,' इत्यादि कथांत लेखकाला ज्या अनुभूतीची प्रचीति रसिकाला घडवायची आहे, ती सूक्ष्म व गूढ असल्यामुळें आणि तिचा आविष्कार अत्यंत संयमानें केला गेल्यामुळें, वाचक थोडासा गोंधळांत पडल्यावांचून राहत नाहीं. पण याबद्दल जिब्रानला जबाबदार धरणें अन्यायाचें होईल. सतारीच्या गतींतलें तरल सौंदर्य जाणवून डोलूं लागायला श्रोताही वादकाइतकाच रसिक असावा लागतो. कांहीं कांहीं श्रोत्यांना वादकाची नाजुक कला कळत नाहीं म्हणून सतार बाजाच्या पेटीप्रमाणें वाजविली जावी असें कांहीं कुणी प्रतिपादन करणार नाहीं.

'कोल्हा,' 'शहाणा कुत्रा,' 'तीन मुंग्या,' इत्यादि रूपककथावरून जिब्रान हा इसापच्या पद्धतीनें रूपककथा लिहितो असा एक समज निर्माण होण्याचा संभव आहे; पशुपक्ष्यांचा पेहराव चढवून मानवी जीवनांतील विसंगति प्रगट करण्याचें कसब इसापाप्रमाणें त्यालाही साधलें आहे. पण हें चातुर्य सामान्यतः कुठल्याही चांगल्या रूपककथाकाराच्या अंगीं असतेंच असतें! जीवन-विषयक विशाल दृष्टिकोन हा जिब्रानच्या प्रतिभेचा असामान्य विशेष आहे. त्याच्या कथांतून सद्बोध सूचित होत असेल, जीवनांतलीं वैगुण्येंही त्यांत नाजुकपणानें प्रतिबिंबित होत असतील; पण या गुणांमुळें कांहीं त्यांच्यांतली अवीट गोडी निर्माण झालेली नाहीं. उत्तुंग शिखरावरून वेगानें उड्डाण करणाऱ्या गरुडानें पर्वतपठारावरून आपल्या बिळाकडे सळसळत सुटलेल्या सर्पाला डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच पकडावें, तशी त्याच्या रूपककथेची झेंप वाटते. व्यक्तिजीवन आणि सामाजिक जीवन यांतल्या अत्यंत सूक्ष्म अशा विसंवादांवर तो सहजासहजीं विदारक प्रकाश टाकतो! मानवाची आत्मपूजा आणि आत्मवंचना, मुत्सद्यांचे मुखवटे, पंडितांचें पोकळ पांडित्य, धार्मिकांचें तकलुपी पावित्र्य, हे सारे त्याच्या टीकेचे विषय होऊं शकतात. आजचें जग आणि आजचा मनुष्य या दोघांचेंही अंतरंग कुजलें आहे हें क्ष किरणांपेक्षांही भेदक अशा आपल्या दृष्टीनें जिब्रान पाहूं शकतो. त्या अंतरंगाची घाण लपविण्याकरितां मनुष्य

आणि समाज आपआपल्या अंगांना तऱ्हातऱ्हांचीं अत्तरें फासून त्यांचा घमघमाट सर्वत्र पसरविण्याचा आटापिटा करीत आहेत हेंही तो जाणतो. पण ही अंतरंगांतली घाण लवेंडराचीं पिंपें ओतून किंवा अत्तराचे फाये उधळून कमी होणार नाहीं हें त्याला पक्कें ठाऊक आहे. व्यक्ति आणि समाज यांना नव्या जीवनमूल्यांचा साक्षात्कार झाला तरच यापुढें मानवता सुखी होण्याचा संभव आहे, हें ओळखून तो कथारूपानें त्यांना त्या मूल्यांचें दर्शन घडवितो.

सर्व मोठ्या लेखकांचें जीवितकार्य हेंच असतें हें खरें ! पण अनेक लेखकांमध्यें प्रतिभेचा एखादाच विशेष प्रभावी होत जातो आणि त्यामुळें त्यांचें साहित्य अत्यंत आकर्षक वाटलें तरी जीवनमूल्यांचे टीकाकार आणि मानवधर्माचे द्रष्टे या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहणाऱ्या सर्वसामान्य मनुष्याचें ते समाधान करूं शकत नाहींत. याच कारणामुळें उत्तुंग कल्पकतेचे कवि जगाच्या दृष्टीनें स्वप्नाळु ठरतात, उत्कृष्ट उपरोध साधणारे पंडित सामान्य मनुष्याला श्रद्धाहीन वाटतात, आणि मोठमोठे तत्त्वज्ञ मनुष्यासाठीं तत्त्वज्ञान आहे, तत्त्वज्ञानासाठीं मनुष्य नाहीं, हें विसरून जीवनाकडे पाठ फिरवून हवेंत मनोरे उभारीत असलेले दिसतात. जिब्रानमध्यें या तिन्ही असामान्य गुणांचा समन्वय झाला असल्यामुळें एकाच वेळीं तो कवि, टीकाकार, आणि तत्त्वज्ञ या भिन्न भूमिकांचा संमिश्र व सरस असा आविष्कार करूं शकतो. अशा गोड आणि गंभीर मित्राचा सहवास सदैव लाभावा असें कुणाला वाटणार नाहीं ?

निदान मी तरी माझ्या लेखनाच्या खोलींतल्या कपाटांत जिब्रानच्या इतर पुस्तकांकरतां जागा राखून ठेवली आहे.

दुसऱ्या आवृत्तींत कवितेचा गद्य अनुवाद दिला आहे.

पुणें,
२०-९-४४

वि. स. खांडेकर

# भाग पहिला

## कथा


दोन मनें
कोल्हा
नवें सुख
ज्योतिःशास्त्रज्ञ
युद्ध !
गवताचें पातें
डोळा
दोन पंडित
देवळाच्या पायऱ्यांवर
डाळिंबाचे दाणे
कबरस्थानांतला नोकर
दोन संन्याशी !
शहाणा राजा
तीन मुंग्या
दुसरी भाषा
दोन पिंजेर
दानशूर
भाग्यशाली शहर
शहाणा कुत्रा
बुजगबाहुलें
दोन देव
महत्त्वाकांक्षा
ईश्वर
महासागर

## दोन मनें 1

माझ्याच गांवांतली गोष्ट ! त्या घरांत माणसं सारीं इन मीन दोन होतीं ! एक आई आणि दुसरी तिची मुलगी !

मात्र या दोघींनाही एक विचित्र संवय होती. अपरात्रीं दोघीही झोंपेंत चालूं लागायच्या-अगदीं लांब लांब जायच्या ! त्यांना ना थंडगार वाऱ्याची शुद्ध ना काळोखाचं भय !

एके दिवशीं रात्रीं असेंच झालें.

शांततेच्या कुशींत सारें जग गुडुप झोंपीं गेलें होतें. पण या दोघी झोंपेंतच चालूं लागल्या.

धुक्यानें भरलेल्या एका बागेंत त्यांची गांठ पडली.

दोघी अगदीं जवळ जवळ आल्या.

लगेच आई मुलीकडे पाहत आणि दांतओंठ खात ओरडली, 'सांपडलीस कीं नाहीं शेवटीं ? राक्षसीण कुठली ! मागच्या जन्मींची वैरीण आहेस तूं माझी ! तूं-तूं—माझ्या तारुण्याचा नाश केलास. माझ्या सौंदर्याचा सत्यानाश तूं केलास. माझ्या आयुष्याचं मंदिर मोडून, पाडून अगदीं धुळीला मिळवून तिथं तूं आपल्या आयुष्याची बाग फुलविलीस. असं वाटतं—दोन्ही हातांनीं तुझा गळा घट्ट दाबावा नि—'

मुलगी रागारागानें आईकडे पहात तीव्र स्वरानें उद्गारली, 'आप्पलपोटी म्हातारडी कुठली ! तुझं तोंडसुद्धां पाहूं नये असं वाटतं मला ! तूं-तूं-माझ्या आत्म्याच्या स्वातंत्र्याचा नाश केलास. माझ्या विकासाच्या आड तूं आलीस. माझं आयुष्य-तुझ्या दुबळ्या, भिकारड्या जीवनाचा नुसता प्रतिध्वनि आहे तो ! कुणाला असलं जिणं आवडेल ? जा थेरडे, मर जा ! '

अगदीं याच क्षणीं पहिला कोंबडा आरवला. मायलेकी एकदम जाग्या झाल्या.

आईनें बाहू पसरून मृदु स्वरानें विचारलें, ' पोरी, तूंच का ती ? '

आईच्या मिठींत स्वतःला गुरफटून घेत मुलीनें मृदु स्वरानें उत्तर दिलें, ' होय आई. मीच ती – तुझी लाडकी लेक ! '

● ● ●

या रूपककथेचें मूळ नांव ' Sleep-Walkers '( झोंपेंत चालणाऱ्या मायलेकी ) असें आहे. पण तिच्यांत सूचित केलेलें कठोर सत्य ' दोन मनें ' या नांवानेंच अधिक व्यक्त होतें असें मला वाटतें. कल्पनेची चमत्कृति, टीकेची मर्मभेदकता, जीवनविषयक कटु सत्य सूचक रीतीनें सागण्याची कुशलता आणि या सर्व गुणांचा समन्वय प्रभावी रीतीनें करणारी प्रतिभेची विशालता हे रूपककथेला आवश्यक असलेले सर्व गुण या चिमुकल्या गोष्टींत आढळतात. मात्र या दुर्मिळ संगमामुळेंच अनेकांना ही कथा गूढ किंबहुना दुर्बोध वाटते. पण तिची गूढता हा नुसता आभास आहे. समुद्राच्या पृष्ठभागावर सुंदर फेंस तेवढा आढळतो; मोत्यें कांहीं तरंगत नाहींत. तीं हस्तगत करायला पाणबुड्यांना समुद्राचा तळच गांठावा लागतो. जीवनविषयक सूक्ष्म सौंदर्यें आणि सत्यें यांच्या बाबतींतही हेंच लक्षांत ठेवलें पाहिजे.

मानवी जीवितांतलें एक गूढ विचित्र सत्य जिब्राननें या कथेंत सूर्यप्रकाशा-इतकें स्पष्ट करून दाखविलें आहे. आईची मुलीवरली नैसर्गिक माया किंवा मुलीचें आईवरलें स्वाभाविक प्रेम यांच्या उत्कटत्वाविषयीं जगात कुणीतरी शंका घेईल का ? आई ही स्वर्गाहून श्रेष्ठ आहे, माता ही जन्म-भूमीइतकीच पूज्य आहे, असें जें मोठमोठे कवी म्हणतात तें काय केवळ कल्पनेची चमत्कृति साधण्याकरितां कीं अलंकारिक भाषेचा मोह त्याना आवरतां येत नाहीं म्हणून ?

पण बहुतेक कवी नेहमीं अर्धसत्येंच सांगतात. मानवी मनाची एकच बाजू पाहण्याची त्यांना संवय होत जाते. मनुष्याचें मन मोठें विचित्र आहे. सौंदर्यलोलुप आणि भावनावश कवींच्या हातांत तें कधींच पुरें सापडत नाहीं ! पृथ्वीचा अर्धा भाग सूर्यप्रकाशांत नाहून निघत असतांना तिच्या दुसऱ्या अर्ध्या भागांत अंधार भरलेला असतोच कीं नाहीं ? मनुष्यही तसाच आहे. जागेपणीं किंवा समाजांत वावरत असताना तो ज्या भावना प्रदर्शित करतो त्याच झोंपेंत किंवा एकांतांत त्याच्या मनात वावरत असतात, असें मुळींच नाहीं. जागेपणीं किंवा चार-चौघांत मनुष्य नकळत सामाजिक होतो — त्याला तसें व्हावेंच लागतें. त्या वेळीं निसर्गापेक्षां संस्कारांचा पगडा त्याच्यावर अधिक असतो. तो समाजाला आवडणाऱ्या मनुष्याची भूमिका यशस्वी रीतीनें करण्याचा प्रयत्न करीत असतो. पण झोंपेंत किंवा एकांतांत त्याची ही सामाजिक जाणीव नाहींशी होते, त्याच्यांतला निद्रित निसर्ग जागृत होतो. आणि मग ?

मग त्या क्षणीं मायलेकीसुद्धां वैरिणीसारख्या वागतात. आईचें सारें वात्सल्य पूर्णपणें लोप पावतें. आपला जीवनरस शोषून घेऊन जन्माला आलेल्या मुलीनें आपलें यौवन नाहींसें केलें या गोष्टीचीच तिला तीव्र जाणीव होते. तिच्या आंधळ्या अहंनिष्ठतेला मातृपदाचें मोठेपण मुळींच दिसत नाहीं.

आईप्रमाणें मुलीचेंही अगदीं खोल खोल लपवून ठेवलेलें मन अशा क्षणीं उसळून बाहेर येतें. स्वतःचा जीव धोक्यांत घालून आपल्याला जन्म देणाऱ्या मातेची माया तीही विसरून जाते. तिचा दुखावलेला मीपणा क्रुद्ध नागाप्रमाणें फणा वर करून उभा राहतो. आनुवंशिकतेच्या चिवट दोरखंडांनीं आपण जखडले गेलों आहों या गोष्टीचीच तीव्र जाणीव तिला होते !

बाप आणि मुलगा किंवा आई आणि मुलगी यांचें उत्कट प्रेम आणि तीव्र कलह अनेक प्रतिभावंत कलावंतांनीं आतांपर्यंत चित्रित केले आहेत. वडील पिढी व तरुण पिढी यांच्यांतला विरोध, वात्सल्य आणि प्रेम यांना न जुमानतां वर उसळून येणारा विरोध हा ललितलेखकांचा नेहमींचा आवडता विषय आहे, यांत शंका नाहीं. पण तो रंगवितांना काळामुळें घडलेलीं स्थित्यंतरें, दोन पिढ्यांच्या राजकीय आणि सामाजिक कल्पनांत पडलेलें अंतर किंवा जीवनमूल्यांच्या बाबतींत उद्भवलेला मतभेद यांचा जिब्राननें आधार घेतलेला नाहीं. मानवी मनांतच जें द्वंद्व आहे – केवळ स्वतःकरतां अगदीं स्वच्छंद रीतीनें जगण्याची उत्कट वैयक्तिक इच्छा आणि दुसऱ्याकरतां जगावें लागल्यामुळें निर्माण झालेले प्रभावी सामाजिक संस्कार यांच्यांत जो अव्याहत झगडा सुरू आहे, त्याचें चित्र अतिशय नाजुकनें त्यानें रेखाटलें आहे. जुनी पिढी नव्या पिढीवर ताबा गाजवूं इच्छिते याचें कारण कांहीं केवळ तिची वडिलकी हेंच नसतें. आपल्या आयुष्यांतल्या कितीतरी उन्मादकारक सुखांचा पुढच्या पिढीसाठीं तिला त्याग करावा लागलेला असतो. नवी पिढी जुन्या पिढीविषयीं मनांत एक प्रकारची तिरस्काराची भावना बाळगते याचें कारण तिला जगाचा अनुभव नसतो एवढेंच नाहीं. रूप, गुण, स्वभाव, महत्त्वाकांक्षा, इत्यादिकांच्या बाबतींत आनुवंशिकतेनें ज्या शृंखला तिच्या पायांत घातलेल्या असतात त्यांचा जाच तिला असह्य होतो !

जगांत वात्सल्यरससुद्धां निर्भेळ नाहीं. आईबापांच्या सुखांची राख मिळाल्याशिवाय मुलांच्या जीवनलतिका फुलत नाहींत. बरें, त्या मुलांचा

जीवनाचा आनंद तरी पूर्ण आहे ? छे ! त्यांचें स्वातंत्र्य आनुवंशिकतेच्या शृंखलांनीं आधींच मर्यादित केलेलें असतें.

मात्र हें विचित्र सत्य स्पष्टपणें सांगणारा लेखक निराशावादी नाहीं. मनुष्य दुष्ट नाहीं; पण तो दुहेरी आहे—तो जेवढा सामाजिक आहे, तेवढाच वैयक्तिक आहे —हें केव्हांही विसरू नका, एवढेंच त्याला सुचवा-यचें आहे. सामाजिक संस्कारांनीं मनुष्य कितीही सुधारला, त्याला बाहेरून अगदीं देवकळा आली, तरी त्याच्या अंतरंगांतला निसर्ग कधींही नाहींसा होत नाहीं, ही या कथेची शिकवण ' नवें जग ' निर्माण करणाऱ्या सर्व ध्येयवाद्यांनीं नेहमींच लक्षांत ठेवायला हवी.

## कोल्ह्या २

सूर्य नुकताच उगवला होता.

कोल्ह्यानें आपल्या सावलीकडे पाहिलें. आणि तो स्वतःशीच उद्गारला, 'आज उंटाशिवाय कांहीं आपली भूक भागायची नाहीं बुवा!'

सारी सकाळ स्वारी उंट शोधीत फिरत होती!

दुपार झाली.

कोल्ह्यानें आपल्या सावलीकडे पुन्हां पाहिलें —

आणि तो स्वतःशीच पुटपुटला, 'उंदीरसुद्धां चालेल म्हणा मला!'

● ● ●

चांगल्या रूपककथेंत मार्मिकतेबरोबरच मर्मभेदकताही कशी असूं शकते हें या छोट्या गोष्टीवरून सहज दिसून येईल. आयुष्याच्या आरंभीं आपणांत कांहींतरी अलौकिकत्व आहे असें कुणाला वाटत नाहीं? आत्मपरीक्षणाच्या बाबतींत मनुष्य नेहमींच आंधळा असतो. त्यामुळें सामान्य व्यक्तीसुद्धां स्वतःविषयीं नेहमीं विलक्षण कल्पना करून घेत असते! तिला वाटतें—कीर्तीच्या काय, प्रीतीच्या काय किंवा संपत्तीच्या काय, शिखरावर लीलेनें

विराजमान होण्याकरतांच आपला जन्म आहे. या पर्वतांची चढण कितीही बिकट असली तरी त्यांच्या पायथ्याशीं घुटमळणारे लोक निराळे आणि आपण निराळे !

पण सूर्य वर येऊं लागला कीं पहांटे मोत्याप्रमाणें चमकणारे दंवबिंदु विरघळून जातात ना ? आयुष्याच्या सत्य पण तीव्र अनुभवानें या आत्मनिष्ठ माणसांचीं स्वप्नेंही तशींच विरून जातात.

या गोष्टींतल्या कोल्ह्याला आपली सूर्योदयाच्या वेळची लांबलचक सावली पाहून मोठेपणाचा जो भ्रम झालेला असतो, तो तीच सावली दुपारीं टीचभर झालेली पाहून नाहींसा होतो. उंटाची भूक उंदरावर भागविण्यापर्यंत त्याची मजल पोंचते ! स्वतःविषयीं भलत्या कल्पना बाळगणारांचीही आयुष्यांत पुढें हीच गत होते.

या गोष्टींतला कोल्हा हें सामान्य मनुष्याच्या आत्मवंचनेचें प्रतीक आहे. लहानपणीं प्रत्येक पद्यकाराला आपण महाकवि होणार असेंच वाटतें. पण शेवटीं त्यांतला एखादाच खराखुरा कवि होतो ! अठराव्या वर्षीं प्रत्येक मुलीच्या मनांत येतें, कुणीतरी फार मोठा पुरुष आपल्यासाठीं वेडा होऊन आपल्याला माळ घालायला धांवत येणार आहे. पण पुढें तिशींत तीच मुलगी मिळेल त्या पुरुषाशीं लग्न करायला तयार होते ! पंचविसाव्या वर्षीं प्रत्येक तरुणाला भास होतो—जगांत क्रांति घडवून आणण्यासारखें आपल्या-पाशीं कांहींतरी विशेष आहे. पन्नाशींत गेल्यावर त्याला कळून चुकतें कीं आपण कारकुनी तेवढी फार चांगली केली.

जीवनाचा साक्षात्कार स्वप्नाळु कल्पनेनें कधींच होत नाहीं. जीवनाचें साफल्य नुसत्या गोड आभासांत नाहीं. तें कटु असलेल्या अनुभवांतच आहे.

## नवें सुख

३

काल रात्रीची गोष्ट.

एका नवीन सुखाची कल्पना मला सुचली.

त्या सुखाचा मी पहिलावहिला अनुभव घेणार तोंच दोन व्यक्ती माझ्या घराकडे वेगानें धांवत येत असलेल्या दिसल्या मला! त्यांतली एक — देवदूत होता तो!

नि दुसरी? तो सैतान होता.

माझ्या दारांतच त्यांची गांठ पडली. क्षणार्धांत दोघांचें युद्ध सुरू झालें.

त्यांच्या भांडणाचें कारण?

माझ्या नव्या सुखाविषयींच वाद चालला होता त्यांचा!

देवदूत ओरडून म्हणत होता, 'पाप आहे, मोठं पाप आहे हें!'

सैतान तारस्वरानें उत्तर देत होता, 'छे:! हें पुण्य आहे. याच्यासारखं पुण्य नाहीं दुसरं!'

● ● ●

या चिमुकल्या गोष्टींत लेखकानें मानवी मनावर किती मजेदार रीतीनें प्रकाश टाकला आहे! पाप आणि पुण्य, नीति आणि अनीति यांच्या पलीकडे

जाऊन अगदीं साध्या गोष्टीचा सुद्धां मनुष्याला कधींतरी विचार करता येतो का ?

टिळक-आगरकारांच्या वेळीं पंचहौद मिशनमध्यें कांहीं लोकांनीं चहा घेतल्याबद्दल जें वादळ निर्माण झालें, तें अक्षरशः चहाच्या प्याल्यांतलें वादळ होतें. पण त्या काळांत तें कुणालाच इतकें साधें नि सौम्य वाटलें नाहीं. उलट त्या भयंकर वादळानें त्या वेळीं सारें पुणें उलथेंपालथें होऊन गेलें, स्नेहसंबंधांचे दृढमूल वृक्ष एका क्षणांत उन्मळून पडले आणि या संकटांतून सहीसलामत बाहेर पडतां पडतां मोठमोठ्यांच्या नाकीं नव आले. आज तो इतिहास वाचतांना आपल्याला हंसू येतें. पण लुटपुटीची ती लढाई त्या काळांतली खरीखुरी लढाई होती.

अशा अनंत लढाया प्रत्येक पिढीच्या वांटयाला येतात. प्रत्येक व्यक्तीलाही आपल्या आयुष्यांत त्या लढाव्याच लागतात. या निरर्थक कलहांत मानव-जातीची केवढी तरी शक्ति निष्कारण खर्च होत असते !

असें कां व्हावें ?

मनुष्य देवदूतही नाहीं आणि सैतानही नाहीं ! तो मनुष्य आहे ! असें असतांना त्याचें जीवनविषयक तत्त्वज्ञान निश्चित करण्याचा अधिकार देवदूत किंवा सैतान यांच्याकडे देणें यापेक्षां अधिक मोठी चूक कुठली असूं शकेल ? मनुष्याच्या पापपुण्याची खरी कसोटी एकच आहे—मानवता ! पण जुने-पुराणे संस्कार पुसण्याची ताकद नसल्यामुळें मानवप्राणी अजून जीर्ण कल्पनांना आणि जुन्या मूल्यांना चिकटून राहत आहे. सुख समोर असूनही बिचारा पदोपदीं अकारण दुःखी होत आहे !

## ज्योतिःशास्त्रज्ञ

४

देवालयाच्या सावलींत आम्हीं दोघांनीं एक आंधळा एकटाच बसलेला पाहिला.

माझा मित्र मला म्हणाला, 'तो माणूस पाहिलास का? आपल्या देशांतला अत्यंत विद्वान असा मनुष्य आहे तो!'

मी एकटाच पुढें झालों, त्या आंधळ्या मनुष्याजवळ गेलों आणि 'नमस्ते' म्हणून अभिवादन करून त्याच्याशीं बोलूं लागलों.

थोड्या वेळानें मी म्हणालों, 'विचारतों याची क्षमा करा महाराज! पण—आपणांला अंधत्व केव्हां आलं?'

'जन्मतःच.' त्यानें उत्तर दिलं.

मी प्रश्न केला, 'आपला ज्ञान संपादन करण्याचा मार्ग कोणता?'

त्यानें हंसून उत्तर दिलें, 'मी ज्योतिःशास्त्रज्ञ आहें.'

आणि मग आपल्या छातीवर हात ठेवून तो म्हणाला, 'इथं भ्रमण करणाऱ्या सूर्यचंद्रांचें आणि ताऱ्यांचें मी निरीक्षण करीत असतों!'

• • •

अंतर्मुख झाल्याशिवाय मनुष्याला पूर्ण ज्ञानी होतां येणें शक्य नाहीं, हें मोठ्या कुशलतेनें या कथेंत सूचित केलें गेलें आहे. मानवजातीचा विकास नुसत्या बाह्य सृष्टीच्या ज्ञानानें किंवा समाजांतल्या बाह्य क्रांतीनें होणार नाहीं. त्याच्यासाठीं शेवटीं मनुष्याच्या अंतरंगाकडे वळलें पाहिजे, हा विचार ही कथा वाचतांना कुणाच्या मनांत आल्यावांचून राहील ?

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 30461
विभाग बा.वा.
क्रमांक 2547
नों. दि. 5-7-51
बाल वाङ्मय शाखा

# युद्ध !



राजवाड्यांतली रात्रीची मेजवानी मोठ्या रंगांत आली होती.

एकदम एक मनुष्य धांवत आंत आला. राजापुढें लोटांगण घातलें त्यानें. पंक्तीचे बडेबडे पाहुणे त्याच्याकडे टकमक पाहूं लागले.

किती भीषण दृश्य होतें तें! त्या माणसाचा एक डोळा बाहेर आला होता. त्या डोळ्याच्या खांचेंतून रक्त गळत होतें.

राजेसाहेबांनीं विचारलें, ' काय झालं रे तुला ? '

तो मनुष्य आवेशानें उद्गारला, ' महाराज, मला न्याय द्या. मला न्याय द्या. '

राजेसाहेब त्याचें गाऱ्हाणें ऐकूं लागले.

तो मनुष्य म्हणाला, ' महाराज, चोरी हा माझा धंदा आहे. आज अमावास्या. म्हणून एका सावकाराचं दुकान फोडायला मी गेलों. पण खिडकींतून आंत उतरतांना थोडी गफलत झाली माझी ! नि चुकून पलीकडच्या कोष्टयाच्या दुकानांतच मी शिरलों. डोळ्यांत बोट घातलं तरी तिथं दिसत नव्हतं, महाराज. मी पुढें जाऊं लागलों. नि एकदम कोष्टयाच्या मागाचं टोंक माझ्या डोळ्यांत जाऊन–माझा कांहीं गुन्हा नव्हता, महाराज. मी सरळ जात होतों; पण त्या मागानं माझा डोळा फोडला. त्या कोष्टया-विरुद्ध माझी फिर्याद आहे, महाराज. मला न्याय हवाय् !'

राजानें लगेच कोष्ट्याला बोलावणें पाठविलें.

कोष्टी आला.

राजानें तत्काळ निर्णय दिला, ' या कोष्टयाचा एक डोळा उपटून काढा. म्हणजे या चोराला बरोबर न्याय मिळेल. '

कोष्टी अदबीनें म्हणाला, ' महाराज, अगदीं धर्मराज आहांत आपण. आपला निकाल न्यायाला सर्वथैव धरून आहे यांत शंका नाहीं. माझा एक डोळा उपटून काढला पाहिजे हें आपलें म्हणणें अगदीं कायदेशीर आहे. पण-पण-महाराज, मी कोष्टी आहें. कापड विणतांना त्याच्या दोन्हीं बाजू पहायला मला दोन्ही डोळे हवेत. माझ्या शेजारीं एक चांभार राहतो. त्याचे दोन्ही डोळे शाबूत आहेत. नि त्याच्या धंद्याला कांहीं दोन डोळ्यांची जरूरी आहे असें नाहीं. महाराज, कृपा करा नि मला न्याय द्या. '

राजानें लगेच चांभाराला बोलवून आणलें.

चांभार आला.

तो घाबरून गेला होता. त्याच्या तोंडांतून शब्दच उमटेना !

राजसेवकांनीं तत्काळ त्याचा एक डोळा फोडून टाकला.

राजवाड्यातली मेजवानी पुन्हा रंगांत आली.

• • •

ही गोष्ट वाचून लेखकाचा रोख कशावर आहे हें अनेकांच्या लक्षांत पुरतेपणीं येणार नाहीं. फार फार तर जगांतल्या आंधळ्या न्यायाचें सूचक व उपरोधपूर्ण चित्र या कथेंत चित्रित केलें गेलें आहे असें त्यांना वाटेल. अशी दिशाभूल होऊं नये म्हणूनच लेखकानें आपल्या कथेला मुद्दाम ' युद्ध ' हा मथळा दिला आहे. या शीर्षकाच्या अनुरोधानें चोर, कोष्टी आणि चांभार या ह्या कथेंतल्या तीन पात्रांकडे पाहिलें पाहिजे.

जगांत युद्धें होतात तीं साम्राज्याच्या, व्यापाराच्या किंवा वसाहतीच्या लोभानें अथवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या स्वार्थी हेतूंनीं ! म्हणून

या कथेंतला चोर सरळ राजाला सांगतो, ' चोरी करणं हा माझा धंदा आहे ! ' बिचारा थोडा कमी पढलेला असावा ! नाहींतर ' चोरी करणं हा माझा धर्म आहे ' असें म्हणायलासुद्धां तो कचरला नसता ! शास्त्रोक्त चौर्यकर्म करणें हा त्याचा विशेष गुण आहे. चांदणें नसेल तेव्हांच तो चोरीसाठीं बाहेर पडतो. दुबळ्या देशांवर आक्रमण करणारीं मोठीं मोठीं राष्ट्रें तरी दुसरें काय करतात ? तींही अशाच संधीची वाट पहात असतात.

कथेंतल्या या चोराला, चूकून कां होईना, चांगलें प्रायश्चित्त मिळतें. अंधारांत सावकाराऐवजीं कोष्टयाच्या दुकानांत शिरल्यामुळें त्याचा डोळा फुटतो !

साधी उपदेशपर गोष्ट इथेंच संपली असती. पण उपदेश हा या कथेचा उद्देशच नाहीं. आजच्या जगाच्या कुजलेल्या अंतरंगावर लेखकाला प्रकाश पाडायचा आहे. त्याचा चोर हा जुल्मी, आक्रमक राष्ट्रांचा प्रतिनिधि आहे. चोरी करतांना डोळा फुटला असूनही तो तडक न्याय मिळविण्याकरतां राजाकडे जातो. ' कोष्टयाच्या मागानं माझा डोळा फुटला, तेव्हां त्याला शिक्षा झालीच पाहिजे ! ' अशी या उच्च दर्जाच्या चोराची प्रामाणिक मागणी असते. राजा लगेच कोष्टयाला बोलावणें पाठवितो हें वाचून कुठल्या वाचकाला हंसूं आल्यावांचून राहील ? मात्र तें हंसूं ओसरल्यावर सर्व राष्ट्र-परिषदेच्या अनेक बैठकांची आणि निर्णयांची त्याला आठवण झाल्यावांचून रहाणार नाहीं.

या कथेंतला कोष्टी हा मुत्सद्दी राष्ट्रांचा प्रतिनिधि आहे. चोराला न्याय मिळावा म्हणून कोष्टयाचा डोळा काढावा असें म्हणणाऱ्या राजाला तो विरोध करीत नाहीं. त्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं हें तो ओळखून असतो. मात्र आपला डोळा बचावण्याची युक्ति तो लगेच शोधून काढतो. आपल्या दुकानांत चोरी करायला शिरलेल्या गुन्हेगाराचा फुटलेला डोळा भरून देण्याची जबाबदारी जो राजा आपल्यावर लादतो, तो आपली धूर्तपणाची विनंति मान्य करीलच करील याविषयीं त्याला खात्री असते.

राजाच्या या शहाणपणाचा फायदा घ्यायचा ठरवून तो म्हणतो, ' महाराज, आपला निर्णय मला सर्वथैव मान्य आहे; पण मी कोष्टी आहें. कापड विणतांना तें दोन्ही बाजूंनीं पाहवं लागतं मला ! एक डोळा गेला तर माझा धंदा बुडेल सरकार ! माझ्या शेजारच्या चांभाराची गोष्ट निराळी आहे. एका डोळ्यानंसुद्धां त्याला आपला धंदा करतां येईल !'

न्यायदानाला उत्सुक असलेला राजा लगेच चांभाराला बोलावून आणतो.

बिचारा दुबळा चांभार ! तो कांहींच बोलूं शकत नाहीं ! लगेच त्याचा एक डोळा काढला जातो !

राष्ट्रांच्या लोभमूलक स्पर्धेतून युद्धाचा वणवा भडकतो. त्या वणव्याच्या ज्वाळांत इतरांना पुढें करून मुत्सद्दी राष्ट्रें आपली कातडी बचावतात. पण लोभाची किंवा आक्रमणाची कल्पना ज्यांच्यां मनांत स्वप्नांतसुद्धां आली नसेल, दुसऱ्याचा बळी देऊन आपलें संरक्षण करण्याची कल्पना ज्यांच्या मनाला कधीं शिवलीसुद्धां नसेल, अशीं भोळीं आणि दुबळीं पण निष्पाप राष्ट्रें त्या वणव्यांत होरपळून निघतात !

अजून जग शक्तीचें आहे, युक्तीचें आहे; तें भक्तीचें झालेलें नाहीं.

आजच्या जगांत ओरडणाऱ्या चोरांना न्याय मिळतो, चोरावर मोर होणाऱ्या धूर्तांनाही तो मिळतो. फक्त न्याय मिळत नाहीं तो अबोलक्यांना, दुबळ्यांना, निष्पापांना !

## गवताचें पातें

## ६

हिंवाळा नुक्ताच सुरू झाला होता.

झाडावरून एकामागून एक पिकलेलीं पानें गळून पडूं लागलीं.

पट्—पट्—पट्—

त्यांचा तो पट्—पट् असा कर्णकटु आवाज —

तो आवाज ऐकून धरणीमातेच्या कुशींत झोंपीं गेलेलें एक चिमणें गवताचें पातें जागें झालें. गिरक्या खात खात जमिनीवर येणाऱ्या एका पानाला तें म्हणालें, ' पडतां पडतां किती कटकट करतोयस् तूं ? तुझ्या या दंग्यानें माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चुराडा झाला की ! '

पानाला राग आला. तें चिडून म्हणालें, ' अरे जा ! चिडखोर बिब्बा कुठला ! मातींत जन्मून मातींतच लोळणाऱ्या तुझ्या-सारख्या क्षुद्र गवताच्या पात्याला आमच्या या उच्च वातावरणाची कल्पना कशी येणार ? हा दंगा नाहीं बेटा ! हें गाणं चाललंय् ! जन्मांत कधीं आ न करणाऱ्या तुझ्यासारख्या अरसिकाला तें समजायचं नाहीं ! '

हें बोलतां बोलतांच तें पान पृथ्वीवर पडलें आणि धरणी-मातेच्या कुशींत झोंपीं गेलें.

तें पुन्हां जागें झालें तें वसंताच्या संजीवक स्पर्शानें ! त्या

स्पर्शांत विलक्षण जादू होती. त्या जादूनें आतां त्या पानाचें रूपांतर गवताच्या चिमुकल्या पात्यांत झालें होतें.

पुन्हां हिंवाळा आला. थंडीनें कुडकुडत गवताचें पातें धरणीमातेच्या कुशींत लपूं लागलें—झोंपूं लागलें. पण पुनः पुन्हां त्याची झोंपमोड होऊं लागली. जिकडे तिकडे झाडांवर पानें सळसळत होतीं—पट्पट् असा आवाज करीत तीं पृथ्वीवर पडतं होतीं!

तें गवताचें पातें कपाळाला आठी घालून स्वतःशींच पुटपुटलें, 'काय हीं हिंवाळयांतलीं पानं! जीव खाऊन टाकला यांनीं अगदीं! केवढा हा कर्णकटु आवाज — छीः छी : छी :! माझ्या साऱ्या गोड गोड स्वप्नांचा चेंदामेंदा केला यांनीं!'

• • •

अगदीं साध्यासुध्या अशा नैसर्गिक गोष्टींतून मानवी स्वभावाचे वेडेवांकडे कानेकोंपरे दिग्दर्शित करण्याचें लेखकाचें सामर्थ्य या कथेंत सुंदर रीतीनें प्रगट झालें आहे. गळून पडलेलीं पानें मातींत मिळून जातात आणि पुढें त्या मातींतूनच गवताचीं चिमणीं पातीं वर डोकावून पाहूं लागतात. दोघांच्याही अंतरंगांत खेळणारा जीवनरस एकच आहे. पण झाडावरून गळून पडणारें पान आपल्या उच्च पदाचा खोटा अभिमान बाळगून गवताच्या पात्याला क्षुद्र लेखतें आणि त्या पडणाऱ्या पानाचा आवाज ऐकून आपलीं सुंदर स्वप्नें भंग पावल्याची तक्रार तें पातेंही करीत सुटतें!

मानवी जीवनांतले कितीतरी विचित्र विसंवाद या साध्या विरोधांत प्रतिबिंबित झाले आहेत. तरुण पिढीच्या बेजबाबदारपणाबद्दल बडबड करणारी वडील पिढी क्षणभर तरी आपल्या स्वच्छंदी यौवनाची आठवण करून घेऊन मग तरुणांवर तोंडसुख घेण्याची तयारी दाखविते काय?

आणि वडील पिढीच्या बडबडीकडे कपाळाला आठी घालून पाहणारी तरुण पिढी तरी प्रौढ झाल्यावर काय करते? तीही जुना कित्ताच गिरवीत

बसते ! चित्रगुप्त जर मौजेनें प्रत्येक पिढीच्या कलहांची नोंद ठेवीत असता, तर बाह्य स्वरूप कितीही बदललें तरी त्याच त्याच मनोवृत्तींची पुनरावृत्ति होत असलेली पाहून त्याला खचित हंसू लोटल्यावांचून राहिलें नसतें.

दुसऱ्याच्या जागीं स्वतःला कल्पून त्याचें सुखदुःख जाणण्याची किंवा त्याच्याशीं सहानुभूतीनें समरस होण्याची मनुष्यांत प्रवृत्तीच नाहीं. श्रीमंत मालक मजुरांच्या अज्ञानाबद्दल आणि चुकारतट्टूपणाबद्दल तासतास प्रवचनें देईल. आणि त्याच्या हाताखालचा मजूरही मालकाच्या जुलमाबद्दल व निर्दयपणाबद्दल हवा तेवढा वेळ चडफडत राहील. पण एखाद्या यक्षिणीनें त्या दोघांच्या स्थानांची अदलाबदल केली तर त्यांच्या स्वभावांत कांहीं बदल होईल का ?

छेः ! ती आशाच नको ! फरक एवढाच होईल कीं पूर्वीचा मजूर आतां मालकी हक्कानें उत्पन्न होणाऱ्या उर्मटपणाचें प्रदर्शन करीत सुटेल. आणि पूर्वीचा मालक आतां या नव्या मालकाची मनसोक्त निंदा करण्यांत आनंद मानून घेऊं लागेल.

## डोळा

७

डोळा एकदम उद्‌गारला, 'अहाहा ! किती सुंदर ! किती रम्य !'

'काय ? काय सुंदर आहे ? कांय रम्य आहे ?' कान, नाक आणि हात यांनीं डोळ्याला मोठ्या अधीरपणानें प्रश्न केला.

डोळा म्हणाला, 'तो समोरचा डोंगर—दऱ्यांच्या पलीकडे डौलानं मान उंच करून पाहणारा तो पर्वत—निळ्या धुक्याचं वस्त्र किती खुलून दिसतंय् त्याला !'

कान अगदीं एकाग्रतेनें हें ऐकत होता. तो एकदम ओरडला, 'डोंगर ? कुठं आहे डोंगर ? मला तर त्याचा आवाज मुळींच ऐकूं येत नाहीं !'

हात हंसून म्हणाला, 'डोंगर ? हं: ! डोळेदादांची नवी थाप दिसतेय् ही ! मघापासनं मी त्या डोंगराला मिठी मारायला पाहतोंय्; पण बेट्याचा साधा स्पर्शसुद्धां झाला नाहीं अजून मला !'

लगेच नाक मुरडून बोलतें झालें, 'छट् ! समोर डोंगर नाहींच मुळीं ! तो असता तर त्याचा वास आला नसता का मला ?'

बिचारा डोळा काय उत्तर देणार ?

त्यानें आपली दृष्टि दुसरीकडे वळविली.

नाक, कान आणि हात आपापसांत कुजबूजूं लागले.

ते म्हणत होते, ' या डोळ्याचं कांहीं तरी बिघडलंय् ! भ्रमबिम नाहीं ना झाला त्याला ? नाहीं नाहीं तें दिसूं लागलंय् बिचाऱ्याला ! '

• • •

ही रूपककथा वाचतांना पोट आणि शरीराचे इतर अवयव यांविषयींची इसापची सुप्रसिद्ध गोष्ट आठवल्यावांचून राहत नाहीं. इसापनें त्या गोष्टींत नेहमीं व्यवहारांत आढळणाऱ्या मनुष्यस्वभावाच्या एका वैगुण्यावर प्रकाश टाकला आहे. जिब्राननें सूचित केलेलें सत्य अधिक तात्त्विक असलें तरी तितकेंच मार्मिक आहे.

जगांतला प्रत्येक मनुष्य नकळत स्वतःला सर्वज्ञ समजतो. जें आपल्याला दिसत नाहीं किंवा आकलन करतां येत नाहीं तें जगांत असूंच शकणार नाहीं, असें त्याला अगदीं प्रामाणिकपणानें वाटतें. अंध आत्मप्रीति हा निसर्गानें ममुष्याला दिलेल्या अनेक शापांतला सर्वांत मोठा शाप आहे. या शापामुळें मनुष्य स्वतःलाच जगाचें केंद्र समजतो, आपल्या गुणांविषयीं भलभलत्या कल्पना उराशीं कवटाळून बसतो, आणि त्या विफल झाल्या म्हणजे विकृत दृष्टीनें जगाचा विचार करूं लागतो—तो निव्वळ श्रद्धाशून्य निंदक बनतो.

एकमेकांविषयीं तुच्छतेनें बोलणारे कलावंत घ्या, परस्परांविषयीं अविश्वास बाळगणारे राजकीय पुढारी पहा किंवा अहोरात्र कुरकुरत आणि धडपडत संसार-शकट हांकणाऱ्या पतिपत्नींच्या अंतरंगांत शिरा, अंध आत्मनिष्ठतेमुळेंच त्यांच्या हातून या गोष्टी घडत आहेत असें दिसून येईल. प्रत्येकाच्या ज्ञानाला, सामर्थ्याला, रसिकतेला आणि स्वभावाला अनेक मर्यादा असतात, नव्हे प्रसंगीं अत्यंत अणकुचीदार टोंकेंही असूं शकतात, याची जाणीव जो विसरत नाहीं, तो उठल्यासुटल्या दुसऱ्याकडे तुच्छतेनें कशाला पाहील ?

एखादी गोष्ट आपल्याला पटत नाहीं एवढ्यासाठींच तो तिचा तिरस्कार कशाला करील ?

हूं कीं चूं न करतां मनुष्य स्वतःच्या शरीरावर एखादी शस्त्रक्रिया करून घेऊं शकेल. पण आपल्या आंधळ्या अहंकाराचा कोंपरा देखील तो कधीं कुणाला कापूं देणार नाहीं. प्राणाची पर्वा न करतां मनुष्य अतिशय प्रबल अशा शत्रूबरोबर लढेल. मात्र स्वतःशीं लढायची कल्पनासुद्धां त्याला असह्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण मानवजातीची खरीखुरी सुधारणा व्हायची असेल, जगांत सुख आणि शांतता यांचा संसार कधींकाळीं सुरू व्हायचा असेल, मानवी जीवनांत आज ना उद्यां उदात्तता नांदायची असेल, तर मनुष्य स्वतःशीं लढायला तयार झाल्यावाचून, अहंकाराच्या आश्रयानें दडून बसलेल्या आपल्या अनेक शत्रूंचा त्यानें पूर्ण पराभव केल्यावांचून, हीं सुखस्वप्नें सत्यसृष्टींत उतरणार नाहींत. या शत्रूंतला पहिला शत्रु, सर्वांत प्रबळ असलेला शत्रु म्हणजे अंध आत्मप्रीति ! हिच्यामुळेंच या छोट्या कथेंतली नाक, हात, कान, इत्यादि मंडळी डोंगर आपल्याला दिसत नाहीं; पण तो डोळ्याला दिसतो म्हणून त्याला वेड्यांत काढतात !

# दोन पंडित

८

एका प्राचीन शहरांत दोन बडे पंडित राहत असत.

लोकांच्या दृष्टीनें दोघेही मोठे जाडे विद्वान होते. मात्र ते दोघे एकमेकांचा विलक्षण द्वेष करीत. एक दुसऱ्याच्या ज्ञानाविषयीं नेहमीं तुच्छतेनें बोले. साप नि मुंगूस यांच्याइतकेंच सख्य होतें त्यांचें !

या विचित्र वैराला कारणही तसेंच मोठें जबरदस्त होतें. पहिला पंडित होता कट्टर नास्तिक; पण दुसरा पडला मोठा आस्तिक !

एके दिवशीं सकाळीं या दोघां विद्वानांची बाजारपेठेंत गांठ पडली. प्रत्येकाच्या भोंवतीं शिष्यवृंदाचें कडें होतेंच. क्षणार्धांत दोघांचा कडाक्याचा वाद सुरू झाला. एवढ्या मोठ्या विद्वानांच्या वादाचा विषय दुसरा काय असणार—जगांत देव आहे कीं नाहीं ?

तास नि तास विद्वत्तापूर्ण चर्चा करीत ते महापंडित बाजारपेठेंत तिष्ठत उभे होते. आणि शेवटीं दोघांच्याही स्वाऱ्या घरीं परतल्या त्या दुपार झाली म्हणून—एकाचें म्हणणें दुसऱ्याला पटलें म्हणून नव्हे !

मात्र त्या दिवशीं संध्याकाळीं एक विलक्षण चमत्कार घडून आला.

नास्तिक पंडित इकडेतिकडे पाहत हळूच एका देवळांत शिरला. देवाच्या मूर्तीपुढें साष्टांग नमस्कार घातला त्यानें ! नंतर दोन्ही हात जोडून आणि मस्तक नम्र करून तो प्रार्थना करूं लागला, ‘ हे दयामय प्रभो, मी चुकलों - भुललों - तुला विसरलों — या पाप्याला क्षमा कर. ’

त्याच वेळीं आस्तिक पंडित आपल्या घरीं एक होळी पेटविण्यांत दंग होऊन गेला होता.

ती होळी लांकडांची नव्हती ! त्यानें प्राणापेक्षांही प्रिय मानलेल्या पवित्र पोथ्यांची होती ती ! त्याचा देवावरला विश्वास पार उडून गेला होता !

● ● ●

गडकऱ्यांनीं निर्माण केलेल्या आर्यमदिरामंडळांतले मन्याबापू आणि जनुभाऊ हे दोघे दारूबाज दारूविषयीं जोरजोरानें वादविवाद करूं लागतात. एक दारूचा कैवार घेतो, दुसरा तिचा निषेध करतो. दोघेही खूप शब्दा-वडंबर माजवितात आणि शेवटीं आपणच निर्माण केलेल्या शाब्दिक अरण्यांत वाट चुकतात. हळुहळु दारूचा कैवार घेणारा मनसोक्त निंदा करूं लागतो; उलट तिचा निषेध करणारा तिचें वकीलपत्र घेऊन आपलें पांडित्य प्रकट करायला सुरवात करतो.

नेहमीं तावातावानें वादविवाद करणारे, एका पक्षाच्या अभिमानानें प्रेरित होऊन दुसऱ्या पक्षावर तुटून पडणारे आणि सत्य काय तें आपल्या-लाच कळलें आहे या धुंदींत हटवादीपणानें तंडत सुटणारे जगांतले बहुतेक विद्वान, मन्याबापू आणि जनुभाऊ यांचेच भाऊबंद असतात. ते वादविवाद करतात तो सत्यशोधनकरतां नव्हे ! आपल्या जिभेचा कंडु शमविण्याकरतां. त्यांच्या ठाम मतांचा उगम प्रचीतींत नसतो, तो बहुधा परिस्थितींत किंवा अंध परंपरेंत असतो. मतप्रतिपादन करतांना अनुभूतीपेक्षां अहंकाराचेंच प्रदर्शन हे लोक करीत सुटतात.

आणि म्हणूनच असले पढिक पंडित वस्त्रांप्रमाणें आपलीं मतें क्षणार्धांत बदलूं शकतात. काल साहित्यांत कलास्वातंत्र्याचा नगारा वाजविणारे आज लोकजागृतीचें तुणतुणें वाजवूं लागतात, सकाळीं समाजवादाचा सावेश पुरस्कार करणारे संध्याकाळीं साम्राज्यशाहीच्या गोटात जाऊन बसतात आणि तारुण्यांत पदार्पण करताना ध्येयवादाचा ध्वज उभारणारे पुढें पांचदहा वर्षांतच आपल्या हातांनीं त्या ध्वजावरल्या फाटक्या पताकांचीं पोतेरीं करून आपलीं स्वयंपाकघरें सारवूं लागतात.

हा जगाचा नित्याचा अनुभव आहे.

असें कां व्हावें ?

लेखक सूचित करतो—पंडित आणि पंडितंमन्य हे बाहेरून सारखे दिसले तरी या दोन जाती अगदीं भिन्न आहेत. आपलें अज्ञान अजून अमर्याद आहे हें जो जाणतो तोच या जगांतला खरा पंडित. आपलें ज्ञान प्रचीतीच्या निकषावर जो पारखून घेतो आणि त्या प्रचीतीशीं जो प्रामाणिक राहतो तोच खरा विद्वान.

जगाच्या बाजारांत असलें सोनें दुर्मिळ असल्यामुळें हिणकस नाण्यांचीच नेहमीं चलती आढळून येते. आवाज करणें यापेक्षां दुसरा कोणता गुण असल्या नाण्यांच्या अंगीं असणार ? पण क्षणभर त्यांना आगींत टाका. त्यांच्यांत हीणच अधिक होतें असें दिसून येईल. सीतेप्रमाणें जीं हंसत अग्निदिव्य करूं शकतात आणि त्या दिव्यांतून अधिक उज्जल होऊन बाहेर पडतात, तींच माणसांचीं खरीं मतें. बाकीचीं मतें म्हणजे शब्द—नुसते पोकळ शब्द—पांडित्याचे फुगे—अहंकाराचे बुडबुडे !

## देवळाच्या पायऱ्यांवर ९

काल संध्याळीं देवालयाच्या संगमरवरी पायऱ्यांवर बसलेली एक स्त्री माझ्या दृष्टीला पडली.

तिच्या दोन्ही बाजूंस दोन पुरुष बसले होते.

तिच्या चेहऱ्याची एक बाजू अगदीं फिक्कट, निस्तेज दिसत होती ! पण दुसऱ्या बाजूला मात्र लज्जेचा नाजुक रक्तिमा उमटला होता.

● ● ●

या चार ओळींच्या लिखाणाला कांटेकोर दृष्टीनें रूपककथा म्हणतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे. कथेपेक्षां काव्यांतच त्याची गणना करणें योग्य होईल. आणि हें काव्यही कांहीं साधेंसुधें नाहीं. प्रथमदर्शनीं तरी गूढगुंजनच वाटतें तें वाचकाला.

हलुहलु काळोखांत रूपांतर पावूं पाहणाऱ्या संधिप्रकाशासारखें असल्या लिखणाचें सौंदर्य असतें. अशा संधिप्रकाशांत जवळची वस्तुसुद्धां स्पष्ट दिसतांना मारामार—पण पश्चिमेकडल्या काळवंडलेल्या आभाळांत जे चित्रविचित्र अंधुक रंग दिसत असतात ते मात्र दृष्टि वेधून घेतल्यावांचून राहात नाहींत. सौंदर्य आणि गूढता यांचें विचित्र मिश्रण होतें अशा वेळीं.

तथापि अनेकदां ही रम्य गूढता नसून क्लिष्ट दुर्बोधता आहे असेंही मनाला वाटल्यावांचून रहात नाहीं.

या छोट्या चुटक्यांतलें देऊळ कुठलें ? त्या देवळाच्या संगमरवरी पायऱ्यांवर बसलेली स्त्री कोण समजायची ? नि तिच्या दोन्ही बाजूला बसलेले ते दोन पुरुष ? त्यांचीं नांवें काय आहेत ? एकाला पाहून ती बावरते आणि दुसऱ्याला पाहून ती लाजते !

आपल्या संतवाङ्मयांत कोड्यांसारखे वाटणारे अनेक परमार्थपर चुटके आहेत तशांपैकींच हा कांहीं प्रकार नाहीं ना ?

हे सर्व प्रश्न वाचकांच्या मनांत उद्भवणें अपरिहार्य असलें तरी हा चुटका मानवी जीवनाचें प्रतीक म्हणून लिहिला गेला असावा अशी पुसट कल्पनाही त्याच वेळीं त्यांच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

या चित्रांतलें देवालय म्हणजे जग. या देवालयाच्या संगमरवरी पायऱ्यांवर बसलेली स्त्री ही मानवी जीवनाची मूर्ति आहे. एका बाजूनें प्रीति तिच्या गालांवर गुलाब फुलवीत आहे. दुसऱ्या बाजूला मृत्यु तिला भयभीत करून तिच्या चेहऱ्यावर अवकळा आणीत आहे.

प्रीति ! जीवनांतली सर्वांत प्रभावी आणि प्रेरक शक्ति ! आयुष्यांतल्या आनंदाला उधाण आणणारी चंद्रकला. जगांतल्या साऱ्या दुःखांचें विस्मरण पाडण्याची जादू तिच्या ओझरत्या स्पर्शांत आहे.

पण मृत्यु ! त्याची अंधुक छायासुद्धां माणसाला किती भयानक वाटते ! प्रीति हा प्रकाश असला तर मृत्यु हा अंधार आहे. ज्यांत कुठलेच तारे कधींही चमकत नाहींत, असा विचित्र अंधकार आहे तो ! प्रीति हा पर्जन्य मानला तर मृत्यु ही वीज आहे. पाऊस पडूं लागला कीं सारी पृथ्वी पुलकित होते—आनंदानें नाचूं लागते; पण मध्येंच वीज कडकडूं लागली कीं तिच्या अंगावर कांटा उभा राहतो, तिच्या हिरव्या स्वप्नांची राखरांगोळी होते.

प्रीति आणि मृत्यु हें मानवी जीवनांतलें अभेद्य सनातन द्वंद्व आहे. एक हात प्रीतीच्या हातांत देऊन आणि दुसरा हात मृत्यूच्या हातांत घालूनच मानवता आपलें मार्गक्रमण करीत आली आहे. मृत्यु हा मानवाला निसर्गानें दिलेला शाप आहे; प्रीति हा त्याचा उःशाप आहे.

म. ग्रं. सं. ठाणे.
सा. क्र. ... नों. दि. ...
वि. ... क्र. ...

## डाळिंबाचे दाणे १०

एका डाळिंबांत राहत होतों मी त्या वेळीं.

एके दिवशीं त्या डाळिंबांतल्या दाण्यांचें संभाषण सुरू झालें. मोठ्या कौतुकानें मी तें ऐकूं लागलों.

पहिला छोटा दाणा म्हणाला, ‘ आज ना उद्यां विशाल वृक्षांत माझं रूपांतर होईल. मग वायुलहरी गाणं गात गात माझ्या फांद्यांतून खेळूं लागतील, सूर्याचे किरण माझ्या पानांवर नृत्य करतील आणि—उन्हाळा येवो अथवा पावसाळा येवो, माझं सुदृढ सुंदर शरीर नेहमीं डौलानं डुलत राहील. ’

लगेच दुसरा दाणा बोलूं लागला. तो म्हणाला, ‘ मी तुझ्या-एवढा लहान होतों ना ? तेव्हां अशाच वेडगळ स्वप्नांत गुंगून जायचा मी ! पण व्यवहार कळायला लागल्याबरोबर एक गोष्ट मला कळून चुकली—अल्लडपणांतल्या आशा म्हणजे मृगजळाच्या नद्या. ’

तिसरा दाणा मध्येंच बोलला, ‘ आपलं भविष्य इतकं उज्ज्वल असेल असं वाटत नाहीं मला ! आहे काय असं आपल्यांत ? एका लहानशा डाळिंबांतल्या इवल्याशा बिया आहोंत आपण ! ’

चौथा उद्गारला, ‘ ज्याला उज्ज्वल भविष्याची मुळींच आशा नाहीं असं आयुष्य आपण कंठायचं ? छे : ! आयुष्य कसलं ? आयुष्याचं विडंबनच म्हणायचं तें ! ’

पांचवा दाणा म्हणाला, 'आपण कोण आहोंत हेंसुद्धां आपल्याला पुरं कळलेलं नाहीं; मग पुढं आपण कोण होणार यांविषयीं हा वितंडवाद हवा कशाला ? '

सहावा उत्तरला, ' आम्ही कोणी असलों तरी आमच्यांत आज जें आहे तें पुढं राहीलच ! '

सातवा बोलला, ' पुढं काय काय होणार आहे याची अगदीं स्पष्ट कल्पना आहे मला. पण तीं व्यक्त करून दाखवितां येत नाहीं मला ! '

मग आठवा दाणा कांहीं तरी म्हणाला. त्याच्यामागून नववा— दहावा—

आणि मग किती तरी दाणे एकदम बोलूं लागले.

जवळजवळ सारेच दाणे बडबडत होते. त्या गोंगाटांत कुणाला काय म्हणायचें आहे तेंच मला कळेना

आणि म्हणून त्याच दिवशीं मी मुकाट्यानें डाळिंबांतलें आपलें बिऱ्हाड हलविलें आणि वसतीकरितां फार दाणे नसलेल्या दुसऱ्या फळाचा शोध करूं लागलों.

• • •

लोकशाहीचीं स्तुतिस्तोत्रें आपण नेहमींच गातों. पण लोकशाही ही कागदावर कितीही चांगली दिसणारी चीज असली तरी आजच्या मानवी व्यवहारांत ती अनेकदां तापदायक ठरते. म्युनिसिपालिटया आणि लोकल-बोर्डें या लोकशाहीच्या मंदिराच्या खालच्या पायऱ्या घ्या किंवा कौन्सिला-सारख्या त्याच्या अगदीं वरच्या पायऱ्या पहा, त्या पायऱ्यांचें पावित्र्य राखण्याचा प्रयत्न करणारे फार थोडे ! स्वार्थाचा बाजार मांडून त्यांना उकिरडयाचें स्वरूप आणणारे हरीचे लालच जगांत जास्ती !

आणि जिथें स्वार्थाचा प्रश्न नसतो तिथें तरी आमचे हे यारभाई गुण्या-गोविंदानें काम करतात का ? छे : ! ती अशाच करायला नको ! प्रत्येकाला

वाटतें–आपण विद्वान, बाकीचे मूर्ख. राजकारणापासून वाङ्मयापर्यंतच्या सर्व बौद्धिक क्षेत्रांत वाद आणि चर्चा यांना नेहमीं ऊत आलेला दिसतो. पण त्यांतून निष्पन्न काय झालें हें पहाणारा मात्र निराशेनें उद्विग्न झाल्यावांचून राहत नाहीं. हे सारे वाद वादासाठींच असतात; मानसिक संवादासाठीं नसतात. या साऱ्या चर्चा बहुधा क्षुद्र विद्वत्तेच्या प्रदर्शनासाठीं असतात; सत्याच्या संशोधनासाठीं सहसा नसतात.

लोकशाही म्हणजे असंख्य लोकांची बेजबाबदार बडबड नव्हे. जिथें अनुभवावांचून कुणी बोलत नाहीं आणि उक्तीपेक्षां कृती शतपटींनीं श्रेष्ठ मानली जाते, तिथेंच खरीखुरी लोकशाही नांदूं शकते.

## कबरस्थानांतला नोकर ११

एकदां मी माझ्या एका मृत आत्म्याला पुरून त्याच्यावर माती लोटीत होतों.

इतक्यांत कबरस्थानांत खड्डे खणण्याचें काम करणारा नोकर माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ' महाराज, इथं प्रेतं पुरायला दररोज खूप खूप माणसं येतात. पण त्या साऱ्या माणसांत मला फक्त आपणच आवडतां. '

मी म्हणालों, ' मित्रा, तुझ्या या बोलण्यानं मला फार फार बरं वाटलं. पण–तुला एक प्रश्न विचारूं का ? इतरांच्यापेक्षां मीच तुला अधिक आवडण्याचं कारण काय ? '

तो उत्तरला, ' बाकीचीं माणसं रडत येतात नि रडतच परत जातात. आपण मात्र हंसत येतां नि हंसतच परत जातां ! '

• • •

ही कल्पकतापूर्ण कथा प्रथमदर्शनीं फार गूढ वाटते. पण दुसऱ्या एका ठिकाणीं जिब्राननें मनुष्याच्या सात आत्म्यांचें जें वर्णन केलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे या कथेंतलें मर्म मनाला मोह पाडल्यावांचून राहत नाहीं.

मनुष्याचें मन किती बहुरूपी आहे हें दिग्दर्शित करण्याकरतांच त्यानें

सात आत्म्यांची कल्पना केली आहे. एकाच व्यक्तीचीं एकाच मनात नांदणारीं हीं सात भिन्न रूपें आहेत असें म्हटलें तरी चालेल.

या सात आत्म्यांपैकीं पहिल्याला आपण 'दुःखी' म्हणूं! गत-दुःखांची उजळणी करून सुस्कारे सोडायचे आणि कल्पनेनें भावी दुःखें निर्माण करून चिंताक्रांत व्हायचें, यापलीकडे त्याला दुसरें कांहीं सुचतच नाहीं.

दुसऱ्या आत्म्याला 'सुखी' म्हणतां येईल. 'खा, पी, मजा कर; गा, हास, नाच; जीवन ही फुलबाग आहे' अशा अर्थाचें तत्त्वज्ञान मान्य करून त्यांत गुंग होऊन जाणारा मनुष्याचा जो भाग असतो, त्याचा हा अवतार आहे.

तिसरा आत्मा 'प्रेमवेडा' आहे. दीपज्योतीवर उडी टाकून स्वतःला जाळून घेणाऱ्या पतंगासारखें त्याचें जीवन असतें.

द्वेष आणि विनाश यांनीं भरलेला मानवी मनाचा भाग हा लेखकानें सूचित केलेला चवथा आत्मा!

मनुष्याचा पांचवा आत्मा अज्ञात सत्याच्या आणि अकल्पित सौंदर्याच्या संशोधनाकरतां अखंड धडपडत असतो. आशा आणि कल्पना यांच्या साहाय्यानें जीवनाची सुंदर मूर्ति घडविण्याकरतां सहावा अहोरात्र कष्ट करीत असतो. आणि सातवा?

पहिले सहा आत्मे स्वतःवर लादल्या गेलेल्या कामाविषयीं कुरकुर करीत असले तरी त्यांना निश्चित असें कार्यक्षेत्र आहे. सातवा मात्र बाह्यतः कार्यशून्य आहे.

पण मनुष्याचा खरा आत्मा हाच आहे! बाकीचे सहा आत्मे जेव्हा झोंपीं जातात तेव्हां हा जागा राहून सर्व सृष्टीच्या पसऱ्यामागें जी अनंत शून्यता उभी आहे तिच्या निरीक्षणांत आणि चिंतनांत तल्लीन होऊन जातो.

या सात आत्म्यांचीं वर्णनें किंचित् गूढ असलीं तरी लेखकाला

जी गोष्ट सुचवायची आहे ती सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. मनुष्याचें अत्यंत उच्च आणि उदात्त स्वरूप निर्मळ आणि निरहंकार असलें पाहिजे. पण धुळींत लोळणाऱ्या मुलाचें अंग जसें मळून जातें, त्याप्रमाणें ऐहिक जीवनांतल्या विचारविकारांनीं मनुष्याचें हें स्वरूप लिडबिडलेलें असतें. सुख आणि दुःख, प्रेम आणि द्वेष, आशा आणि निराशा या द्वंद्वांच्या पलीकडे जाऊन जीवनाकडे पाहण्याची शक्ति ज्या मनुष्यांत येईल तोच खरा मुक्त—तोच खरा मानवजातीला चिरंतन सुखाचा मंगल मार्ग दाखवूं शकेल. गीतेंतल्या स्थितप्रज्ञासारखी ही स्थिति आहे.

पण या द्वंद्वांच्या पलीकडे जाणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. आपल्या सुखदुःखांची क्षुद्रता कळायला मनुष्याला कठोर आत्मपरीक्षक व्हावें लागतें, उत्कट वाटणाऱ्या प्रेमद्वेषांचा उथळपणा जाणावयाला तटस्थपणानें स्वतःच्या भावनांचें सिंहावलोकन करण्याची संवय लावून घ्यावी लागते, विचार-कल्पनांच्या भोंवऱ्यांतून बाहेर पडून आयुष्याकडे टीकाकाराच्या दृष्टीनें पहायला तत्त्वज्ञान्याच्या भूमिकेवर चढतां येण्याइतकी कुवत अंगीं आणावी लागते.

ज्याला हा मनोविकास—अंशतः का होईना—साध्य होतो, तोच मनुष्य आपल्या कुठल्याही मृत आप्ताला पुरण्याकरतां स्मशानांत जाण्याची पाळी आली तरी हंसत जातो आणि हंसतच परत येतो. एक बंधन तुटलें, एक शृंखला गळून पडली, म्हणून तो आनंदित झालेला असतो. त्याच्या या अलौकिक आनंदाची कल्पना आत्मनिष्ठतेंत रममाण झालेल्या आणि म्हणून आपल्या गत सुखदुःखांचें आणि प्रेमद्वेषांचें खरें स्वरूप न ओळखूं शकल्यामुळें त्यांच्यासाठीं रडणाऱ्या सामान्य मनुष्यांना कुठून येणार ?

अनुक्रम

## दोन संन्याशी !　　　　　　　　　　　　१२

एका निर्जन पर्वतावर दोन संन्याशी राहत होते. त्यांचीं मनें दोन भावनांनीं सदैव फुललेलीं असत. पहिली देवाची भक्ति आणि दुसरी एकमेकांविषयींची प्रीति.

त्या दोघांच्या मालकीची अशी एकच वस्तू उभ्या जगांत होती. ती म्हणजे एक भिक्षापात्र ! नि तेंसुद्धां तांब्यापितळेचें किंवा लांकडाचें नव्हतें. मातीचें होतें तें !

एके दिवशीं त्यांतल्या वयानें वडील असलेल्या संन्याशाच्या मनांत कलीनें संचार केला. तो धाकट्या संन्याशाजवळ येऊन त्याला म्हणाला, ' हें पहा, फार दिवस आपण एके ठिकाणीं राहिलों. डोंगराप्रमाणें मनुष्यही दुरूनच सुंदर दिसतो. आपण दोघांनीं आतां विभक्त व्हावं हेंच चांगलं ! चल, आपण आपल्या मिळकतीची वांटणी करूं या. '

तरुण संन्याशाला हें ऐकून मनस्वी दुःख झालें. तो भावपूर्ण स्वरानें म्हणाला, ' भाई, तूं मला सोडून जाणार ही कल्पनाच मला अगदीं असह्य वाटते. पण – पण दूर जाण्यानं तुला सुख होणार असेल तर मी तुझ्या आड येणार नाही. '

त्यानें तें मातीचें भिक्षापात्र आणलें आणि तें त्या वयस्क संन्याशाच्या हातांत देत ता म्हणाला, ' या मातीच्या भांड्याची

कांहीं वांटणी करतां येणार नाहीं. भाई, हें भिक्षापात्र तूंच घेऊन जा ! तें तुझंच आहे. '

मोठा संन्याशी क्रुद्ध स्वरानें उद्गारला, ' मला कुणाची काडी-सुद्धां दान म्हणून घ्यायची नाहीं ! जेवढं माझ्या हक्काचं असेल तेवढंच मी घेईन ! चल, आटप, या भिक्षापात्राची झटकन् वांटणी कर. '

तरुण संन्याशी मृदु स्वरानें म्हणाला, ' हें मातीचें भांडें आहे. याच्या तुकड्यांचा कुणालाच उपयोग होणार नाहीं. तुझी इच्छा असेल तर आपण दोघांच्या नांवाच्या चिठ्ठया टाकूं या. ज्याच्या नांवाची चिठ्ठी निघेल त्यानं हें भाडं घ्यावं ! '

प्रौढ संन्याशी आग्रही स्वरानें म्हणाला, ' मला फक्त न्याय हवाय् ! जें माझ्या मालकीचं असेल तेवढंच मी घेईन. नशिबावर हवाला ठेवून मिळेल तो निर्णय मान्य करणारा मूर्ख मी नाहीं. चल, उगीच वेळ काढूं नकोस. आपणांला या भांड्याचे दोन समसमान तुकडे केलेच पाहिजेत. '

त्या तरुण संन्याशाला आणखी कुठलाच युक्तिवाद सुचेना. तेव्हां तो नाइलाजानें म्हणाला, ' जशी तुझी इच्छा. चल, आपण हें भिक्षापात्र फोडून त्याचे दोन सारखे तुकडे करूं या ! '

हे शब्द ऐकतांच त्या मोठ्या संन्याशाचा चेहरा झर्कन् काळवंडला. तो रागानें ओरडला, ' अरे कुत्र्या, असा शेंपूट घालून काय पळतोस ? तुला भांडायची, लढायची इच्छाच होत नाहीं ? नादान, नामर्द कुठला ! '

● ● ●

लेखकानें या रूपककथेंत मनुष्य-स्वभावाच्या एका अत्यंत विचित्र वैगुण्यावर अगदीं अचूक बोट ठेवलें आहे.

राष्ट्राराष्ट्रांतलीं युद्धें, कलावंतांतल्या मारामाऱ्या आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांची धुसफुस, इत्यादि अनेक लहानमोठया कलहांचें मूळ खरोखर कशांत असतें ?

प्रत्येक लढणारें राष्ट्र आपले स्वार्थी हेतू लपवून केवळ अन्यायाचें परि-मार्जन करण्याकरितां आपण रक्ताचे पूर वाहवीत आहों अशी घोषणा करीत असतें ! प्रतिस्पर्ध्याला शिव्यांची लाखोली वाहून सरस्वतीच्या मयूरासनाला कुक्कुटासनाचें स्वरूप आणणारा प्रत्येक साहित्यिक साहित्याच्या पावित्र्यासाठीं आणि प्रगतीसाठींच आपली लेखणी धडपडत आहे असें छापीत असतो. आपला शेजारी फार वाईट आहे असें गांवभर सांगत सुटणारा प्रत्येक गृहस्थ सभ्यपणा, संयम व सारासार विचार हे सद्गुण आपल्या शेजाऱ्या-इतके तरी आपल्यांत आहेत किंवा नाहींत याचा विचारच करूं इच्छीत नाहीं.

या रूपककथेंतला मोठा संन्याशी वर वर्णन केलेल्या कलहप्रिय मानवी मनोवृत्तीचा प्रतिनिधि आहे. त्याची समानधर्म्याशीं गांठ पडली म्हणजे काय होतें हें आपण सध्यां पहातच आहों. ज्या राष्ट्रांना काल आपल्या गरीब बालकांना दररोज पेलाभर दूध देण्याचें सामर्थ्य नव्हतें, तीं आज प्रत्येक घटकेला दारूगोळ्याकरतां कोट्यवधि रुपयांची राखरांगोळी करीत आहेत. साहित्याला दीपावलीचें स्वरूप देण्याच्या आपल्या कर्तव्याकडे पाठ करून त्याला शिमग्याचें रूप आणणारे लेखकही कांहीं कुणाला अपरिचित नाहींत. आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांतल्या भांडणाबद्दल तर बोलावयालाच नको ! चालू महायुद्धाचा परिणाम स्वर्गलोकांत झाला असल्यास कागदा-च्या या महागाईत पृथ्वीवरल्या शेजाऱ्यांचे दररोजचे क्षुद्र हेवेदावे कसे टिपून ठेवायचे या विवंचनेंत चित्रगुप्त खास पडला असेल !

पुष्कळदां दोन कलहप्रवृत्त पक्षांपैकीं एक थोडाफार सुजाण असतो. तो सज्जनपणामुळें अनेकदां मौन स्वीकारतो, प्रसंगीं माघारही घेतो. पण दुसऱ्या पक्षाला त्याची ही सात्त्विक वृत्ति पसंत पडत नाहीं. न्यायाच्या बुरख्या-खालीं त्याला आपला स्वार्थ साधायचा असतो, त्याला पोकळ विजयाचें समाधान मिळवायचें असतें, त्याला आपल्या आंधळ्या अहंकाराची तृप्ति करून घ्यायची असते ! तरुण संन्याशी प्रथम भिक्षापात्रावरला आपला

हक्क सोडून तें प्रौढ संन्याशाला देऊं लागतो! ही गोष्ट त्याला पटत नाहीं असें पाहून चिठ्ठया टाकून नशिबानें ज्याला जें मिळेल तें त्यानें घ्यावें असेंही तो सुचवितो. पण हेंही कलीचा संचार झालेल्या त्या प्रौढ संन्याशाला रुचत नाहीं असें दिसतांच तो त्या भांडयाचे तुकडे करायलाही तयार होतो. पण हें तरी त्या झपाटलेल्या तापस्याला कुठें आवडतें? तरुण संन्याशानें भांडया-बद्दल भांडावें, मारामारीला तयार व्हावें आणि मग आपण त्याचा पराभव करून तें भांडें व विजयाचा आनंद लुटावा ही त्याच्या अंतरींची इच्छा तशीच अतृप्त राहते. जगांतल्या सर्व कलहांचें बीज या इच्छेंतच असतें.

# शहाणा राजा

# १३

प्राचीनकाळची गोष्ट.

एका दूर दूर असलेल्या शहरांत एक राजा राज्य करीत असे. मोठा शूर आणि शहाणा होता तो ! त्याच्या शक्तीची लोकांना भीति वाटे; पण त्याच्या शहाणपणावर सारें शहर खूष होतें !

त्या शहराच्या मध्यभागीं एक विहीर होती. त्या विहिरीचें पाणी अगदीं स्फटिकासारखें स्वच्छ आणि बर्फासारखें थंडगार असे. गांवांतील सारे लोक — खुद्द राजा आणि त्याचे मोठमोठे मानकरी सुद्धां-याच विहिरींचें पाणी पीत असत. कारण त्या उभ्या गांवांत ही एकच विहीर होती.

एके दिवशीं रात्रीं सारे लोक झोंपले असतांना एक चेटकीण चोरपावलांनीं त्या शहरांत शिरली. त्या विहिरींत कसल्यातरी चमत्कारिक द्रव्याचे सात थेंब टाकून ती स्वतःशींच आनंदानें पुटपुटली, 'यापुढं जो या विहिरीचं पाणी पिईल, तो तत्काळ वेडा होईल !'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजा आणि त्याचा एक मंत्री या दोघांशिवाय बाकी सारे लोक त्या विहिरीचें पाणी प्याले.

क्षणार्धांत सारे वेडे झाले !

आणि मग दिवसभर शहराच्या गल्लीगल्लींत आणि बाजारांतल्या चव्हाट्याचव्हाट्यावर एकच कुजबुज ऐकूं येत होती.

जो तो दुसऱ्याला म्हणत होता,'आपल्या राजाला वेड लागलंय! राजा आणि त्याचा तो मंत्री–दोघेहि वेडे झालेत. असला वेडा राजा राज्य कसलं करणार कपाळाचं ? छे : ! आपण त्याला पदच्युत केलंच पाहिजे!'

त्या दिवशीं संध्याकाळीं तहानेनें व्याकुळ झालेल्या राजानें एक सोन्याचा पेला भरून त्या विहिरीचें पाणी आणायला सांगितलें. पाणी येतांच तो तें भरपूर प्याला. आपल्या मंत्र्यालाही त्यानें तें दिलें.

आणि एका घटकेंत त्या नगरांत मोठा आनंदी आनंद झाला. राजाला आणि मंत्र्याला सकाळपासून लागलेलें वेड नाहींसें झालें म्हणून लोक मोठ्या उत्साहानें उत्सवाची तयारी करूं लागले!

● ● ●

ही कथा नाजुक उपरोधाचा एक सुंदर नमुना आहे. जगाची सुधारणा होणें किती अवघड आहे हें लेखकानें एका साध्या गोष्टींतून मोठ्या मार्मिक रीतीनें सूचित केलें आहे.

सत्य, त्याग, शहाणपणा, प्रामाणिकपणा, इत्यादि गोष्टी बोलायला सर्वांनाच आवडतात. पण त्या आचरणांत आणायच्या म्हणजे जन्मभर जगाच्या विरोधाशीं टक्कर द्यायची मनाची तयारी हवी! एवढें धैर्य लाखांत एकाद्याच्याच अंगीं असायचें! बाकीचे बहुतेक विद्वान् लोक या कथेंतल्या राजाप्रमाणें थोडा वेळ जगाच्या मूर्खपणापासून अलिप्त राहतात. पण शेवटीं संख्येचें बळ हेंच प्रभावी ठरतें आणि शहाणीं माणसें मूर्खांच्या पावलांवर पाऊल टाकून मार्ग आक्रमण्यांतच आयुष्याचें सार्थक मानूं लागतात.

'Enemy of the People' या आपल्या नाटकात इब्सेननें याच प्रश्नाची मोठी मार्मिक चर्चा केली आहे. जगाला निर्भेळ सत्य सहसा आवडत नाहीं. कुठलेंहि तत्त्व जोंपर्यंत स्वतःच्या स्वार्थाच्या, प्रतिष्ठेच्या किंवा अहंकाराच्या आड येत नाहीं तोंपर्यंत त्याची पूजा करायला लोक

तयार असतात ! पण ज्या क्षणीं तें सत्य त्यांच्यावर उलटतें, त्याच क्षणीं ते त्याला लाथेनें दूर भिरकावून देतात !

उच्च विचारांच्या अभावामुळें आजचें जग कंगाल झालेलें नाहीं. त्याच्या भिकारीपणाचें मूळ आचाराच्या दारिद्र्यांत आहे, बुद्धिवान् लोकांतही जो नीतिधैर्याचा विलक्षण अभाव आढळतो त्याच्यांत आहे !

# तीन मुंग्या १४

एक मनुष्य उन्हांत अगदीं गाढ झोंपला होता. त्याच्या नाकावर तीन मुंग्यांची गांठ पडली.

त्या मुंग्यांनीं आपापल्या पद्धतीप्रमाणें एकमेकांना नमस्कार केला आणि मग त्या तिघी बोलत बोलत तिथेंच उभ्या राहिल्या.

नाकाच्या शेंड्यावर असलेली पहिली मुंगी म्हणाली, 'काय भयंकर आहेत बाई या टेंकड्या नि हीं मैदानं! मुलखाचीं ओसाड आहेत मेलीं! दिवसभर हिंडहिंड हिंडतेय् मी! इतकं शोधून शपथेला एक दाणा तरी दिसायचा होता डोळ्यांना!'

उजव्या नाकपुडीपाशीं उभी असलेली दुसरी मुंगी उद्गारली, 'दरी न् दरी फिरलें मी बाई! प्रत्येक दरीचे कोंपरे धुंडाळले. पण इतकी पायपीट करून एक कणसुद्धां मिळाला नाहीं मेला कसला! मला वाटतं या जमिनींत कधींच कांहीं पिकत नसावं!'

त्या दोघींचें बोलणें ऐकून तिसऱ्या मुंगीनें मान वर केली आणि ती म्हणाली, 'खुळ्या आहांत तुम्ही बायांनों! जगांतल्या सर्वश्रेष्ठ आणि सर्वशक्तिमान् अशा या मुंगीचा देह इतका अवाढव्य आहे कीं तो साराच्या सारा आपल्याला कधींच दिसणार नाहीं. तिच्या सावलीला उभ्या जन्मांत प्रदक्षिणासुद्धां घालतां यायची नाहीं आपल्याला! आणि या मुंगीचा आवाज फार फार मोठा आहे.

म्हणूनच तो आपण ऐकूं शकत नाहीं ! सर्वसाक्षी आणि सर्वशक्ति-मान् आहे ही मुंगी !'

तिसऱ्या मुंगीचे हे उद्गार ऐकून पहिल्या दोन मुंग्या एकमेकींकडे पाहत हसूं लागल्या.

त्याच क्षणीं त्या मनुष्याची झोप चाळवली. या कुशीवरून त्या कुशीवर होतां होतां त्यानें आपला हात उचलला आणि नाक खाजविलें.

त्या तीन मुंग्यांचा चोळामोळा होऊन गेला!

● ● ●

मानवजातीला आपल्या ज्ञानाचा नेहमींच मोठा अभिमान वाटत आला आहे. या विसाव्या शतकांत तर त्या अभिमानाचें रूपांतर अहंकारांत झालें आहे. पण विश्वाची विशालता, विविधता आणि विचित्रता लक्षांत घेतली म्हणजे मनुष्याचा हा अहंकार भ्रममूलक वाटूं लागतो.

जीविताचें कोडें खरोखरीच मनुष्याला उलगडलें आहे का ? आकाशांत कावळ्यांप्रमाणें विमानांचे कितीही थवे उडूं लागले म्हणून परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं एका क्षणीं सश्रद्ध तर दुसऱ्या क्षणीं साशंक होणाऱ्या मनाचें समाधान त्यामुळें होईल काय ? विविध रोगांशीं यशस्वी झगडा करणारीं अनेक नवीं नवीं औषधें निघालीं आणि त्यांनीं मृत्यूला कांहीं वेळ थोपवून धरलें तरी आज ना उद्यां मरणाच्या दारांतून बाहेर पडल्यानंतर आपण कुठें जाणार या भीतीनें व्याकुळ झालेल्या जीवाला शांति देण्याचें सामर्थ्य कुठल्या औषधांत आहे ? जन्म, प्रीति आणि मृत्यु या मानवी जीवनांतल्या तीन प्रभावशाली शक्तींच्या स्वरूपाचें यथार्थ आकलन बुद्धिवादी मनुष्याला झालें आहे असें कोण म्हणूं शकेल ?

आपण निसर्गावर मोठा विजय मिळविलेला आहे असें मानवाला नेहमीं वाटत असतें. पण निसर्गानें सहज एक सुस्कारा सोडला कीं त्या जागृत झाले-

त्या ज्वालामुखींत क्षुद्र मनुष्याचीं शहरेंच्या शहरें बेचिराख होतात आणि निसर्ग क्षणभर क्रोधानें कांपूं लागला तरी मनुष्यानें अमर म्हणून उभारलेलीं मंदिरें हां हां म्हणतां मातींत मिळून जातात.

असें असूनही या कथेंतल्या मुंग्याप्रमाणें मानवजात आज वागत आहे, त्याच पद्धतीनें ती जीवनाचा विचार करीत आहे. आपलें क्षुद्रत्व, आपलें अज्ञान आणि आपलें दुर्बलत्व यांचा तिला विसर पडला आहे. शास्त्र, शास्त्र म्हणून जगांत ज्याची पूजा चालली आहे तें ज्ञान सापेक्ष आहे, इतकेंच नव्हे तर त्याला अनेक मर्यादा आहेत, या जाणिवेनें आजचा मनुष्य जीवनाकडे क्वचितच पहातो. उलट मानवी ज्ञानाची आणि सामर्थ्याची मर्यादा ओळखणारी एखादी व्यक्ति निघाली तर तिची थट्टा करण्यांत त्याला विशेष आनंद वाटतो. पण मनुष्यानें आपला हा आंधळा अट्टाहास सोडल्याशिवाय जीं क्षुद्र दुःखें त्याचें आयुष्य आज हरघडी कुरतडून टाकीत आहेत, त्यांची उपेक्षा करून उदात्ताचें आकलन करण्याचें सामर्थ्य त्याला संपादन करतां येणार नाहीं.

# दुसरी भाषा



या जगांत येऊन सारे तीन दिवस झाले होते मला ! रेशमी पाळण्यांत भोंवतालच्या नव्या जगाकडे आश्चर्यानें स्तिमित होऊन पाहत मी पडलों होतों.

माझ्या आईनें दाईला विचारलें, ' बाळाचं सारं ठीक चाललंय्‌ ना ? '

दाईनें उत्तर दिलें, ' होय बाईसाहेब ! तीन वेळां पाजलं मी छकुल्याला. इतकं खेळकर तान्हं मूल आतांपर्यंत कधीं पाहिलं नव्हतं मी ! '

मी अगदीं चिडून गेलों हे शब्द ऐकून. मी मोठ्यानें ओरडलों, ' आई, आई, खोटं बोलतेय्‌ ही दाई ! ही पाळण्यांतली गादी माझ्या अंगाला कशी खुपतेय्‌ ! हिचं दूध माझ्या जिभेला कसं कडू कडू लागतंय्‌ ! या दाईच्या पदराखालीं पिण्याकरतां मी तोंड नेलं कीं तिथल्या घाणेरड्या वासाची शिसारी येतेय्‌ मला ! आई, मी सुखी नाहीं. मी दुःखी आहें — अतिशय दुःखी आहें ! '

पण माझे हे शब्द आईलाही समजले नाहींत आणि दाईलाही कळले नाहींत ! माझी भाषा त्यांना परकी होती. ती या जगांतली नव्हती ! ज्या जगांतून मी नुकताच आलों होतों, त्या जगांतली होती ती !

एकविसाव्या दिवशीं मला ख्रिस्ती धर्मात घेण्याचा संस्कार झाला. त्या वेळीं उपाध्याय आईला म्हणाले, 'बाई, तुमचा मुलगा जन्मतःच ख्रिस्ती धर्माचा उपासक निघाला ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.'

मला आश्चर्य वाटलें हें ऐकून! मी त्या उपाध्यायाला उद्देशून उद्गारलों, 'मग स्वर्गांत तुझी आई फार दुःखी असली पाहिजे. कारण तूं कांहीं जन्मतः ख्रिश्चन नव्हतास!'

पण त्या उपाध्यायालाही मी काय बोललों तें कळलं नाहीं.

सात महिन्यांनीं एक ज्योतिषी आमच्या घरीं आला. माझ्याकडे पाहून तो आईला म्हणाला, 'आईसाहेब, तुमचा मुलगा मोठा मुत्सद्दी होणार – तो मोठा पुढारी होणार!'

मी ओरडून म्हणालों, 'खोटं, साफ खोटं आहे हें! मी गायक होणार! गायक होणं हेंच माझ्या आयुष्याचं ध्येय आहे!'

पण —

मी अगदीं चकित होऊन गेलों. या वयांतली माझी भाषासुद्धां कुणालाच समजली नाहीं.

तेहतीस पावसाळे आले आणि गेले.

या काळांत माझी आई, दाई आणि उपाध्याय हीं सारीं माणसें देवाघरीं गेलीं. तो ज्योतिषी मात्र अजून हयात आहे.

कालच देवळाच्या महाद्वाराशीं तो मला भेटला. सहज आमचें दोघांचें संभाषण सुरू झालें. तो म्हणाला, 'तूं सुप्रसिद्ध गायक होणार हें पहिल्यापासूनच ओळखून होतों मी! तूं सात महिन्यांचा होतास तेव्हांच तुझं हें भविष्य मी वर्तविलें होतं!'

त्याच्या बोलण्यावर माझा सहज विश्वास बसला: कारण आतां मी सुद्धां तेहतीस वर्षांपूर्वीची ती दुसरी भाषा विसरून गेलों आहें!'

• • •

देवाघरून आलेलें निष्पाप मूल आणि जगाच्या ढोंगी व्यवहारांत वाढलेला मनुष्य याच्यातलें अंतर या कथेंत मोठ्या मौजेनें सूचित केलें गेलें आहे!

सत्याच्या तीव्र प्रकाशाकडे टक लावून पाहण्याचें सामर्थ्य निरागस आणि निःस्वार्थी अशा बालमनांत असूं शकतें. पण मनुष्य मोठा होऊं लागला कीं त्याच्या डोळ्यांवर स्वार्थाचे, अहंकाराचे, आसक्तीचे आणि असेच दुसरे असंख्य पडदे येऊं लागतात. या पडद्यांतून त्याला सत्याचें जें स्वरूप दिसतें तें अत्यंत अंधुक आणि विकृत असें असतें. मात्र सत्य सत्य म्हणून त्यालाच कवटाळण्याचा मनुष्यप्राणी नेहमीं अट्टाहास करीत सुटतो !

मानवी मनाचा हा मुखवटा लेखकानें फक्त तीन छोट्या प्रसंगाच्या चित्रणांत पुरा पुरा उघडा करून दाखविला आहे. जन्मानंतरच्या पहिल्या तीन दिवसांत कुठल्या बालकाला आईचें किंवा दाईचें दूध गोड लागणें शक्य आहे ? पण 'बाळ मोठ्या मजेंत आहे ! बघा, गुलाम कसा चुरुचुरु दूध पितोय्' असेंच जग म्हणत सुटतें ! लहान बाल्काला कुठल्याही विशिष्ट धर्माविषयीं प्रेम असणें शक्य आहे काय ? पण आईबापांच्या अनेक शारीरिक व मानसिक गुणदोषांप्रमाणें धर्मसुद्धां आनुवंशिक करून टाकला आहे आम्ही ! मानव-धर्माखेरीज ज्याला दुसऱ्या कुठल्याही धर्माची कल्पनासुद्धां येणार नाहीं अशा जीवाला तूं हिंदु आहेस, तूं मुसलमान आहेस, तूं ख्रिस्ती आहेस, असें लहानपणापासून पढवून पढवून कृत्रिम भेदभावाचें आणि अखंड कलहाचें बीज समाजच त्याच्या मनांत रुजवीत असतो !

जी स्थिति धर्माची तीच व्यक्तित्वाची ! प्रत्येक जीव स्वतःचें असें कांहीं वैशिष्ट्य घेऊन जगांत जन्माला येतो. त्याच्या आवडीनिवडी आणि आशाआकांक्षा लोकांनीं ठरवायच्या नसतात. पण प्रत्येकामध्यें असलेल्या सुप्त गुणांचा विकास कसा होईल हें जग कधींच पहात नाहीं. मूल रांगायला लागल्यापासूनच त्याच्या कपाळावर भोंवतालचा समाज चिठ्या चिकटवूं लागतो – 'हा मुत्सद्दी होणार आहे, हा गणिती होणार आहे !' समाजाच्या आणि वडील माणसांच्या या जुलमामुळें शरीरानें जिवंत असूनही हरघडी ज्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत, अशीं माणसें आजच्या जगांत लाखांनीं मोजतां येतील !

असें असूनही आपलें भविष्य खोटें ठरवून स्वतःच्या व्यक्तित्वाशीं प्रामाणिक राहणाऱ्या माणसाचें अभिनंदन करायला जग नेहमीं एका पायावर तयार असतें ! तें स्वाभाविकच आहे म्हणा ! आपलें भविष्य चुकलें असें कबूल करणारा ज्योतिषी कधीं कुणी पाहिला आहे काय ?

## दोन पिंजरे १६

माझ्या वडिलांच्या बागेत दोन पिंजरे आहेत. पहिल्या पिंज-ऱ्यांत एक मोठा सिंह आहे. आमच्या गुलामांनीं फार लांबून एका मोठ्या ओसाड मैदानांतून पकडून आणला आहे तो! दुसऱ्या पिंजऱ्यांत एक मैना आहे. पण ती कधीं कधीं गात नाहीं!

मात्र प्रत्येक दिवशीं सकाळीं मैना सिंहाला हांक मारून म्हणते, ' नमस्ते भाइ–नमस्ते कैदीदादा! '

• • •

गुलामगिरींत पिचणाऱ्या जीवांचें हें अत्यंत सूचक शब्दचित्र काढतांना लेखकाच्या मनांत कुठल्या कुठल्या कल्पना घोळत असतील हें सांगणें कठीण आहे. सिंह आणि मैना कुणी कधीं एकत्र पाहिलीं आहेत काय? पण दोघेंही पिंजऱ्यांत सांपडलीं कीं न कळत तीं एकमेकांच्या जवळ येतात. पिंज-ऱ्याच्या लोखंडी गजांनीं जशी सिंहाची गर्जना मूक होते, तसें मैनेचें गीतही तिच्या गळ्यांतल्या गळ्यांतच गुदमरूं लागतें! एक अरण्याचा सम्राट, दुसरी रानावनांतली संगीतसम्राज्ञी! पण दोघांनाही पिंजऱ्याच्या गजातून निळ्या आभाळाचा जेवढा तुकडा दिसेल तेवढा शून्य दृष्टीनें पाहण्याशिवाय दुसरें कांहींही करतां येत नाहीं. पण गुलामगिरीचें हें दुःखच त्या दोघांना जवळ

आणतें. मुक्या झालेल्या मैनेला उजाडल्याबरोबर सिंहाची विचारपूस करा-वीशी वाटते. ती त्याला ' कैदीदादा ' म्हणून हांक मारते ! या हांकेंत जसें दुःख आहे तशी सहानुभूतीही आहे.

अरण्यांत दोघेंही पूर्ण स्वतंत्र असतांना त्यांनीं एकमेकांकडे कधीं ढुंकूनही पाहिलेलें नसतें ! पण इतर संकटांप्रमाणें गुलामगिरीचें दुःखही ज्यांच्या वांट्याला येतें, त्यांच्यांत नकळत बंधुभाव उत्पन्न होतो; आणि असल्या बंधुभावांतूनच गुलामगिरीचीं पाळेंमुळें उखडून काढणारी वृत्ति जन्म पावते.

# दानशूर ! १७

ख्रिस्ताच्या वेळची गोष्ट आहे ती !

एका मनुष्यापाशीं खूप खूप सुया होत्या. लोक म्हणत—त्याच्या साऱ्या सुया घेऊन माणसें शिवायला लागलीं तर फाटलेलें आभाळ सुद्धां एका घटकेंत शिवून तयार होईल.

एके दिवशीं ख्रिस्ताची आई त्या मनुष्याकडे गेली आणि म्हणाली, ' महाराज, माझ्या मुलाचा पैरण फाटली आहे. तो देवळांत जायच्या आधीं ती शिवायला हवी मला ! तुमच्याकडली एक लहान सुई मला द्याल तर मोठे उपकार होतील ! '

त्या सद्गृहस्थानें तिला सुई दिली नाहीं. मात्र तिच्या मुलाला देवळांत जाण्यापूर्वी उपयोगीं पडावें म्हणून दान आणि प्रतिग्रह या विषयावर त्यानें तिला एक विद्वत्तापूर्ण प्रवचन सुनावलें.

• • •

या रूपककथेंतला उपरोध अगदीं उघड असला तरी मोठा मजेदार आहे. मानवी मनाच्या क्षुद्रपणानेंच जगांतलीं दुःखें अनंतपटींनीं वाढविलीं आहेत, मनुष्याच्या स्वार्थी स्वभावानें आणि अनुदार वृत्तीनेंच जगांतल्या विषमतेची भयंकर वाढ केली आहे. या कथेंतला सुयांचा सम्राट असलेला मनुष्य फाटकी पैरण शिवण्याकरितां ख्रिस्ताच्या आईला एक लहानशी सुईसुद्धां

द्यायला तयार होत नाहीं. तसें पाहिलें तर एक सुई कमी झाल्यामुळें त्याचें काय नुकसान होणार होतें ? पण मनुष्याची संग्रहवृत्ति बळावली कीं सहृदयता आणि सदसद्विवेकबुद्धि यांना त्याच्या मनांत जागाच उरत नाहीं.

लोभ हा सर्व पापांचा पुढारी आहे हेंच खरें ! लोभी माणसें कुणालाही जरूर असलेली वस्तु देणार तर नाहींतच; उलट आपल्या लोभावर पांघरूण घालण्याकरतां त्याला पोकळ उपदेश करायला मात्र तीं कधीं कचरत नाहींत. भिकाऱ्याला काम करण्याचा उपदेश करणारे आरामखुर्चीवाले, बेकार शिक्षितांना उद्योगधंद्यांत पडावें असा सल्ला देणारे पर्यंक-पंडित, गरिबांनीं उद्योग आणि उत्साह यांच्या बळावर उत्कर्ष करून घ्यावा अशा अर्थाचीं सुभाषितें त्यांच्या अंगावर फेंकणारे मिरासदार, हे सारे या गोष्टींतल्या सुईवाल्याच्या माळेंतलेच मणी होत ! ते गोड गोड शब्द हवे तेवढे देतील ! पण त्यांची कृति मात्र-बोलतांना कर्ण पण वागतांना तिमाजी नाईक ! अशी आहे. ही लोभी मनाची विचित्र जात !

# भाग्यशाली शहर



मीं तरुण होतों तेव्हांची गोष्ट !

एके दिवशीं माझ्या कानांवर एक विलक्षण वार्ता पडली. ज्या शहरांत प्रत्येक मनुष्य दिवसाचे चोवीस तास धर्मशास्त्राप्रमाणें आपलें आचरण ठेवीत असतो, असें एक शहर पृथ्वीच्या पाठीवर आहे ही बातमी होती ती !

मी मनाशीं निश्चय केला— हें शहर आपण शोधून काढलेंच पाहिजे. या भाग्यशाली शहरांतली धूळ मस्तकीं धारण करण्यांतच आपल्या आयुष्याचें सार्थक आहे !

तें शहर अतिशय दूर होतें. मी माझ्या प्रवासाची खूप खूप तयारी केली.

चाळीस दिवसांनीं मला त्या भाग्यशाली शहराचें दर्शन झालें. एकेचाळिसाव्या दिवशीं मीं त्या नगरांत प्रवेश केला.

पण—

अरे बापरे !

ज्या ज्या नागरिकाकडे मी पाहत होतों, त्याला त्याला एकच डोळा आणि एकच हात असलेला मला दिसत होता !

मीं कोड्यांत पडलों. मी स्वतःलाच प्रश्न केला, ‘ या पवित्र नगरांत जे जन्माला येतात त्यांना फक्त एकच डोळा आणि एकच हात असावा अशी ईश्वराची योजना असेल काय ?

मला पाहून त्यांनाही आश्चर्य वाटल्याचें दिसत होतें. माझ्या दोन हातांचें आणि दोन डोळ्यांचें कोडें त्यांनाही उलगडतां येत नसावें ! ते एकमेकांशीं बोलत असतांना मी त्यांना म्हणालों, ‘ जिथला प्रत्येक मनुष्य अहोरात्र धर्मशास्त्राप्रमाणें वागतो असा साऱ्या जगांत ज्याचा लौकिक आहे तें भाग्यशालीं शहर हेंच का ?’

ते अभिमानानें उत्तरले, ‘ होय, हेंच तें भाग्यशाली शहर ! ’

मी प्रश्न केला–‘ तुमचे उजवे डोळे आणि उजवे हात कुठं आहेत ? काय झालंय तुम्हांला ? ’

माझा हा प्रश्न ऐकून तीं सर्व माणसें सद्गदित झालीं ! तीं म्हणालीं, ‘ आमच्याबरोबर चल म्हणजे तुला कळेल ! ’

त्यांनीं शहराच्या मध्यभागीं असलेल्या एका देवालयांत मला नेलें. तिथें वाळून काष्ठवत् झालेल्या हातांची आणि डोळयांची भली मोठी रास पडली होती ! ती पाहून मी उद्गारलों, ‘ अरेरे ! कुठल्या क्रूर जुलमी जेत्यानं तुमच्यावर हा भयंकर अत्याचार केला ? ’

नागरिकांत कुजबुज सुरू झाली. शेवटीं त्यांच्यांतला एक वयोवृद्ध मनुष्य पुढें झाला आणि म्हणाला, ‘ आम्ही स्वतःच केलं आहे हें ! पापावर विजय मिळविण्याकरतां परमेश्वरानं आम्हांला जी प्रेरणा दिली तिचं दृश्य फळ आहे हें ! ’

तो मला घेऊन एका उंच वेदीकडे गेला. सर्व लोक आमच्या मागाहून आले. त्या वेदीवर कोरलेला एक लेख त्यानें मला दाखविला. मी तो वाचूं लागलों.

‘ तुझा उजवा डोळा पापी असेल तर तो उपटून काढ आणि दूर फेंकून दे. कारण सर्व शरीर रौरवांत जाण्यापेक्षां त्याच्या एखाद्या अवयवाचा नाश होणं हेंच अधिक कल्याणकारक आहे. तुझा उजवा हात पापी असेल तर तो कापून काढ आणि दूर फेंकून दे. कारण सर्व शरीर नरकांत पिचत पडण्यापेक्षां त्याच्या एखाद्या अवयवाचा नाश होणं हेंच अधिक कल्याणकारक आहे ! ’

या शहरांतले झाडून सारे लोक एकाक्ष आणि एकहस्त कां आहेत याचा आतां मला उलगडा झाला !

मी त्यांना ओरडून विचारलें, ‘ तुमच्यापैकीं कुणाही स्त्रीपुरुषाला दोन हात किंवा दोन डोळे नाहींत काय ? ’

त्यांनीं उत्तर दिलें, ‘ नाहीं, एकालासुद्धां दोन हात आणि दोन डोळे नाहींत. अजून ज्यांना धर्मशास्त्र वाचतां येत नाहीं आणि त्यांतल्या पवित्र आज्ञा समजण्याची पात्रता ज्यांच्या अंगीं आलेली नाहीं, अशीं लहान लहान मुलें सोडून दिलीं तर या उभ्या भाग्यशाली शहरांत कुणालाही दोन हात किंवा दोन डोळे नाहींत. ’

देवालयाबाहेर येतांच मी लगबगीनें त्या भाग्यशाली शहराचा शेवटचा निरोप घेतला. कारण मी कांहीं लहान मूल नव्हतों आणि मला धर्मशास्त्र वाचतां येत होतें !

● ● ●

पुस्तकी पावित्र्य प्रसंगीं किती क्रूर होऊं शकतें याचें या उपरोधपूर्ण कथेंत केलेलें चित्रण अत्यंत मार्मिक आहे. धर्म ही अर्थहीन गोष्ट नाहीं, पावित्र्याची कल्पना हा कांहीं केवळ कवि-प्रतिभेचा खेळ नाहीं, मानव अधिक विशुद्ध आणि उदात्त व्हावा म्हणून संयम आणि संस्कार यांना आयुष्यांत मानाचें स्थान दिलें पाहिजे हें कोण अमान्य करील ? पण मनुष्यासाठीं धर्म आहे; धर्मासाठीं मनुष्य नाहीं. जीवनासाठीं पावित्र्य आहे; पावित्र्यासाठीं जीवन नाहीं. संयम हा कितीही उदात्त आणि प्रभावी गुण असला तरी सामान्य मनुष्यावर तो सक्तीनें लादून जग सुधारणार नाहीं. प्रत्येक धर्मांत प्रत्येक तत्त्वज्ञानांत, प्रत्येक पंथांत आणि प्रत्येक वादांत नेहमीं तत्त्वें बाजूला पडतात आणि शब्दप्रामाण्याला मात्र भलतेंच महत्त्व प्राप्त होतें ! आपला अवतार सामान्य मनुष्याची जीवनयात्रा अधिक सुखावह व्हावी म्हणून आहे याचा सर्व धर्मांना व तत्त्वज्ञानांना नेहमीं विसर पडतो. त्यांच्या पांडित्यांत, वादविवादांत आणि शब्दनिष्ठेंत बिचाऱ्या सामान्य मनुष्याच्या सुखाचा चुराडा होऊन जातो ! देव म्हणून ज्याचे पाय धरायला जावें, त्यानें भूत

होऊन उरावर बसावें असा आतांपर्यंतचा या बाबतींतला मानवजातीचा अनुभव आहे !

या कथेचा नायक भयभीत होऊन धर्मशास्त्राप्रमाणें अक्षरशः वागणाऱ्या माणसांनीं भरलेल्या नगराला रामराम ठोकतो याचें कारण या कटु अनुभवाशिवाय दुसरें काय असणार ?

ग्रंथ संग्रहालय
नों. दि.

# शहाणा कुत्रा !

१९

एके दिवशीं मांजरांचें एक भलें मोठें टोळकें रस्त्यानें चाललें होतें।

त्यांच्या समोरून एक शहाणा कुत्रा आला.

त्या मांजरांच्या जथ्याजवळ येतांच एक गोष्ट चटकन् त्या कुत्र्याच्या लक्षांत आली—सारीं मांजरें कुठल्यातरी नादांत गुंग होऊन गेलीं आहेत. त्यांचें आपल्याकडे मुळींच लक्ष नाहीं.

हें पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. तो कुतूहलानें जागच्या जागीं थांबला.

मांजरांच्या त्या पथकांतून एक गंभीर चेहऱ्याचा मोठा बोका सर्वांच्या पुढें येऊन उभा राहिला आणि बोलूं लागला, ' भाईहो आणि बहिणींनों, प्रार्थना करा. एकाग्र मनानें परमेश्वराची प्रार्थना करा. पूर्ण श्रद्धेनें तुम्ही पुनः पुन्हां प्रार्थना केलीत म्हणजे खात्रीनें आकाशांतून उंदरांचा पाऊस पडेल ! '

हें ऐकून कुत्रा मनांतल्या मनांत हंसला. त्या मांजरांच्याकडे तुच्छतेनें पहात तो स्वतःशींच उद्गारला, ' काय महामूर्ख मांजरं आहेत हीं ! धर्मशास्त्राचा अगदीं गंध नाहीं बेट्यांना ! पूर्वींच्या मोठमोठ्या ऋषींनीं लिहून ठेवलेलं आणि माझ्या वडिलांनीं आणि मी पठण केलेलं धर्मशास्त्र खोटं कसं होईल

तें शास्त्र म्हणतें...श्रद्धा आणि प्रार्थना यांचें फळ म्हणून देव नेहमीं मुसळधार पाऊस पाडतोच पाडतो! पण त्या पावसांतून उंदीर पडत नाहींत, गोड गोड हाडकं पडत असतात!'

• • •

स्वार्थाकरितां ईश्वराचें अस्तित्व मान्य करणाऱ्या मनुष्याच्या आंधळ्या वृत्तीवर जिब्राननें या कथेंत मोठा विदारक प्रकाश टाकला आहे. या लोकांना देव हवा असतो तो स्वतःच्या सुखासाठीं! त्याची प्रार्थना करावयाची ती आपल्या साऱ्या गरजा आणि चैनी त्यानें भागवाव्यात म्हणून. या गोष्टींतली मांजरें मनांत मांडे खातात--देव आमची प्रार्थना ऐकून उंदरांचा पाऊस पाडील आणि मग आपली चंगळ होईल. त्या मांजरांना मूर्ख म्हणणारा कुत्रा मनोराज्य करीत सुटतो--देव पाऊस पाडील तो हाडकांचाच असणार!- मांजरें उपाशीं मेलीं म्हणून त्याला वाईट वाटायचें काय कारण आहे? त्याला खरी काळजी आहे ती कुत्र्यांची--स्वतःची आणि स्वतःच्या वर्गाची!

बिचारा देव! कुत्रा-मांजरांच्या या परस्परविरोधी प्रार्थना ऐकून त्याची काय स्थिति होत असेल तें त्याचें त्यालाच ठाऊक! दोन राष्ट्रें लढूं लागलीं म्हणजेही देवाची अशीच पंचाईत होते. प्रत्येक राष्ट्र प्रार्थना करकरून परमेश्वराला बजावून सांगतें--सत्य आमच्या बाजूला आहे. तेव्हां युद्धांत आमचाच विजय झाला पाहिजे.

दोन धर्मांच्या कलहांतही देवाची अशीच त्रेधा उडत असावी! प्रत्येक धर्म आपल्याच अनुयायांवर देवाची अधिक कृपा होत असते अशी नेहमीं दवंडी पिटीत असतो. किंबहुना आत्मस्तुतिपर खोटी जाहिरात अखंड करीत राहण्यांत धर्माचा हात धरणारी अशी चित्रपटाशिवाय दुसरी कुठलीही संस्था अद्यापि जगांत जन्माला आलेली नाहीं!

ज्या दिवशीं कुत्र्यांना मांजरांचाही जगांत जगण्याचा हक्क आहे हें पटेल, त्याच दिवशीं आजच्या जगांतले विचित्र विरोध आणि हास्यास्पद विसंवाद

काढता पाय घेतील ! हें जोंपर्यंत घडत नाहीं तोंपर्यंत युद्धांचें--मग तीं व्यक्तींचीं असोत वा वर्गांचीं असोत, तत्त्वाचा मुलामा दिलेलीं असोत किंवा ध्येयाचा दिमाख मिरविणारी असोत-या जगांतून उच्चाटण होणें शक्य नाहीं ! आणि जोंपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर अशीं युद्धें चालू आहेत, सारें जग सुखी व्हावें यापेक्षां आपण आणि आपलें कुटुंब, आपली जात, आपला वर्ग सुखी व्हावा, अशी प्रत्येकाची धडपड सुरू आहे, तोंपर्यंत प्रत्येक पक्षाची प्रार्थना ऐकून घेण्याकरतां म्हणून का होईना, देवाचें अस्तित्व या जगांत कायम राहणारच राहणार !

## बुजगबाहुलें

## २०

मी एका शेताच्या कडेनें चाललों होतों. पांखरांना भिवविण्याकरतां शेतांत उभ्या केलेल्या एका बुजगबाहुल्याला मी म्हणालों, ‘ या निर्जन शेतांत एकसारखं उभं राहून अगदीं कंटाळा येत असेल तुला ! नाहीं ? ’

तें बाहुलें उद्गारलें, ‘ वेड्या, दुसऱ्याला भिवविण्यांत फार मोठा आनंद असतो. याच्याइतका चिरकाल टिकणारा आनंद जगांत दुसरीकडे कुठंच मिळणार नाहीं. मला कधींच कंटाळा येत नाहीं या कामाचा ! ’

क्षणभर विचार करून मी म्हणालों ‘ खरं आहे तुझं म्हणणं ! या विलक्षण आनंदाचा मीसुद्धां उपभोग घेतलाय् ! ’

तें बाहुलें म्हणालें, ‘ छेः ! ज्यांच्यांत पेंढा भरलेला असतो त्यांनांच त्या आनंदाची खरी गोडी कळूं शकते ! ’

तो माझी स्तुति करीत आहे कीं उपहास करीत आहे हें मला कळेना. मी त्याचा निरोप घेऊन निघून गेलों.

एक वर्ष लोटलें.

पुन्हां मी त्या शेताच्या बाजूनें जाऊं लागलों. या मधल्या काळांत त्या बुजगबाहुल्याचें बड्या तत्त्वज्ञांत रूपांतर झालें होतें !

आतां त्याच्या टोपीखालीं दोन कावळे घरटें बांधीत असलेले मला दिसले !

• • •

उपरोध नाजूक असूनही किती मर्मभेदक होऊं शकतो हें या कथेवरून दिसून येईल. या गोष्टींतलें बुजगबाहुलें हें भीतीच्या साहाय्यानें जगभर राज्य चालवूं पाहाणाऱ्या मनोवृत्तीचें प्रतीक आहे. आजपर्यंत जगांतली कुठलीही सत्ता—मग ती राजसत्ता असो, गुरूची शिष्यावरली सत्ता असो किंवा पत्नीवरली पतीची सत्ता असो—नेहमीं प्रीतीपेक्षां भीतीचाच आश्रय करून आपलें अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करीत आली आहे. तरवारी, बंदुका, तोफा, बॉंब आणि विमानें यांची अजूनही जगांत पूजा होत आहे याचें कारण प्रीतीपेक्षां भीतीच्या तत्त्वज्ञानावरच मनुष्याचा अजूनही अधिक विश्वास आहे हेंच आहे. प्रीतीचें तत्त्वज्ञान समतेचें आहे; उलट भीतीचें विषमतेचें आहे. आणि म्हणूनच मनुष्यांतल्या पशुत्वाला यशाच्या दृष्टीनें प्रीतीपेक्षां भीतीचा मार्ग अधिक जवळचा, अधिक सोपा, आणि अधिक चिरंतन वाटतो.

पण तसा तो खरोखरच आहे का ?

कथेंतलें बुजगबाहुलें म्हणतें, ' आंत पेंढा भरलेला असल्याशिवाय भीतीच्या आनंदाचा खराखुरा उपभोग कुणीही घेऊं शकत नाहीं ! '

पण दुसऱ्याला भिवविण्याकरतां अंतरंगांत भरलेला पेंढा कालांतरानें गळून पडतो आणि पांखरांना भिवविणाऱ्या बुजगबाहुल्याच्या टोपीखालीं कावळे घरटें बांधूं लागतात !

जगांत चिरंतन धर्म एकच आहे—भक्ति—प्रीति ! भीति किंवा शक्ति हा नव्हे.

# दोन देव

## २१

एका पर्वताच्या शिखरावर त्या दोघांची गांठ पडली. पहिला देव म्हणाला, ' नमस्ते बंधो ! '

दुसऱ्या देवानें — कालिपुरुष या नांवानेंच सर्व त्याला पूर्वी ओळखीत असत—हूं कीं चूं सुद्धां केलें नाहीं.

पहिला देव म्हणाला, ' भाई, तुझं आज कांहींतरी बिनसलेलं दिसतंय ! काय झालंय तुला इतकं चिडायला ? '

कलि रागानें उद्गारला,' काय झालंय? काय व्हायचं राहिलंय्? हल्लीं एक नवाच गोंधळ सुरू झालाय् जगांत! जो तो तुझ्या नांवानें मला हांक मारतो—माझं कलि हें सुंदर नांव विसरायला लागले आहेत सारे लोक! जो तो मी तुझ्यासारखाच एक देव आहें असें मानून माझ्याशीं वागतो ! मला मुळींच आवडत नाहीं हें ! '

देव हंसत म्हणाला,' माझ्यावरही हीच आपत्ति आलीय् बाबा ! हल्लीं कितीतरी लोक मला देव न मानतां कलि मानूं लागले आहेत. जो तो तुझ्या नांवानं हांक मारतो मला ! '

' मनुष्यप्राणी महामूर्ख आहे ! ' असें पुटपुटत कलि त्या पर्वत-शिखरावरून चालता झाला.

• • •

सत् आणि असत् याच्या बाह्य स्वरूपांत नेहमींच विलक्षण साम्य असतें ! सारख्या चेहऱ्याच्या दोन जुळया भावांशीं संबंध आला म्हणजे हा तो कीं तो हा, हें ओळखतांना मनुष्य सहज गोंधळून जातो, तशीच चिरंतन प्रेरणा आणि क्षणभंगुर वासना यांच्यांतल्या वरवर दिसणाऱ्या सारखेपणामुळें जीवन-मूल्यें निश्चित करतांना मानवता भांबावून जाते. ऋषिवेषानें येऊन सीतेला पळवून नेणाऱ्या रावणाप्रमाणें काम हा अनेकदां प्रेमाच्या नांवाखालीं जगांत धिंगाणा घालीत सुटलेला दिसतो. उलट त्यागाला तयार असलेल्या प्रेमाचा कामुक म्हणून धि:कार झाल्याचीं उदाहरणेंही जगांत तितकींच विपुल आढळ-तात. भावना कुठली आणि वासना कुठली हें ओळखण्याची सूक्ष्म दृष्टि अजून सामान्य मनुष्याला आलेली नाहीं. उद्दाम वासनेनें कोमलपणाचा आव आणला कीं सात्त्विक भावना म्हणून तिची जगांत संभावना होते, आणि सालस भावनेनें थोडयाशा आडदांडपणानें आत्माविष्कार केला कीं लगेच जगाकडून तिच्यावर वासनेचा शिक्काछाप बसतो ! गंभीर चेहऱ्याची व्यभि-चारी स्त्री पतिव्रता वाटावी आणि हंसऱ्या मुद्रेची पतिव्रता व्यभिचारिणी मानली जावी, तशातलाच प्रकार आहे हा. जग बाह्यरूपाला भुलतें; एवढेंच नव्हे, तर अनेकदां त्याच्यावरूनच माणसाच्या अंतःकरणाची आणि योग्यतेची तें पारख करीत सुटतें.

काम आणि प्रेम यांच्याप्रमाणें क्रोध आणि शौर्य, लोभ आणि पराक्रम, मत्सर आणि प्रामाणिक टीका, मद आणि आत्मविश्वास व मोह आणि सेवा यांच्यांतही बाह्य स्वरूपाचें विलक्षण साम्य आहे. मानवी जीवनाचा प्रवाह अद्यापिही अतिशय गढूळ आहे याचें कारण या साम्यामुळें होणारी दिशा-भूल हेंच आहे. केवळ मत्सरानें प्रेरित होऊन व्यक्तीवर किंवा ग्रंथावर टीका करणारा मनुष्य आजच्या जमान्यांत सहज स्पष्टवक्ता किंवा सत्योपासक ठरूं शकतो. उलट लोकांच्या पचनीं न पडणारीं कटुसत्यें सांगणारावर मत्सराचा आरोप ठेवून त्याच्या सत्याला असत्याचें स्वरूप देणें हा सदसद्विवेकबुद्धि नस-लेल्या माणसाच्या हातचा मळ होऊन बसतो. आईबापांची किंवा बायका

मुलांची ढाल पुढें करून देशसेवा किंवा समाजसेवा यांच्याकडे पाठ फिरविणारे लोक आपल्या दुबळेपणाला कुटुंबसेवा हें सात्त्विक नांव देतात ! पण बहुधा तो सुखाचा — मुख्यत: शरीरसुखाचा — मोह असतो.

या रूपककथेंत मानवी जीवनाला मार्गदर्शक असें अत्यंत महत्त्वाचें तत्त्व लेखकानें सूचित केलें आहे. माणसें काय, पुस्तकें काय, किंवा तत्त्वें काय, कुणाचाही बरेवाईटपणा बाह्यरूपावरून ठरविणें अत्यंत घातक आहे. या पद्धतींत फसवणूक होण्याचाच संभव फार. मानव हा मूलत: स्वार्थी आणि सुखलोलुप असल्यामुळें सत् आणि असत् या दोघांतलें अंतर ओळखायला त्यांचे नुसते चेहरे पाहून चालणार नाहीं. प्रत्येक वेळीं त्यांच्या आत्म्यांचीच ओळख करून घ्यायला हवी !

## महत्त्वाकांक्षा

## २२

एके दिवशीं एका गुत्त्यावर तीन माणसांची गांठ पडली. त्यातला पाहिला होता कोष्टी, दुसरा होता सुतार आणि तिसरा होता शेतकरी.

कोष्टी म्हणाला, 'आज एक सुरेख मलमलीचं प्रेतवस्त्र मी दोन मोहरांना विकलं. माझ्या आयुष्यांतला सोन्याचा दिवस आहे हा! अगदीं हवी तेवढी दारू पिऊं या आपण आज!'

सुतार म्हणाला, 'सर्वांत सुंदर अशी जी प्रेतपेटी माझ्यापाशीं होती ती आज खपली! अशा आनंदाच्या वेळीं नुसती दारू प्यायची? उंः! दारूबरोबर चांगली जाड जाड भाजलेली रोटी हवी बुवा आपल्याला!'

शेतकरी म्हणाला, 'मला फक्त खड्डा खणायचंच काम मिळालं आज! पण माझ्या मालकानं दुप्पट पैसे दिले मला! चपात्या नि गुळंबासुद्धां घेऊं या आपण!'

त्या दिवशीं संध्याकाळीं त्या गुत्त्यांत एकसारखी गडबड सुरू होती. हीं तीन गिऱ्हाइकें पुन्हां पुन्हां दारू, मांस आणि चपात्या मागवीत होतीं! मोठ्या मजेंत चाललें होतें त्याचें खाणेंपिणें!

गुत्त्याचा मालक आनंदानें दोन्ही हात एकमेकांवर चोळीत आणि आपल्या कारभारणीकडे पहात हंसत होता! आज तो मोठ्या

खुषींत होता. मोकळ्या मुठीनें पैसे खर्च करणारीं तीन गिऱ्हाइकें मिळालीं होतीं त्याला आज !

ते तिघे जायला उठले तेव्हां चंद्र आकाशांत बराच वर आला होता. तिघेही गात गात आणि आरडाओरड करीत रस्त्यानें जाऊं लागले.

गुत्त्याचा मालक आणि त्याची बायको आपल्या दुकानाच्या दारांत उभीं राहून हळुहळु अंधुक होत जाणाऱ्या त्यांच्या आकृत्यांकडे पाहत होतीं.

शेवटीं बायको उद्गारली, ' किती छान गिऱ्हाकं होतीं हीं ! मोठी रंगेल आणि उदार ! दररोज आपलं नशीब असंच उगवलं तर मोठी मौज होईल. मग आपल्या बाळाला कांहीं गुत्तेवाल्याचा धंदा करून रोज मरमर मरायला नको ! त्याला खूपखूप शिकवायला पैसा मिळेल आपल्याला. आणि आपला लाडका लेक उद्यां मोठा जाडा पंडित होईल — धर्मोपदेशकसुद्धां होईल तो ! ऐकलं ना ? '

● ● ●

आजच्या समाजरचनेंत एकाचें सुख हें दुसऱ्याच्या दुःखावरच कसें उभारलें गेलें आहे हें या कथेंत मोठ्या मजेदार रीतीनें दिग्दर्शित झालें आहे. गांवांत कुणीतरी मनुष्य मरण पावतो. त्यामुळें कोष्टी आणि सुतार यांचा प्रेतवस्त्र व प्रेतपेटी हा माल भारी दरानें खपतो. शेतकऱ्यालाही खड्डा खणायचें काम मिळून चांगली प्राप्ति होते. हा पैसा घेऊन ते तिघे गुत्त्यांत येतात. आज मृत्यु त्यांचा बडा दोस्त झालेला असतो. केवळ त्याच्या कृपेमुळेंच मनसोक्त मजा मारण्याइतका पैसा या तिघांच्या हातांत घोळूं लागलेला असतो.

अशीं बेफाम खाणारींपिणारीं गिऱ्हाइकें मिळाल्यामुळें गुत्तेवाल्याला स्वाभाविक आनंद होतो. आज एक मनुष्य मरण पावला नसता तर आपली अशी तडाखेबंद विक्री झाली नसती, हा विचार तो तरी कशाला करतो ?

मानवी जीवनांतला विलक्षण विरोध दर्शविण्याच्या दृष्टीनें लेखकानें गुत्ते-वाल्याच्या बायकोच्या तोंडीं जे उद्गार घातले आहेत ते सहानुभूति व टीका यांचें सुंदर मिश्रण करणाऱ्या कलेचे द्योतक आहेत. या बाईची एकच इच्छा असते—आपल्या मुलानें बापाचाच धंदा चालवीत जन्मभर रखडत राहूं नये. त्याला पुष्कळ शिकायला मिळावें आणि शिकून तो बडा मनुष्य व्हावा असें तिला एकसारखें वाटत असतें. तिच्या या इच्छेंत अस्वाभाविक असें काय आहे ? प्रत्येक आई आपल्या मुलाविषयीं अशींच मनोराज्यें करीत असते. पण गुत्तेवाल्याच्या मुलाला शिक्षणाला हवा असलेला पैसा मिळायचा म्हणजे गुत्ता जोरांत चालायला हवा ! गुत्त्यांत जितकीं अधिक माणसें येतील आणि तीं जितकीं चिकार पितील तितका हिच्या मुलाला उच्च शिक्षण मिळ-ण्याचा संभव अधिक. आपल्या दुकानांत दारू प्यायला आलेल्या माणसांना मिळालेल्या पैशाच्या पाठीमागें मृत्यु उभा आहे किंवा भरपूर नशापाणी करून घरीं गेल्यावर हीं माणसें आपल्या बायकापोरांना जीव अगदीं नकोनकोसा करून टाकणार आहेत ही गोष्ट तिच्या लक्षांतच येत नाहीं. मग असल्या विचारानें तिचें मन अस्वस्थ होण्याची गोष्ट दूरच राहिली ! तिला फक्त एक साधी सरळ गोष्ट दिसते. खाऊन पिऊन मजा करणारीं गिऱ्हाइकें दररोज आपल्या गुत्त्यांत आलीं कीं आपल्या मुलाचें शिक्षण पूर्ण व्हायला काडीचीही अडचण पडणार नाहीं. आणि या दारूबाज गिऱ्हाइकांकडून मिळणाऱ्या पैशाच्या बळावर ती त्याला जें शिक्षण देणार आहे तें कांहीं निःवळ पोटभरू-पणाचें नाहीं. ती त्याला शास्त्री, पंडित नाहींतर धर्मोपदेशक करणार आहे.

साम्राज्यविस्ताराइतकी व्यक्तीची सात्त्विक आकांक्षासुद्धां अमानुष ठरावी अशीच आजच्या जगांतली समाजरचना आहे !

## ईश्वर

## २३

फार फार जुनी गोष्ट आहे ही !

मला नुक्तें कुठें बोलतां येऊं लागलें होतें तेव्हां !

मी ईश्वराचें निवासस्थान असलेल्या पवित्र पर्वतावर गेलों आणि त्याला म्हणालों, ' प्रभो, मी तुझा दास आहें. तुझी सुस इच्छा हाच माझा धर्म आहे. मी आचरण तुझ्या आज्ञेंत राहीन. '

ईश्वर कांहींच बोलला नाहीं. एखाद्या सोसाट्याच्या वादळाप्रमाणें तो निघून गेला.

एक हजार वर्षांनीं मी पुन्हां त्या पवित्र पर्वतावर गेलों आणि ईश्वराला म्हणालों, ' परमेश्वरा, मी तुझी सृष्टि आहें—मातींतून माझी मूर्ति तूंच निर्माण केली आहेस. देवाधिदेवा, माझं सर्वस्व तुझंच आहे. '

ईश्वरानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. हजारों वेगवान पंख असलेल्या एखाद्या पक्ष्याप्रमाणें तो भुर्रकन् दृष्टीआड झाला.

पुन्हां हजार वर्षांनीं मी त्या पवित्र पर्वतावर गेलों आणि ईश्वराला म्हणालों, ' तात, मी तुझा पुत्र आहें. दया आणि प्रेम यांनीं प्रेरित होऊन तूं मला जन्म दिला आहेस. प्रीति आणि पूजा यांच्या आधारानेंच मला तुझ्या राज्याचा वारसा मिळेल. '

ईश्वर मुकाच राहिला. दूर दूर दिसणाऱ्या टेंकड्यांना आच्छादणाऱ्या धुक्याप्रमाणें तो नाहींसा झाला.

पुन्हां हजार वर्षांनीं मी त्या पवित्र पर्वतावर गेलों. आणि ईश्वराला म्हणालों, ' माझ्या देवा, माझी इच्छा तूंच आणि तिची सफलताही तूंच. मी तुझं कालचं रूप आहें आणि तूं माझं उद्याचं स्वरूप आहेस. मी तुझं पृथ्वीच्या पोटांत असलेलं मूळ आहें आणि माझं आकाशांत उंच जाऊन हंसणारं फूल तूं आहेस. सूर्यप्रकाशांत आपणां दोघांचाही विकास होत आहे. '

हें ऐकून किंचित् वांकून माझ्या कानांत देवाधिदेव गोड गोड शब्द कुजबुजला. आपल्याकडे धांवून येणाऱ्या निर्झराला समुद्र ज्याप्रमाणें आपल्या मिठींत घेतो, त्याप्रमाणें त्यानें मला जवळ घेतलें.

मग पर्वतशिखरावरून मी खालीं मैदानांत आलों आणि तिथून खोल खोल दऱ्यांत उतरलों. आतां तिथेंही ईश्वर माझ्याबरोबर होताच !

● ● ●

देव भक्तीचा भुकेला असतो, अभिमानापेक्षां सेवेच्या भावनेनेंच तो वश करून घेतां येतो, हा सर्व साधुसंतांचा अनुभवच या कथेंत चित्रित केला गेला आहे. कथेचा शेवट सुंदर आणि सूचक पण अत्यंत अर्थपूर्ण करण्याचें लेखकाचें कौशल्य पाहाण्याजोगें आहे.

## महासागर

## २४

एके दिवशीं माझा आत्मा आणि मी समुद्रावर स्नान करण्याकरतां गेलों.

वाळवंटांत गेल्यावर स्नानाकरितां निवांत असा एकांत आम्ही शोधूं लागलों.

चालतां चालतां आम्हांला एका करड्या रंगाच्या खडकावर बसलेला एक मनुष्य दिसला. तो आपल्या हातांतल्या पिशवींतून चिमटीचिमटीनें मीठ काढांत होता आणि तें समुद्रांत टाकीत होता.

माझा आत्मा म्हणाला, ' नैराश्यवादी म्हणतात तो हा ! चल, आपण इथून दूर जाऊं या ! इथं आपल्याला स्नान करणं अशक्य आहे ! '

आम्हीं पुढें चाललों. चालत चालत एका खाडीच्या तोंडापाशीं आम्ही आलों. तिथें एका पांढऱ्या शुभ्र खडकावर बसलेला एक मनुष्य आम्हांला दिसला. त्याच्या हातांत एक रत्नजडित पेटी होती. तिच्यांतून पुनःपुन्हां साखर काढून तो ती समुद्रांत टाकीत होता.

माझा आत्मा म्हणाला, ' हा आशावादी ! आमचीं उघडीं अंगं याच्याही दृष्टीला पडतां कामा नयेत. '

पुन्हां आम्ही पुढें चालूं लागलों.

चालतां चालतां समुद्रकांठावर बसलेला एक मनुष्य आम्हांला दिसला. मेलेले मासे मोठ्या प्रेमानें उचलून तो ते हळूच परत पाण्यांत सोडीत होता.

माझा आत्मा उद्गारला, 'याच्या समोरही आपल्याला स्नान करतां येणार नाहीं ! हळव्या मनाचा भूतदयावादी आहे हा ! '

आम्ही पुढें चाललों.

मग आम्हांला जो मनुष्य दिसला तो वाळूवर आपल्याच सावलीचें चित्र रेखाटीत होता. मोठमोठ्या लाटा खळखळत पुढें येत आणि त्याच्या रेषा क्षणार्धांत पुसून टाकीत. पण पुनः पुन्हां तें स्वतःचें चित्र रेखाटण्याचा त्याचा उद्योग आपला चालू होताच !

माझा आत्मा म्हणाला, 'हा गूढ अध्यात्मवादी आहे ! चल, आपण पुढें जाऊं या ! '

आम्ही पुन्हां चालूं लागलों. चालतां चालतां आम्ही एका प्रशांत लहान खाडीपाशीं आलों. तिथें एक मनुष्य एका पळीनें समुद्रावरला फेंस गोळा करून तो एका पांढऱ्या दगडी कमंडलूंत सांठवून ठेवीत होता.

माझा आत्मा म्हणाला, 'हा ध्येयवादी ! आमचीं उघडीं अंगं याच्याही दृष्टीला पडणं इष्ट नाहीं ! '.

पुन्हां आम्ही पुढें चालूं लागलों. एकदम उच्च स्वरांत उच्चारलेले खालील शब्द आमच्या कानांवर पडले, 'हा पहा समुद्र–अनंत आणि विशाल सागर म्हणतात तो हाच ! '

हें ओरडून सांगणाऱ्या त्या मनुष्यापाशीं आम्हीं पोंचलों तेव्हां तो समुद्राकडे पाठ फिरवून कानाशीं धरलेल्या एका शिंपल्यांतला अस्फुट गुणगुण ऐकण्यांत दंग झालेला आम्हांला दिसला !

लगेच माझा आत्मा म्हणाला, 'आपण पुढं जाऊं या. वास्तववादी म्हणतात तो हा ! संपूर्ण जीवनाचा विचार करण्याची आपली अपात्रता लपविण्याकरतां त्याचा एक इवलासा तुकडा घेऊन त्यांतच रमून जाणारा हा गृहस्थ आहे ! '

त्याला सोडून आम्ही पुढें जाऊं लागलों. जाता जातां खडकांमधल्या गवत वाढलेल्या एका जागीं वाळूंत आपलें डोकें खुपसून बसलेला एक मनुष्य आमच्या दृष्टीला पडला.

मी माझ्या आत्म्याला म्हणालों, 'आपणाला इथं स्नान करायला हरकत नाहीं. कारण आपण कांहीं याच्या दृष्टीला पडणार नाहीं !'

माझा आत्मा उद्गारला, 'छेः ! छेः ! अतिशय भयंकर प्राणी आहे हा ! पावित्र्यवादी म्हणतात तो हा !'

आतां मात्र माझ्या आत्म्याच्या मुद्रेवर दुःखाची गडद छाया पसरली. त्याच्या स्वरांतूनही उदासीनता जाणवूं लागली.

तो म्हणाला, 'आपण इथून दूर जाऊं या. आपणाला स्नान करतां येईल असा शांत निवांत एकांतच नाहीं इथं कुठें ! इथल्या वाऱ्यानं माझे सोनेरी केस उडवावेत किंवा माझा उघडा देह इथल्या प्रकाशाच्या दृष्टीला पडवा अशी माझी इच्छा नाहीं !'

मग आम्ही दोघेही समुद्र मागें टाकून महासागराचा शोध करण्याकरतां निघालों.

● ● ●

या सुंदर कल्पकतापूर्ण कथेंत मनुष्य अंध आत्मनिष्ठेनें आणि एकांगी विचारसरणीनें जीवनाच्या विशालतेला, वैचित्र्याला आणि सत्य ज्ञानाला कसा पारखा होतो याचें लेखकानें सुरस आणि सविस्तर वर्णन केलें आहे. जगांतली दुःखें जीवनांत नाहींत, त्या जीवनाकडे संकुचित दृष्टीनें पाहाणाऱ्या मानवी मनांत आहेत, हें मार्मिक रीतीनें सांगतांना त्यानें प्रगट केलेल्या टीकाशक्तीची व कल्पनाविलासाची अमर वाङ्मयांत गणना झाल्याशिवाय राहणार नाहीं !

# दोन शब्द

जिब्रानच्या रूपककथा व कविता यांच्यांतली सीमारेषा निश्चित करणें मोठें कठिण आहे. त्याच्या कांहीं कथा कवितांसारख्या वाटतात; कांहीं कविता गोष्टींसारख्या भासतात. ‘सात आत्मे’ या पुढें-दिलेल्या कवितेचा या दृष्टीनें उल्लेख करायला हरकत नाहीं. ‘तीन मुंग्या’ या रूपककथेसारखीच ही संवादरूपानें लिहिलेली गोष्ट आहे असें एखाद्यानें म्हटलें तर तंत्रदृष्ट्या त्याचें म्हणणें बरोबरच ठरेल. पण मी या पुस्तकांतल्या लिखाणाचें जें वर्गीकरण केलें आहे त्यांत रचनापद्धतीला आणि बाह्यस्वरूपाला महत्त्व नाहीं. लिखाणाच्या अंतरंगाकडे आणि परिणामाकडे पाहण्याचा मी प्रयत्न केला आहे. जिथें जिथें जिब्रान आपल्या अनुभूतींचा नाट्यात्मक आविष्कार करतो, तिथें तिथें त्या कथांचें स्वरूप धारण करतात असें सामान्यत: म्हणायला हरकत नाहीं. अशा कथा या पुस्तकाच्या पहिल्या भागांत समाविष्ट झाल्या आहेत. या दुसऱ्या भागांत ज्यांना कविता म्हणतां येतील अशीं सर्व प्रकरणें दिलीं आहेत. या सर्व लिखाणांतून जिब्रानच्या तत्त्वज्ञानाला आधारभूत असलेल्या त्याच्या एका अत्यंत आवडत्या कल्पनेचें आपल्याला पुन: पुन्हां दर्शन होतें. ती म्हणजे माणसाचा आत्मा निसर्गत: मुक्त आहे, पण दुबळ्या दैनंदिन जीवनांत आणि जगाच्या क्षुद्र व बहिर्मुख व्यवहारांत हा आत्मा बंदिवान होऊन पडतो, ही होय! साहजिकच हा बद्ध आत्मा जगाला मान्य असणारे निरनिराळे मुखवटे आपल्या तोंडावर चढवीत जातो. सत्याचा प्रकाश त्याला सहन होत नाहीं. रूढींच्या, संकेतांच्या, दुबळेपणाच्या, गुलामगिरीच्या,एक ना दोन असल्या हजार प्रकारच्या शृंखलांनीं तो जखडला जातो. पुढें पुढें तर या शृंखला हेच आपले अलंकार आहेत असें त्याला वाटूं लागतें. माणसाच्या या ढोंगी जीवनाचा आणि अध:पाताचा जिब्रान कट्टा शत्रु आहे. मानवाचा मुक्त आत्मा हा त्याचा आदर्श आहे.

जिब्रानची चरित्रकार बार्बेरा यंग हिनें नमूद केलेल्या अगदीं साध्या

साध्या प्रसंगांवरून सुद्धां त्याच्या या उत्कट कविमनाची आपल्याला प्रचीति येते. बाळपणीं देखील वादळें त्याला फार आवडत. वादळ सुरू झालें कीं त्याचें मन आनंदानें नाचूं लागे ! पुढें तो म्हणे, 'वादळ माझ्या अंतरंगाला मुक्ततेचा आनंद देतें. सर्व शृंखला गळून पडल्या, बंधनें नाहींशीं झालीं, अशा भावनेनें वादळ पाहतांना माझें मन भरून जातें.' दुसरीही गोष्ट अशीच आहे. एके दिवशीं धो धो पाऊस पडत होता. त्या पर्जन्यधारा आपल्याला खेळायला बोलावीत आहेत, अगदीं आपलें नांव घेऊन आपल्याला हांका मारीत आहेत, असें छोट्या जिब्रानला वाटलें. सारे अंगावरले कपडे काढून स्वारीनें ते फेंकून दिले आणि मच्छरदाणींत मुलानें लपून बसावें त्याप्रमाणें त्या मुसळधार पावसांत ही चिमुकली मूर्ति दिसेनाशी झाली. शेवटीं त्याची आई आणि दाई या दोघींनीं त्याला शोधून पकडलें, घट्ट धरून ओढीत घराकडे आणलें आणि तिथें डांबून ठेवलें. निसर्गाची आणि भव्यतेची ओढ हा जिब्रानच्या काव्याचाच नव्हे तर तत्त्वज्ञानाचाही एक मोठा भाग आहे. प्रत्येक अनैसर्गिक गोष्टीची त्याला चीड येते; मग ती कृत्रिमता दोन व्यक्तींच्या प्रेमबंधनांतली असो, अथवा एका वर्गाला धनवान बनवून दुसऱ्याला कफल्लक करणाऱ्या समाजरचनेंतली असो ! मुक्त आत्म्याचा उद्गार हाच मानवी जगांतला सर्वश्रेष्ठ कायदा असला पाहिजे असें त्याला वाटतें. जगांतल्या सर्व गोष्टींचें मूल्यमापन या कायद्याच्या अनुरोधानें झालें तर अनेक दुःखें नाहींशीं होतील अशी त्याची श्रद्धा आहे.

एके ठिकाणीं जिब्रान म्हणतो, 'मानवाचा आत्मा दिक्कालाहून मोठा आहे, सागराहून गंभीर आहे, तारकांपेक्षां उत्तुंग आहे.' या आत्म्याचें सत्य स्वरूप कसें दूषित होतें, तें बदलून त्याला विकृत रूप कसें दिलें जातें, या विकृतीमुळें जगांत किती ढोंगें-सोंगें आणि आपत्ति-विपत्ती निर्माण होतात हें आपल्या गूढरम्य आणि काव्यमय शैलीनें या कवितांत त्यानें चित्रित केलें आहे. 'वेडा' या प्रकरणांत आत्म्याचें सत्य स्वरूप प्रगट होतांच 'रस्त्यांतले अनेक स्त्री-पुरुष मला पाहून हसूं लागले.

कांहींना माझी भीति वाटली. ते झटकन् आपापल्या घरांकडे धांवत गेले.' असें जिब्रान वर्णन करतो. जगांत उघडया नागडया सत्याचें सहसा स्वागत होत नाहीं. असलें सत्य कित्येकांना हास्यास्पद वाटतें. बाकी उरलेल्या लोकांना तें भीतिप्रद भासतें. जिब्राननें हा अनुभव मोठया मार्मिक रीतीनें वर्णन केला आहे. सत्याचा उपासक होणारा मुक्त आत्मा जगाच्या दृष्टीनें वेडा ठरतो ! म्हणून जिब्राननें या कवितांतून वारंवार त्या वेडयाच्या अंतरंगाचीं, त्याच्या तीव्रतेचीं आणि तळमळीचीं, त्याच्या शक्तीचीं आणि भक्तीचीं विविध वर्णनें केलीं आहेत. 'रात्र आणि वेडा' या कवितेंतला संवाद मोठा कल्पकतापूर्ण असून मुक्त आत्म्याविषयींचा जिब्रानच्या विचारांवर प्रकाश टाकणारा आहे. अशा आत्म्याचे विशाल पर्वत किंवा गंभीर सागर हेच मित्र होऊं शकतात ! 'उत्कट इच्छा' ही कविता याच कल्पनेच्या पार्श्वभूमीवर उभारलेली आहे. माणसाचें बाह्यस्वरूप आणि अंत:स्वरूप यांतलें अंतर 'चेहरे' व 'सात आत्मे' या दोन्ही प्रकरणांत दिग्दर्शित झालें आहे.

'माझा आनंद,' 'माझें दु:ख,' आणि 'पूर्ण जग' या तिन्ही कविता एकत्र वाचल्या पाहिजेत. व्यक्ति आणि जग यांच्या संबंधावर जिब्राननें त्यांत टाकलेला प्रकाश मोठा विदारक आहे. 'माझा मित्र' ही कविता मनुष्याच्या अंतरंगांतल्या चिरंतन संघर्षावर उभारलेली आहे. 'पराभव' हें एक नावीन्यपूर्ण स्तोत्र आहे. विजयाचीं गीतें सर्वच कवी गातात. पण विजयाचा उन्माद माणसाच्या अध:पाताला कारणीभूत होतो, तो त्याची विकासाची शक्ति मर्यादित करतो, हें जिब्रान जाणतो. 'आपल्यांतलें जें जें चैतन्यहीन होत जाईल तें तें पुरून टाकण्याकरितां आपण बरोबरीनें खड्डे खणूं' असें कवि आपल्या पराजयाला मोठया उत्साहानें म्हणतो. जीवनाच्या पावित्र्याच्या आणि प्रभावितेच्या दृष्टीनें यांत किती खोल अर्थ भरला आहे !

'वधस्तंभावर' ही कविता जिब्राननें खिस्ताला उद्देशून लिहिली असली तरी ती वाचतांना आजच्या हिंदी माणसांना—किंबहुना साऱ्या जगाला—गांधीजींची आठवण झाल्याशिवाय राहणार नाहीं. 'मी वधस्तंभावर हंसत

होतों, एवढेंच तुम्ही लक्षांत ठेवा. त्याग, प्रायश्चित्त, कीर्तीची लालसा, यापैकीं कुठल्याही हेतूनें मी प्रेरित झालेलों नाहीं. माझा कुणीही अपराध केलेला नाहीं. माझें रक्त काढून मला प्यायला द्या, म्हणून मी तुम्हांला विनंति केली. कारण वेडयाची तहान त्याच्या स्वतःच्या रक्तानेंच शांत होत असते.' हीं या कवितेंतलीं वाक्यें किती अर्थपूर्ण आहेत ! उच्च ध्येयाकरितां स्वतःचें बलिदान करीत आलेल्या जगांतल्या असंख्य हुतात्म्यांचें आणि महात्म्यांचें जणुं कांहीं मोजक्या शब्दांत जिब्राननें हें स्मृतिमंदिरच उभारलें आहे.

जिब्रानच्या कविताच काय पण कथा सुद्धां थोडयाफार गूढ असतात हें खरें आहे. पण गूढता म्हणजे क्लिष्टता नव्हे आणि अर्थशून्यता तर नव्हेच नव्हे ! विशाल कल्पकतेमुळें त्याच्या या गूढतेला अपूर्व रम्यतेची जोड मिळाली आहे. या गूढरम्य प्रतिभेचा आविष्कार विशिष्ट शैलीनेंच व्हावा हें स्वाभाविक आहे. ही शैली अल्पविस्तर पण बव्हर्थ आहे. जिब्रान आपल्या आईविषयीं म्हणे, 'ती असंख्य काव्यें जगली. पण तिनें एक सुद्धां कविता कधीं लिहिली नाहीं.... मातेच्या हृदयांत जें गाणें मुकेपणानें वावरत असतें तेंच मुलांच्या ओठावर नाचत राहतें.' अशा प्रकारची उद्गारपद्धति अंगवळणीं पडून गेलेल्या श्रेष्ठ कवीच्या आत्म्याचें सारें सौंदर्य त्याच्या वाणीच्या पृष्ठभागावर चमकत असावें अशी आपण अपेक्षा करणें चुकीचें नाहीं काय ? समुद्राच्या लाटांवर फक्त फेस तरंगत असतो; पण त्याच्या खोल अंतरंगांत मौक्तिकांनीं भरलेले शिंपले असतात. ते पाणबुडयांच्याच हातीं लागतात.

१५-११-४८
शाहुपुरी
कोल्हापूर

वि. स. खांडेकर.

# भाग दुसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 30461
विभाग सा. वा.
क्रमांक 2491
नों. दि. 4-4-61
वाचनालय शाखा

## काव्य

वेडा
रात्र आणि वेडा
उत्कट इच्छा
चेहरे
सात आत्मे
माझा आनंद
माझें दुःख
पूर्ण जग
माझा मित्र
पराभव
वधस्तंभावर

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
ग्रा. क्र....६७२९ नों. दि ..........
वि. ....मान..का.: क्र. ..................

## वेडा २५

मी वेडा कसा झालों हें तुम्हांला ऐकायचें आहे ना ?

तें असें झालें...एके दिवशीं—तेव्हां किती तरी देवांचा जन्मसुद्धां झाला नव्हता—मी गाढ निद्रेंतून जागा झालों. माझीं सर्व मुखवस्त्रें चोरीला गेलीं आहेत असें मला आढळून आलें. सात जन्मांत मी बनविलेले आणि वापरलेले माझे सात बुरखे होते ते ! माणसांनीं गजबजलेल्या या रस्त्यांतून मी उघडया चेहऱ्यानें ओरडत धांवूं लागलों. मी ओरडत होतों, 'चोर, चोर... लुच्चे—लबाड—चोर कुठले ! '

रस्त्यांतले अनेक स्त्री-पुरुष मला पाहून हंसूं लागले. कांहींना माझी भीति वाटली. ते झटकन् आपापल्या घरांकडे धावत गेले.

असा ओरडत धावत मी बाजारांत गेलों. मला पाहून आपल्या घराच्या गच्चींतून एक तरुण ओरडला, ' तो पहा, तो पहा वेडा रस्त्यानं ओरडत चालला आहे. ' त्याला पाहण्याकरितां मी आपली नजर वर वळविली. सूर्यानें उभ्या आयुष्यांत पहिल्यांदाच माझ्या उघडया चेहऱ्याचें चुंबन घेतलें. त्याच्या विषयींच्या प्रीतीनें माझा आत्मा कांठोकांठ भरून गेला. आपल्याला कुठल्याही बुरख्याची आतां जरूरी नाहीं असें मला वाटूं लागलें. जणुं कांहीं समाधि लागल्यासारखी होऊन मी मोठयानें उद्गारलों, ' ज्यांनीं माझे बुरखे चोरले ते धन्य आहेत. '

असा मी वेडा झालों. या वेडेपणामुळें मला स्वातंत्र्य आणि सुरक्षितपणा हीं दोन्ही लाभलीं आहेत. या स्वातंत्र्यामुळें आतां मी एकटा--अगदीं एकटा राहूं शकतों. इतरांना माझें मनोगत समजूं शकत नाहीं. त्यामुळें मीं आतां सुरक्षित झालों आहें. ज्यांना आपलें म्हणणें पूर्णपणें समजतें, ते तेवढ्यापुरते आपल्याला गुलाम करून सोडीत असतात.

पण या सुरक्षितपणाचाही मी फाजील अभिमान बाळगतां कामा नये. तुरुंगांतला एक कैदीसुद्धां दुसऱ्या कैद्यापासून सुरक्षित असतोच की !

## रात्र आणि वेडा

२६

हे रात्रि, मी थेट तुझ्यासारखा आहें—कृष्ण आणि नग्न ! माझ्या दिवास्वप्नांच्या मार्गाहून कितीतरी वर असलेल्या अग्निपथावरून मी चालतों.

जेव्हां जेव्हां माझ्या पावलाचा स्पर्श या पृथ्वीला होतो तेव्हां तेव्हां तिथें एक विशाल वटवृक्ष निर्माण होतो.

छे ! वेड्या, तूं माझ्यासारखा नाहींस ! मागें पडलेल्या वाळवंटांत आपल्या पावलाचा किती मोठा ठसा उमटला आहे हें तूं अजूनही पुनः पुन्हां वळून पाहतोस !

हे रजनि, मी तुझ्यासारखाच आहें—शांत आणि गंभीर. माझ्या एकांताच्या हृदयांत एक देवता प्रसूतिवेदनांचा अनुभव घेत आहे. तिच्या पोटीं जन्माला येत असलेल्या जिवाच्या ठिकाणीं स्वर्ग आणि नरक यांची भेट होत आहे.

छे ! वेड्या माणसा, तूं माझ्यासारखा नाहींस ! दुःखाचें दर्शन झालें कीं अजून तुझा थरकांप होतो, नरकाचें गीत तुला अद्यापि भयभीत करून सोडतें.

हे निशादेवि, मी तुझ्यासारखाच आहें. स्वैर आणि भयंकर ! जित राष्ट्रांचीं आक्रंदनें आणि विस्मृत देशांकरितां निघणारे निःश्वास माझ्याही कानांत घोंघावत आहेत.

नाहीं, वेडया, तूं मुळींच माझ्यासारखा नाहींस ! स्वतःचा क्षुद्र आत्मा हा अजून तुला आपला सोबती वाटतो. आपल्या विशाल आत्म्याशीं तुला मैत्री करतां येत नाहीं.

हे रात्रि, मी तुझ्यासारखाच आहें. क्रूर आणि पाहणाराच्या मनांत धाक निर्माण करणारा ! समुद्रावर जळणाऱ्या जहाजांच्या प्रकाशानें माझें हृदय उजळलें आहे. आणि रणांगणांत मारल्या गेलेल्या वीराच्या रक्तानें माझे ओठ रंगलेले आहेत.

छे ! वेडया, तूं माझ्यासारखा नाहींस ! आपल्यासारख्या आत्म्याच्या सोबतीची इच्छा अजून तुझ्या मनांत प्रबळ आहे. स्वतःचें नियमन स्वतः करण्याची शक्ति तुझ्यांत नाहीं.

हे यामिनि, मी तुझ्यासारखाच आहें. आनंदी आणि प्रफुल्ल ! माझ्या छायेंत राहाणारा माझा मित्र अगदीं नवीन अशा मदिरेनें धुंद झाला आहे. आणि माझ्या पावलावर पाऊल टाकून येणारी मैत्रीण मोठया मौजेनें पाप करीत आहे.

अं हं ! वेडया तूं माझ्यासारखा नाहींस. सात पदर असलेल्या बुरख्या–आड तुझा आत्मा लपलेला आहे. तुझें हृदय तुझ्या ताब्यांत नाहीं.

हे विभावरि, मी तुझ्यासारखाच आहें. शांत आणि भावनोत्कट ! शुष्क चुंबनाच्या प्रेतवस्त्रांत गुंडाळलेले हजारों प्रेमी जीव माझ्या हृदयांत पुरले गेले आहेत.

खरें ? हें खरें आहे ? खरोखरच तूं माझ्यासारखा आहेस ? वादळाचा घोडा करून आणि विजेची तलवार हातांत धरून तूं दौडत जाऊं शकतोस ?

तुझ्यासारखा, हे शर्वरि, मी खरोखरच तुझ्यासारखा आहें. प्रबळ आणि उत्तुंग ! धुळीला मिळालेल्या देवांच्या राशीवर माझें सिंहासन उभारलें आहे. माझ्या अंगावरल्या वस्त्राचें चुंबन घेण्याकरितां दिवस माझ्या पुढूनही जातात. परंतु ते माझ्या चेहऱ्याकडे टक लावून पाहत नाहींत.

काळोखानें भरलेल्या माझ्या हृदयाच्या लाडक्या बाळा, खरोखरच तूं माझ्यासारखा आहेस काय ? माझ्यासारखेच अनिर्बंध विचार तुझ्या मनांत येतात ना ? माझी सर्वस्पर्शी भाषा तुलाही समजते ना ?

होय. हे यामिनि, आपण जुळीं भावंडें आहोंत. तूं अंतरिक्षाचें अंतरंग प्रगट करतेस. मी माझ्या आत्म्याचें अंतरंग व्यक्त करतों.

## उत्कट इच्छा

## २७

एका बाजूला माझा भाऊ खडा उभा आहे. दुसऱ्या बाजूला माझी बहीण स्वच्छंदानें नाचत आहे. हा गिरिराज आणि ही सागरिका ! या दोघांच्यामध्यें मी बसलों आहें.

आम्हीं तिघें एकाकी असलों तरी आमचा आत्मा एकच आहे. आम्हांला एकत्र गुंफणारें प्रेमबंधन मोठें दृढ, गाढ आणि आश्चर्यकारक आहे. माझ्या बहिणीच्या हृदयापेक्षां तें अधिक गाढ आहे. माझ्या भावाच्या सामर्थ्यापेक्षां तें अधिक दृढ आहे. आणि माझ्या चमत्कारिक वेडेपणापेक्षां तें कितीतरी आश्चर्यकारक आहे !

पहिल्यावहिल्या अंधुक प्रातःकाळीं आम्ही एकमेकांना पाहिलें. त्यानंतर युगेंच्या युगें लोटून गेलीं आहेत. अनेक जगांचा उदय, विकास आणि लय आमच्या दृष्टीला पडला आहे. तरीदेखील आम्ही आजही तरुण आणि उत्साहपूर्ण आहोंत.

आम्ही तरुण आणि उत्साहपूर्ण असलों तरी आमचें जीवन अगदीं एकलेपणाचें आहे. आम्हांला एकही सोबती नाहीं. आम्हांला भेटायला कुणीही येत नाहीं. एकमेकांच्या गळ्यांत एक एक हात टाकून आम्ही युगानुयुगें इथें बसलों असलों तरी आमचें जीवन दुःखी आहे. कोंडलेल्या इच्छा

आणि दडपलेले मनोविकार यांच्यापासून कुणाला समाधान होणें शक्य आहे काय ?

माझ्या बहिणीचें शयनमंदिर उजळणारा अग्निदेव कुठून बरें येईल ? माझ्या भावाच्या हृदयांतली आग कोणती पर्जन्यधारा शांत करणार आहे ? आणि माझ्या हृदयावर अधिराज्य गाजविणारी रमणी कोण आहे ?

रात्रीच्या शांत निवांत वेळीं माझी बहीण झोंपेंत त्या अज्ञात अग्निदेवाचें नांव अर्धवट उच्चारते. माझा भाऊ त्या दूरस्थ अदृश्य जलदेवतेला हांका मारतो. पण झोंपेंत मी कुणाला आवाहन करतों तें माझें मलाच कळत नाहीं.

गिरिराज आणि सागरिका यांच्यामध्यें मी बसलों आहें. आम्ही तिघें एकाकी असलों तरी आमचा आत्मा एकच आहें. आम्हांला एकत्र गुंफणारें प्रेमबंधन मोठें दृढ, गाढ आणि आश्चर्यकारक आहे.

## चेहरे

## २८

ज्याच्यावर भिन्न भिन्न प्रकारच्या हजार मुद्रा प्रतिबिंबित झाल्या आहेत असा चेहरा मी जसा पाहिला आहे, तसा एखाद्या ओतीव साच्यांतून काढल्याप्रमाणें दिसणारा चेहराही माझ्या दृष्टिपथांत आला आहे.

ज्याच्या आंतला कुरूपपणा वरच्या नट्टयापट्टयांतून मला स्पष्ट दिसत होता असा चेहरा आणि ज्याचें खरेंखुरें सौंदर्य पहाण्याकरितां मला वरचा चमकदारपणा दूर करावा लागला असा चेहरा—हे दोन्ही मी पाहिले आहेत.

ज्याच्यावर कसलाही ठसा उमटलेला नाहीं असा सुरकुतलेला म्हातारा चेहरा मी जसा पाहिला आहे, तसा ज्याच्यावर सर्व अनुभव स्पष्टपणें कोरलेले आहेत असा मुलायम चेहराही माझ्या दृष्टीला पडला आहे.

सर्व चेहरे माझ्या परिचयाचे आहेत. माझ्या स्वतःच्या दृष्टिकोनांतून मी प्रत्येक चेहऱ्याकडे पाहत असतों. त्यामुळें बाह्य देखाव्याआड लपलेल्या त्यांच्या खऱ्याखुऱ्या स्वरूपाचें मला दर्शन होतें.

# सात आत्मे २९

रात्रीची अत्यंत शांत अशी वेळ होती ती ! मी हळुहळु झोंपेंत गुंग होत होतों. इतक्यांत माझे सात आत्मे एकत्र जमले. त्यांच्या गुजगोष्टींची कुज--बुज मला ऐकूं येऊं लागली.

**पहिला आत्मा:** इतकीं वर्षे मी ह्या वेडया मनुष्याच्या शरीरांत राहिलों आहें ! दिवसा त्याचें शारीरिक दु:ख जागृत करायचें आणि रात्रीं त्याच्या मानसिक दु:खाला चालना द्यायची यापलीकडे दुसरें कांहीं कामच नाहीं मला ! अगदीं विटून गेलोंय् मी या कामाला ! आतां बंड करायला मी मागेंपुढें पाहणार नाहीं.

**दुसरा आत्मा :** माझ्यापेक्षां तुझें नशीब कितीतरी बरें आहे, बाबा ! या मनुष्याचा आनंदी आत्मा होण्याचें काम माझ्या वांट्याला आलें आहे. त्याच्याबरोबर क्षणाक्षणाला मला हंसावें लागतें. त्याच्या आनंदाच्या घटका गाणीं गाऊन मलाच साजऱ्या कराव्या लागतात. आणि त्याच्या आशेनें उजळलेल्या विचारांबरोबर नाचण्याकरितां माझ्या पायाला जणुं कांहीं पंखच फुटले आहेत असें मला दाखवावें लागतें. असल्या कंटाळवाण्या जीवनाविरुद्ध कुणी बंड करणें जरूर असलें तर तें मी !

**तिसरा आत्मा:** अहो, तुमचें माझ्याकडे लक्ष नाहीं म्हणून तुम्ही असें बोलताय् ! प्रीतीच्या पाशांनीं मी जखडला गेलों आहें. स्वैर मनोविकार आणि

अद्‌भुत इच्छा यांनीं सदैव जळणारा मीच खरोखर तुमच्यापेक्षां अधिक दुर्दैवी आहें. या वेडयाविरुद्ध पहिल्यांदा जर कुणी बंड करील तर तो माझ्यासारखा मरणानें गांजलेला आत्माच होय.

**चवथा आत्मा**: तुम्हां सर्वांमध्यें मी अधिक अभागी आहें. माझ्या वांट्याला हिडिस द्वेष आणि विनाशक तिरस्कार यांशिवाय दुसरं कांहींच आलेलं नाहीं. मी वादळासारखा आहें. नरकाच्या काळ्या कुट्ट गुहेंत माझा जन्म झाला आहे. यापुढं या वेडयाची सेवा करायची नाहीं असं जर कुणाला मनःपूर्वक वाटत असेल तर तें माझ्यासारख्या आत्म्यालाच !

**पांचवा आत्मा**: छे ! तुझ्या आधीं मीच बंड करून उठलें पाहिजे. विचार, कल्पना, वासना या साऱ्या गोष्टी माझ्याकडे आल्या आहेत. अज्ञात गोष्टींच्या आणि अद्यापि जगांत निर्माण न झालेल्या गोष्टींच्या शोधाकरितां अविश्रांत भटकत राहण्याचा शाप मला मिळाला आहे.

**सहावा आत्मा**: या धडपडया वेडया मनुष्याच्या विरुद्ध बंड करण्याचा पहिला हक्क जर कुणाला असेल तर तो मलाच ! माझं जीवन अगदीं ओकें ओकें आहे. अखंड कष्ट माझ्या नशिबीं लिहिले आहेत. ज्याची इतरांना दया यावी असा श्रमिक आहें मी ! कष्टाळु हातांनीं आणि स्वप्नाळु डोळ्यांनीं मी दिवसांच्या प्रतिमा घडवितों आणि आकारहीन तत्त्वांना नवे आकार देतों.

**सातवा आत्मा**: तुमच्यापैकीं प्रत्येकाला एक ठरलेलं काम मिळालें आहे. तेंच तेंच पुनः पुन्हां तुम्हांला करावें लागतें. एवढयासाठीं तुम्ही सारे या वेडयाविरुद्ध बंड करायला तयार झाला आहांत. किती विचित्र गोष्ट ही ! ज्याचें दैव निश्चित झालें आहे असा तुमच्यासारखा आत्मा मला होतां आलें असतें तर किती बरें झालें असतें ! पण ... पण मला या वेडयाच्या जीवनांतलं कुठलंच काम मिळालेलें नाहीं. मी एक रिकामटेकडा आत्मा आहें. तुम्ही पदोपदीं जीवनाची पुनर्निर्मिति करीत असतांना मी एका मूक, शून्य अशा पोकळींत स्वस्थ बसलेला असतों. मित्रांनों, आतां तुम्हीच सांगा, बंड करण्याचा अधिकार कुणाला आहे ? तुम्हांला कीं मला ?

सातव्या आत्म्याचे हे शब्द ऐकून त्या सहाही आत्म्यांना त्याची मोठी कींव आली. त्यांनीं सदय दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें. पण ते एक शब्दही बोलले नाहींत.

जसजशी रात्र अधिक गंभीर आणि प्रशांत होत गेली तसतसे ते सहा आत्मे एका मागून एक मोठ्या आनंदानें झोंपीं गेले. त्यांची बंडखोरपणाची प्रवृत्ति आतां पार लोप पावली होती.

पण तो सातवा आत्मा मात्र जागाच होता. वस्तुजाताच्या आड लपलेल्या शून्याकडे तो टक लावून पाहत होता.

## माझा आनंद

## ३०

माझा आनंद जन्माला आला तेव्हां त्याला बाहुपाशांत कवटाळून घेऊन मी घराच्या गच्चीवर गेलों आणि मोठमोठ्यानें हांका मारूं लागलों, 'या, शेजाऱ्यापाजाऱ्यांनों, इकडे या ! मला झालेला हा आनंद पहा. अगदीं धांवत या. आणि सूर्यप्रकाशांत हंसत असणारा हा मूर्तिमंत उल्हास पहा.'

पण माझ्या शेजाऱ्यांपैकीं एकही कौतुकानें माझ्या आनंदाला पाहण्याकरितां आला नाहीं. मला मोठें आश्चर्य वाटलें.

पुढें सात महिने प्रत्येक दिवशीं गच्चीवरून मी माझ्या आनंदाच्या जन्माची शुभवार्ता घोषित करीत होतों. पण कुणीही माझ्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. मी आणि माझा आनंद एकटेच राहिलों. कुणीही आम्हांला भेटायला आलें नाहीं, एकाही माणसानें आमची चौकशी केली नाहीं.

माझा आनंद कंटाळून गेला. तो फिक्कट दिसूं लागला. माझ्याशिवाय दुसरें कुणीही त्याच्या सौंदर्याचें कौतुक करीना, माझ्याशिवाय दुसरें कुणीही त्याचें प्रेमानें चुंबन घेईना !

शेवटीं माझा आनंद एकटेपणाच्या दुःखानें तडफडून मरून गेला.

आतां माझ्या गत दुःखाची आठवण करतानांच मला त्या आनंदाचें

स्मरण होतें. पण स्मृति हें शिशिरांतल्या वृक्षावरलें एक पर्ण आहे. वायु-लहरीबरोबर तें क्षणभर गुंजन करतें. मग मात्र त्याचा आवाज कुणालाही ऐकूं येत नाहीं.

## माझें दुःख

३१

माझ्या दुःखाचा जन्म झाला तेव्हां मी मोठ्या काळजीनें त्याला वाढविलें. प्रेमळ लाडकेपणानें मी त्याचें संगोपन केलें.

सर्व सजीव पदार्थांप्रमाणें माझें दुःखही लहानाचें मोठें झालें. तें मोठें सुदृढ, सुंदर आणि हर्षोत्फुल्ल दिसूं लागलें.

आमचें दोघांचें एकमेकांवर मोठें प्रेम होतें. आमच्याभोंवतालच्या जगावरही आमचें प्रेम होतें. कारण दुःखाचें हृदय प्रेमळ असतें. त्याच्या सहवासांत माझेंही हृदय स्नेहशील झालें.

आमचें दोघांचें संभाषण सुरू झालें म्हणजे दिवस कसे पंख असल्यासारखे उडून जात. आमच्या रात्री स्वप्नमालांनीं वेढलेल्या असत. कारण दुःख मोठें बोलकें असतें. त्याच्या संगतींत मीही बोलका झालों.

आम्ही दोघें गाऊं लागलों कीं शेजारीपाजारी आपआपल्या खिडक्यांत येऊन बसत आणि आमचीं गाणीं ऐकत. तीं गीतें समुद्रासारखीं भावगंभीर होतीं आणि आमचे स्वर मधुर स्मृतींनीं परिपूर्ण होते.

आम्ही बरोबर फिरायला जाऊं लागलों म्हणजे लोक स्निग्ध दृष्टीनें आमच्याकडे पाहत आणि निरतिशय मधुर असे शब्द कुजबुजत. आमच्याकडे हेव्यानें पाहणारेही कांहीं लोक होते. कारण माझें दुःख उदात्त होतें. त्याच्या मैत्रीचा मला अभिमान वाटत होता.

पण इतर सर्व सजीव पदार्थांप्रमाणें माझ्या दुःखालाही मृत्यु आला. आतां मी एकटाच राहिलों आहें. गतस्मृतींचें चिंतन करण्यापलीकडे मला दुसरा कांहीं उद्योग नाहीं.

आतां मी बोलूं लागलों म्हणजे माझे-शब्द माझ्या कानांना निर्जीव आणि कंटाळवाणे वाटतात. मी गाऊं लागलों म्हणजे माझें गाणें ऐकायला कुणीही आपल्या खिडकींत येऊन बसत नाहीं. मी रस्त्यावरून जातों तेव्हां माझ्याकडे कुणीही पाहत नाहीं.

फक्त झोंपेंतच मोठ्या करुण स्वरानें उच्चारलेले खालील शब्द माझ्या कानांवर पडतात—' इकडं बघा ! ज्याचं दुःख मरून गेलं आहे असा हा मनुष्य इथं निजला आहे. '

## पूर्ण जग

## ३२

हे हरपलेल्या आत्म्यांच्या देवा, इतर देवांमध्यें मिसळून मला दिसेनाशा झालेल्या देवाधिदेवा, माझे हे चार शब्द ऐकून घे. माझ्यासारख्या वेड्या आणि भटक्या आत्म्यांवर नजर ठेवणाऱ्या हे सहृदय देवते, माझ्या बोलण्याकडे क्षणभर लक्ष दे. मी अत्यंत अपूर्ण आहें. सर्व दृष्टींनीं परिपूर्णतेला पोंचलेल्या या मानवांमध्यें मला रहावें लागत आहे.

मी मनुष्यरूपानें वावरणारा मूर्तिमंत गोंधळ आहें. पंचमहाभूतांचें एक विचित्र मिश्रण आहें. मी या परिपूर्ण जगांतून, त्याच्यांत राहणाऱ्या लोकांतून मी फिरत आहें. त्यांचे सर्व कायदेकानू तयार आहेत. त्यांची शिस्त अगदीं यंत्रासारखी आहे. त्यांच्या विचारांत विसंगति कधींच नसते. त्यांचीं स्वप्नें सुद्धां सुव्यवस्थित रीतीनें गुंफलीं जातात. ध्येयांच्या बाबतींतही नोंद, वर्गीकरण, वगैरे गोष्टी या जगांत आहेत.

हे देवाधिदेवा, पूर्णतेला पोंचलेल्या जगांतले हे लोक सद्गुणांचें मोजमाप करतात. इथें पापें जोखलीं जातात. पापपुण्यांच्या संधिप्रकाशांत वावरणाऱ्या अगणित अनुभूतींचीं सुद्धां सदरें पाडून इथें सूक्ष्म आणि सविस्तर नोंद केली जाते.

या जगांत दिवस आणि रात्री याचे आचाराच्या दृष्टीनें निरनिराळे विभाग केलेले आहेत. अगदीं काटेकोर नियमांचें इथें अधिराज्य आहे.

खाणें, पिणें, झोंपणें, पोषाख करणें आणि मग ठरलेल्या वेळीं कंटाळून जाणें—

काम करणें, खेळणें, गाणें, नाचणें आणि घड्याळाचा ठोका पडला कीं अंथरुणावर स्वस्थ पडणें—

एका विशिष्ट रीतीनें विचार करणें, एका मर्यादेपर्यंतच भावनाशील होणें आणि पलीकडच्या क्षितिजावर एक परिचित तारा उगवला कीं विचार आणि भावना यांची रजा घेणें—

नुसत्या स्मितानें शेजाऱ्याला लुबाडणें,हात मोठ्या ऐटीनें आणि डौलदारपणानें हलवून देणग्या देणें, विचारपूर्वक स्तुति करणें, सावधगिरीनें निंदा करणें, एका शब्दानें एखाद्या आत्म्याचा नाश करणें, एका उच्छ्वासानें एखाद्याचें शरीर जाळून टाकणें आणि दिवसाचें काम संपलें कीं या सर्व गोष्टींतून हात धुऊन मोकळे होणें—

शिष्टसंमत पद्धतीनें प्रेम करणें, सांकेतिक रीतीनें स्वतःच्या आत्म्याचें विनोदन करणें, आपल्या मोठेपणाला शोभेल अशा पद्धतीनें देवांची पूजा करणें, कावेबाजपणानें सैतानाशीं कारस्थान करणें, आणि मग जणुं कांहीं स्मरणशक्तीचा लोप झाला आहे अशा रीतीनें या सर्व गोष्टी विसरून जाणें—

एका विशिष्ट हेतूनें कल्पना करणें, मोठ्या विचारानें चिंतन करणें, सुखांत गोडवा दाखविणें, दुःखांत उदात्तता प्रदर्शित करणें आणि उद्यां पेला पुन्हां भरतां यावा म्हणून तो रिकामा करणें—

हे देवाधिदेवा, या साऱ्या साऱ्या गोष्टींचे इथें दूर दृष्टीनें संकल्प केले जातात. निग्रहानें त्या व्यवहारांत उतरविल्या जातात. त्यांना नियमांचें बंधन असतें, बुद्धीचें मार्गदर्शन असतें. शेवटीं नियोजित पद्धतीनें त्या मारल्या जातात आणि पुरल्या जातात! आणि मानवी हृदयांत त्या सर्वांची जी शांत थडगीं असतात त्यांच्यावर खुणा करून त्यांची मोजदाद केली जाते.

असें हें पूर्णत्वाला पोंचलेलें जग आहे. अलौकिक कौशल्यानें नटलेलें,

अभूतपूर्व आश्चर्यानें सजलेलें ! विश्वचालकाच्या उद्यानांतलें सर्वांत परिपक्क झालेलें फळ आहे हें ! विश्वाचा हा सर्वश्रेष्ठ असा आराखडा आहे.

पण माझ्या देवा, मला एकच शंका आहे, मी इथें कशाला आलों? असल्या जगांत माझा काय उपयोग आहे ? मीं म्हणजे अतृप्त वासनांचें अपक्क बीं—ज्याला दिशेची पर्वा नाहीं असें वेडें वादळ—एखाद्या जळून गेलेल्या ग्रहगोलाचा भटकणारा तुकडा—असा मी आहें. हे हरपलेल्या आत्म्यांच्या देवा, इतर देवांमधें मिसळून मला दिसेनाशा झालेल्या देवाधिदेवा, मी या जगांत कशाला आलों आहें ?

## माझा मित्र

## ३३

प्रिय मित्रा, मी तुला दिसतों तसा मुळींच नाहीं. माझें बाह्य स्वरूप हें एक वरवरचें आवरण आहे. तुझ्या कुतुहलापासून माझें आणि माझ्या उपेक्षेपासून तुझें रक्षण करणारें तें एक मोठ्या काळजीनें विणलेलें वस्त्र आहे.

माझ्यांतला खरा मी मौनाच्या घरांत राहतों. तो तिथें असाच चिरकाल राहील. तो कुणाला दिसणार नाहीं, कुणाला त्याच्याजवळ जातां येणार नाहीं.

मित्रा, माझ्या बोलण्यावर किंवा माझ्या कृतीवर तूं विश्वास ठेवावास अशी इच्छा मी कधींही करणार नाहीं. कारण माझे शब्द हे नादरूप धारण करून प्रगट झालेले तुझेच विचार आहेत. माझी सर्व कृत्यें या तुझ्याच गतिमान झालेल्या आशा आहेत.

'वारा पूर्वेकडे वाहत आहे' असें जेव्हां तूं म्हणतोस तेव्हां मी उत्तरतों, 'होय, तो त्याच दिशेनें वाहत आहे. खरें सांगूं? माझें मन अशा वेळीं वाऱ्याविषयीं विचार करीत नसून समुद्राचें चिंतन करीत असतें. हें तुला कळावें अशी माझी इच्छा नसते म्हणूनच मी तुला असें उत्तर देतों.

माझे हे समुद्रविहाराचे विचार तुला समजत नाहींत. त्यांची तुला जाणीव व्हावी अशी माझीही इच्छा नाहीं. कारण त्या समुद्रावर मी एकटाच रमत गमत फिरणार आहें.

माझ्या मित्रा, तुझा दिवस सुरू झाला कीं माझी रात्र उगवते. असें असून देखील टेकड्यांवर नृत्य करणाऱ्या भर दुपारच्या प्रकाशलहरींविषयीं आणि नंतर दरीपलीकडून चोरपावलांनीं येणाऱ्या जांभळ्या सावल्याविषयीं मी तुझ्याशीं बोलत राहतों. कारण माझीं अंधारांतलीं गाणीं तुला ऐकूं येत नाहींत. तारांगणांत फडफडत असलेले माझे पंख तुला दिसत नाहींत. तुला हें दिसावें किंवा ऐकूं यावें असें मलाही वाटत नाहीं. माझ्या रात्रीबरोबर मी एकटाच विहार करूं इच्छितों.

जेव्हां तूं आपल्या स्वर्गाकडे वळतोस तेव्हां मी माझ्या नरकांत उतरत असतों. तुझ्या-माझ्यामध्यें केवढें दुर्लंघ्य अंतर आहे याची या वेळीं मला कल्पना येते. पण इतक्या दुरूनही, माझ्या मित्रा, प्रिय सुहृद म्हणून तूं मला साद घालतोसच ! प्रत्युत्तर म्हणूनच मीही तुला तशीच हांक मारतों. कारण माझा हा नरकांतला निवास तुझ्या दृष्टीला पडूं नये अशी माझी इच्छा असते. इथल्या अग्निज्वाळांनीं तुझी दृष्टि जळून साफ नाहींशी होईल, इथल्या धुरानें तुझें नाक चोंदून तुझा जीव गुदमरेल. या निवासस्थानावर माझें इतकें प्रेम आहे कीं तूं इथं कधीहीं पाऊल टाकूं नयेस असें मला वाटतें. इथेंही मी एकटाच माझें जीवन कंठणार आहें.

प्रिय सुहृदा, सत्य, सौंदर्य आणि सत्प्रवृत्ति यांच्यावर तुझें प्रेम आहे. या सर्व गोष्टींवर प्रेम करणें फार चांगलें आहे असें मी केवळ तुझ्यासाठीं म्हणत असतों; पण मनामध्यें मात्र मी तुझ्या या प्रेमाला हंसतों. परंतु माझें हें हसणें तुझ्या दृष्टीला पडावें असें मला वाटत नाहीं. मी एकटाच हंसूं इच्छितों.

माझ्या मित्रा, तूं सालस, सावध आणि शाहणा आहेस ! छे, एवढ्यानें तुझें खरेंखुरें वर्णन होणार नाहीं. तूं सर्वगुणसंपन्न आहेस. म्हणूनच मी तुझ्या-बरोबर मोठ्या शहाणपणानें आणि सावधगिरीनें बोलत असतों. तथापि असल्या मुखवट्याखालीं मी माझा वेडेपणा लपवीत असतों. माझा आत्मा मुळांतच वेड्याचा आहे. माझ्या वेडालाही एकांतच आवडतो.

माझ्या मित्रा, खरें बोलायचें तर तूं माझा मित्र नाहीस. पण तुला मी हें कसें समजावून सागूं? तुला हें कधींतरी पटेल काय? छे! तें अशक्य आहे. आणि म्हणूनच आपले मार्ग भिन्न असूनही एकमेकाच्या हातांत हात घालून आपण चालत आहों.

* * *

## पराभव

३४

हे माझ्या पराजया, तूं माझा एकांत आहेस. तुझ्यामुळेंच मला हा अस्मितापणा लाभला आहे. हजारों विजयांपेक्षां तूं मला अधिक प्रिय आहेस. साऱ्या जगावर अधिराज्य चालविणाऱ्या कीर्तीपेक्षां माझ्या हृदयाला तूं अधिक गोड वाटतोस, अधिक आवडतोस.

मित्रा पराजया, तूं माझें आत्मज्ञान आहेस. तुझ्याच बळावर मी जगाला आव्हान देऊं शकतों. आपण अजून तरुण आहों, चपळ आहों, हा हां म्हणतां कोमेजून जाणाऱ्या कीर्तिमाळांमध्यें आपण गुरफटून जातां कामा नये, हें सारें तूंच मला शिकविलें आहेस ! तुझ्याच सहवासांत मला खऱ्याखुऱ्या एकांताचा लाभ झाला. लोकांनीं आपल्याला टाळण्यांत आणि आपला उपहास करण्यात जो आनंद भरलेला आहे त्याचा अनुभव तुझ्या कृपेमुळेंच मला आला.

हे माझ्या पराभवा, माझी तळपती तलवार तूंच आहस. माझी संरक्षक ढालही तूंच आहेस. सिंहासनावर आरूढ होणें म्हणजे गुलाम होणें — जगाला आपलें अंतरंग कळणें म्हणजे आपण त्याच्या पातळीपर्यंत खालीं उतरणें—लोकांना आपल्या आत्म्याचें आकलन होणें म्हणजे पूर्णतेला पोंचणें—एखाद्या पिकलेल्या फळाप्रमाणें खालीं पडून नाश पावणें — हें सारें सारें मी तुझ्याच डोळ्यात वाचूं शकतों.

हे माझ्या पराजया, माझ्या धैर्यशाली मित्रा, माझें गीत, माझें आक्रंदन आणि माझें मौन हीं सारीं तुलाच ऐकूं येतील. पंखांचा फडफडाट, समुद्राच्या उसळत्या लाटांचा खळखळाट आणि रात्रीं जळणाऱ्या पर्वतांचा धगधगाट याच्याविषयीं तुझ्याशिवाय दुसरें कुणीही माझ्याशीं बोलूं शकणार नाहीं. माझ्या खडकाळ आत्म्याच्या चढणीवरून फक्त तूंच वर येऊं शकशील.

हे माझ्या पराजया, माझा अमर धीर तूंच आहेस ! तूं आणि मी वादळाबरोबर हंसूं ! आपल्यांतलें जें जें चैतन्यहीन होत जाईल तें तें पुरून टाकण्याकरितां आपण बरोबरीनें खड्डे खणूं ! आपण निग्रहानें सूर्यप्रकाशांत उभे राहूं ! मग साऱ्या जगाला आपली भीति वाटेल.

संग्रहालय
30807
का. वा.
2587

मी लोकांना ओरडून सांगितलें, ' आज ना उद्यां मला वधस्तंभावर लट-कविण्यांत येईल.'

ते म्हणाले, ' तुझ्या खुनाचं पाप आम्ही आपल्या शिरावर कां घ्यावं ?'

मी उत्तरलों, ' वेडया माणसांचे बळी घेतल्याशिवाय तुम्हांला या जगांत मोठेपण कसं प्राप्त होईल ? '

त्यांनीं माझें हें बोलणें मनावर घेतलें. मला वधस्तंभावर टांगण्यांत आलें. त्या शिक्षेनें माझा आत्मा शांत झाला.

पृथ्वी आणि आकाश यांच्यामध्यें मी लोंबकळत असतांना मला पाहण्या-करितां लोकांनीं आपल्या माना उंचावल्या. त्यांना स्वतःचा मोठा अभिमान वाटला. कारण त्यांच्या माना इतक्या उंच कधींच झाल्या नव्हत्या.

माझ्याकडे पाहत उभा असणारा त्यांच्यापैकीं एक मला म्हणाला, ' कुठल्या कृतकर्माचं प्रायश्चित्त तूं भोगत आहेस ? '

दुसऱ्यानें प्रश्न केला, ' कोणत्या कार्यासाठीं तूं आपलं बलिदान करीत आहेस ? '

तिसऱ्यानें विचारलें, ' अशा रीतीनं जगभर आपलं नांव गाजेल असं तुला वाटतं काय ? '

मग चौथा उद्गारला, ' पहा, पहा तो हंसतोय् ! आपल्याला इतकं दुःख देणाऱ्याला मनुष्य क्षमा करूं शकतो ? '

मी त्या सर्वांना उद्देशून म्हणालों, ' मी वधस्तंभावर हंसत होतों एवढंच तुम्ही लक्षांत ठेवा. त्याग, प्रायश्चित्त, कीर्तीची लालसा, यांपैकीं कुठल्याही हेतूनं मी प्रेरित झालेलों नाहीं. माझा कुणीही अपराध केलेला नाहीं. मग मी क्षमा कशाची करूं ? तृषेनं मी व्याकुळ झालों होतों. माझं रक्त काढून मला प्यायला द्या म्हणून मी तुम्हाला विनंति केली. कारण वेड्याची तहान त्याच्या स्वतःच्या रक्तानंच शांत होत असते. मी मुका होतों. जखमांच्या तोंडानीं तरी बोलतां यावं म्हणून मी तुमची विनवणी केली. तुमच्या या पृथ्वीवरल्या दिवसरात्रीच्या तुरुंगांत मी बंदिवान होऊन पडलों होतों. जिथं अधिक विशाल दिवस आणि रात्री असतात अशा जागीं जाण्याकरितां मी दरवाजा शोधीत होतों. तो मला दिसला.

मला निरोप द्या. माझ्यापूर्वीं वधस्तंभावर लटकलेले अनेक लोक ज्या मार्गानं गेले आहेत त्यानंच मी जात आहे. या मार्गाचा आम्हांला कंटाळा आला आहे असं मुळींच समजूं नका. कारण अधिक विशाल अशा पृथ्वीच्या आणि आकाशाच्या मध्यें याहूनही मोठमोठ्या जनसमुदायांनीं आम्हांला वधस्तंभावर लटकावलेंच पाहिजे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
पा. क्र. नों. दि.
वि.

IRBK-0108019

IRBK-0108019